
# रणशिंग

लेखक -

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर



# रणशिंग

लेखक: स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

**इंटरनेट अधिकार**

**स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक**
**स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर पश्चिम, मुंबई ४०००२८**

प्रकल्प संचालक : रणजित विक्रम सावरकर

www.savarkarsmarak.com

# रणशिंग

## हिंदुसंघटकांनी आपल्या राष्ट्राचा इतिहास कसा लिहावा नि वाचावा?

इतिहास कसा लिहावा नि वाचावा ह्या सर्वसाधारण प्रश्नावरच एक प्रबंध लिहावा असा विचार माझ्या मनात अनेक वर्षे घोळत आहे. पण नैमित्तिक राजकारण नि समाजकारण हेच परिस्थिती-प्राबल्यामुळे जीवनाचे मुख्य कर्तव्य होऊन बसले आणि ते पार पाडता पाडताच जीवनाचा दिवस संपत आला. त्यायोगे जी अनेक साहित्याची नि विज्ञानाची आवडीची कामे राहून गेली त्यातच हा प्रबंधही आजवर इच्छेचे फाटकापाशी अडकून पडला आहे; परंतु सध्या आपल्या हिंदुराष्ट्राच्या अस्तित्वासाठीसुद्धा जी झुंज अनिवार्य झाली आहे ती लढण्यासाठी इतर साधनांप्रमाणेच प्रत्येक हिंदुसंघटकाला आपल्या हिंदुस्थानचा इतिहास कसा लिहावा नि वाचावा, हिंदुसंघटनाला वर्तमानकालात अधिक बलशाली करण्यासाठी भूतकाळचा कुठवर नि कसा उपयोग करून घ्यावा हे कळणे अगदी अवश्य आहे. नाही तर संघटनेच्या ठायी विघटना होण्याचे भय आहे. आपल्या हिंदुत्ववादाच्या बौद्धिक मांडणीमध्ये हिंदुस्थानचा इतिहास हिंदुसंघटकांनी कसा लिहावा नि वाचावा हाही एक अध्याय अवश्य हवा. त्याविषयी या लेखात काही प्राथमिक विधेये (Points) तेवढी अगदी संक्षेपतः देत आहे.

प्रत्येक हिंदुसंघटकाने हिंदुस्थानच्या वैदिककालापासून तो आजपर्यंतच्या इतिहासाचा हिंदुत्वाच्या विशिष्ट दृष्टिकोनातून अभ्यास केलाच पाहिजे. आपल्यापैकी जे पुढारी, पत्रकार, अध्यापक, शिक्षक, बौद्धिक वर्गचालक, वक्ते असे असतील त्यांनी तर आपल्या इतिहासाचे विशेषज्ञ झालेच पाहिजे. देवदैत्य, देवदानव, सुरासुर, आर्यानार्य या द्वंद्वांचा अर्थ काय तो समजून घेतला पाहिजे. त्यांची युद्धे नि संधी होता होता उत्तरापथाचा नि दक्षिणापथाचा संबंध कसा आला, तेथेही संघर्ष नि समन्वय चालू असता यक्ष, राक्षस, किन्नर, नाग, अहिप, भूत, तक्षक प्रभृति उत्तरेतील नि दक्षिणेतील पौराणिक काळात उल्लेखिलेल्या जाती एका महान भारतीय राष्ट्रात कशा समाविष्ट झाल्या, मोठमोठ्या सम्राटांच्या कधी उत्तरेकडून दक्षिणेकडे नि कधी दक्षिणेकडून उत्तरेकडे नि बळावलेल्या साम्राज्यामुळे ह्या राष्ट्राच्या संस्कृतीत अनेक उपजातीय संस्कृती, चालीरीती, भाषा, विभाषा मिसळत जाऊन त्या सर्वांची मिळून एक महान् भारतीय संस्कृति कशी उत्पन्न झाली, मनुस्मृतीत विस्तारशः वर्णिल्याप्रमाणे अनुलोम-प्रतिलोमाच्या पद्धतीचे सहस्त्रावधि विवाह होऊन ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र ह्यांचे रक्तबीजही एकमेकांत कसे मिसळले;

इतकेच नव्हे तर नव्या वन्य वा अन्य जाती जशाजशा ह्या भारतीय राष्ट्रात नि संस्कृतीत सामावू लागल्या तसेतसे त्यांचे आपसात रक्तसंबंध कसे जुळत गेले, क्षत्रिय भीमाचे हिडिंबा राक्षसीशी कोणीही न बहिष्कारलेले लग्न किंवा अर्जुनाचे मणिपूरच्या नागराजाच्या कन्येशी झालेले लग्न आणि अशा सुप्रसिद्ध उदाहरणांवरून नि अनुलोम आणि विशेषतः प्रतिलोमप्रथेवरून सिद्ध होणारी अशी सहस्त्रावधी लग्ने ह्यांच्या योगाने हे भिन्न भिन्न लोक रक्तबीजानेही कसे एका महत्तम राष्ट्रात एकरूप पावले, सगळ्यांची मिळून एक संस्कृति, एक राष्ट्रीय भाषा, एकराष्ट्रीयत्वाची जाणीव कशी विकसत गेली, पुढे आपल्या ह्या प्राचीन इतिहासाच्या अर्वाचीन काळी ग्रीक, शक, हूण इत्यादी परचक्रे आली असता त्यांची राज्ये तीन तीन शतके इथे चालत असता आपल्यात मोठे पराक्रमी विक्रम वारंवार जन्मास येऊन त्या परकीय राजशक्तींना रणांगणात धूळ चारून पुनःपुन्हा आपली साम्राज्ये कशी स्थापिली गेली आणि त्या लक्षावधी परकीयांना आपली संस्कृति, धर्म, भाषा यांच्या प्रभुत्वाखाली आणून त्यांस आपल्या या भारतीय राष्ट्रात कसे जिरवून पचवून टाकले; पुढे मुसलमान आले त्यांच्याशी सात-आठ शतके सारखे युद्ध खेळत त्यांच्याही साम्राज्यसत्तेची आम्ही हिंदुनी रणांगणांत कशी धुळधाण उडविली आणि 'हिंदुपदपादशाही' पुनः कशी स्थापन केली हा वैदिकपूर्वकालापासून ब्रिटिशांची सत्ता स्थापन होईपर्यंतचा इतिहास हिंदुसंघटकांनी, ऐतिहासिक विशेषज्ञांनी सांगोपांग आणि अर्थसमन्वयी दृष्टीने अभ्यासावा. त्यावर ग्रंथ लिहावे. प्रसिद्धिची साधने मिळताच ते प्रसिद्धिले जातील; पण तोवर निदान लिहून तरी ठेवावे.

त्यातील निवडक कालखंडांची लहान, सुबक नि सारांशमय पुस्तके मात्र शक्य तितक्या लवकर प्रसिद्धिली जावीत. कै. वैद्यांचे रामचरित्र किंवा कृष्णचरित्र किंवा श्री. सरदेसाई यांची शिवाजी, संभाजी, बाजीराव यांची चरित्रे, त्रोटक चरित्रे, वसईचा वेढा, श्रीहर्षांचे चरित्र, चंद्रगुप्त, विक्रम यांची चरित्रे, चाणक्यांच्या त्या अत्यंत मूल्यवान असणाऱ्या अर्थशास्त्रातील काही राज्यघटनात्मक नि राज्यसंचलनात्मक भाग, त्या वेळच्या समाजाचे मूर्तिमंत चित्र आखणारी सुरेख वर्णने अशी एकेक, प्रकरणाची, मागे 'धनुर्धारी' लिहीत तशी पण अद्ययावत् असलेली ऐतिहासिक लहान पुस्तके प्रसिद्धिली जावीत. ही लहान पुस्तके प्रत्येक हिंदुसंघटनी प्रचारकाने अभ्यासिली पाहिजेत.

आपल्या ह्या वेदपूर्वकालीन नि वेदकालीन आरंभापासून तो आजवर ह्या वर उल्लेखिलेल्या आर्य, अनार्य, यक्ष, राक्षस, भूत, पिशाच, शक, यवन, हूण प्रभृति प्राचीन नि अनेक अर्वाचीन परकीय वा स्वकीय जातींची अत्यंत कौशल्याने घडवून आणलेली ह्या आपल्या आजच्या 'हिंदु राष्ट्रात' जी सलग, समन्वित नि एकजीव परिणति झाली आहे ती जगाच्या इतिहासातील मानवी संघटनांचे एक अत्यंत आश्यर्यकारक उदाहरण आहे. भरतखंडांतील नाना लहानमोठ्या नदनद्या, भिन्न दिशांनी वाहत वाहत शेवटी जशा सिंधु

सागरापासून तो गंगा सागरापर्यंत विस्तारलेल्या हिंदुमहासागरात एकजीव झाल्या आहेत. त्याचप्रमाणे वैदिक युगापासून तो आजपर्यंतच्या नाना जाती, उपजाती, धर्मपंथ, प्रांत एकत्र होत होत, एकमेकात मिसळत मिसळत, आमच्या वैदिक पूर्वजांनी जे ध्येय आखले होते ते शेवटी गाठून आजच्या आमच्या ह्या 'हिंदु' राष्ट्रात एकजीव झाले आहेत. आसिंधुसिंधु भारत-भूमी हीच ज्यांची पितृभू आणि पुण्यभूही आहे तो तो हिंदु. पूर्वी आम्ही कोणी आर्य असू वा अनार्य, गोंड असू वा भिल्ल, ब्राह्मण असू वा शुद्र, वैदिक असू वा अवैदिक, जैन असू वा बौद्ध, सारस्वत असू वा द्रविड, शैव असू वा वैष्णव, आज आम्ही सर्व राष्ट्रीय अर्थाने 'हिंदु' आहोत. हे आमचे एकजीवन आज ज्या एकाच शब्दात वरील व्याख्येप्रमाणे व्यक्तविता येते तो अनन्य शब्द आहे 'हिंदु!'

या शब्दाच्या 'हिंदु' या दोन अक्षरात अगस्तीच्या अंजलीत जसा महासागर तसे तीस कोटी लोकांचे राष्ट्रचे राष्ट्र सामावलेले आहे.

इतक्या दीर्घ कालावधीत परस्परांशी संबंध आलेल्या अनेक घटकांतील राष्ट्रभेद, जातिभेद, धर्मभेद, भाषाभेद, संस्कारभेद ह्यांना एका हिंदुराष्ट्रात एकजीव करण्याचे महत्कार्य आजच्या परिणतीपर्यंत तरी जे आपल्या पूर्वजांनी आणून ठेवले आहे ते शस्त्र नि शास्त्र या दोन्ही साधनांच्या सहाय्यानेच होय. केवळ विग्रहानेच, जित नि जेते म्हणून ते एकरूप पावते ना. केवळ संधीनेच ते साधले जाते ना. केवळ मन वळवून ते वळते ना किंवा केवळ परस्परांचा उच्छेद करून सगळ्यांना विनाशून एकच कोणी तरी अवशिष्ट उरता ना. संधि, विग्रह, शस्त्र, शास्त्र, समर नि समन्वय अशा दुहेरी नीतीनेच लहान टोळ्यांच्या जातीची उपराष्ट्रे आणि उपराष्ट्रांची महान राष्ट्रे बनतात. सगळ्यांच्या माहितीचे म्हणून लहानसे ब्रिटनचेच उदाहरण घ्या. मूळचे ड्रयूईड्स, ब्रिटन्स, एंजल्स, सॅक्सन्स, नॉर्मन्स, एक ना दोन अनेक परस्थ वा त्रयस्थ जातीच्या स्वाऱ्या, कलह, संधी होता होता शेवटी तीन मोठे भाग उरले. ते स्कॉटलंड, इंग्लंड नि वेल्स. हेही परस्परांशी आज विग्रह तर उद्या संधी, काही धर्माच्या प्रेमबंधाने तर काही राजनितीच्या वशिल्याने, काही शरणागती, काही देवाण घेवाण अशा दीर्घकालीन प्रक्रियेतूनच शेवटी एक सबळ राष्ट्र बनले. त्यातही धार्मिक, राजवंशीय, पक्षविपक्षीय अशी कारणपरत्वे पुन्हा पुन्हा यादवी माजली. शेवटी आज बाह्य परिस्थितीचे दडपण, अंतर्गत एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा विकास, सर्वांचे राजकीय प्रभृति हितसंबंध नि प्रभाव आपल्या राष्ट्रैक्यामुळेच काय तो टिकू शकत आहे ही अनुभवाने पटलेली निश्चिती ह्या नि अशा कारणांनी ब्रिटनचे राष्ट्र एकजीव आणि एकप्राण झाले आहे. यात आयर्लंड गोवण्याचा यत्न झाला; पण तो अजून तरी सफल झाला नसल्यामुळे ब्रिटनचे ग्रेट-ब्रिटन बनू शकले नाही; पण समन्वयाची ती प्रक्रिया अजूनही चालू आहे. ब्रिटनसारख्या केवळ चार-पाच कोटींच्या राष्ट्राची जर मूळ कथा अशी आहे तर तीस कोटी लोकांच्या भरतखंडासारख्या विस्तीर्ण भूभागावर

निवसणाऱ्या आमच्या आज एकजीवित्व पावलेल्या ह्या महान 'हिंदुराष्ट्राची' कुलकथा त्या राष्ट्रनिर्मात्या प्रक्रियेपासून अलिप्त कशी असणार?

हिंदुराष्ट्राचा इतिहास लिहिताना हीच अडचण प्रत्येक हिंदुसंघटनाच्या अभिमानी असणाऱ्या लेखकासमोर दत्त म्हणून उभी राहिल्यावाचून राहणार नाही; पण तरीही प्रत्येक इतिहासलेखकाचे आद्यकर्तव्य बजावण्यास त्याने मुळीच टाळाटाळ करु नये. इतिहास लिहावयाचा तर तो अगदी 'इति-ह-आस' असाच लिहावा. त्याचे वर्तमानकालावर काय परिणाम होतील, ह्याची तो इतिहास लिहिते वेळी, त्याने मुळीच चिंता बाळगू नये. ऐतिहासिक संशोधनाने अद्ययावत् म्हणून ठरलेली त्या त्या कालखंडांची माहिती अगदी सत्य तशीच लिहावी. राष्ट्रैक्याची किमया साधीत असताना किंवा चालत असताना वर सांगितलेली जी अपरिहार्य प्रक्रिया आहे तीमधून इतर कोणत्याही राष्ट्राप्रमाणेच हिंदुराष्ट्रालाही जावे लागणे अपरिहार्यच होते. त्यामुळे आपल्याही राष्ट्रावर अनेक परचक्रे आली, त्यांच्याशी शतकव्यापी युद्धे झाली केव्हा अंतर्गत यादवीही चालू राही, धार्मिक मतभेदांनीही केव्हा केव्हा उग्र स्वरुप धारण केले; परंतु अवांछनीय घटनाही इतिहास लेखकांनी तितक्याच सत्यतेने सांगावयास हव्यात की, जितक्या सत्यतेने आपल्या हिंदु राष्ट्रांतील मोठमोठ्या सम्राटांच्या वैभवशाली राजवटींना किंवा आपल्या सहस्त्रशः गौरवान्वित घटनांना स्वराष्ट्राभिमानी इतिहासकार व्यवस्थितपणे वर्णितात. उदाहरणार्थ, इतिहासकार जरी स्वतःला आर्यवंशीय समजत असला तरीही त्याने पूर्वी अनार्यांशी झालेली युद्धे किंवा मोठमोठे अनार्य राजे, तत्वज्ञ, वीर होऊन गेले त्यांचे वर्णन यथावत केले पाहिजे. कारण आपण आज आर्यांचा वा अनार्यांचा पक्षपाती इतिहास लिहीत नसून 'हिंदु राष्ट्राचा' इतिहास लिहीत आहोत आणि या हिंदुत्वात पूर्वीचे आर्यानार्यादिक सारे वंश आणि त्यांच्या कुलकथा संमीलित आणि एकजीव झालेल्या आहेत. कोणी इतिहासलेखक वैदिक धर्माचा अभिमानी असेल; पण म्हणून त्याने पूर्वीच्या इतिहासातील आपल्या अवैदिक बुद्ध जैनधर्मीयांशी वैदिक धर्मीयांच्या काही वेळा झालेल्या विग्रहाचे वर्णन केवळ वैदिकांचीच बाजू उचलून धरण्यासाठी पक्षपाताने करू नये किंवा तसे विग्रह आपआपसात काही वेळा झाले हे लपवूही नये. काही प्रसंगी बौद्धांनी परराष्ट्रांना आपल्या भारतावर स्वाऱ्या करण्यासाठी बोलावून किंवा तशा स्वाऱ्या झाल्या असता त्यांना सहाय्य करून स्वदेशाचे स्वातंत्र्य घालविण्याचा राष्ट्रद्रोह केला खरा; बुद्ध धर्माचे भारतातून आमूलाग्र उच्चाटन होण्यास धार्मिक मतभेदापेक्षा बुद्धानुयायांत शेवटी शेवटी शिरलेली ही स्वराष्ट्रद्रोही वृत्तीच कारण झाली. बुद्धांना नायनाटून परकीयांची राज्ये शेवटी ब्राह्मण-क्षत्रियांदिकांनी उच्छेदिली नि स्वदेश स्वतंत्र केला; पण उलटपक्षी ह्याच आपल्या 'हिंदु राष्ट्राच्या' प्राचीन वैभवात, पराक्रमात, तत्वज्ञानात, साहित्यात आपल्या बौद्ध, जैन प्रभृति अवैदिक देशबांधवांनी अमूल्य भर टाकलेली आहे, अहिंसक जैनांनी रणांगणात शत्रूंशी सशस्त्र युद्धे लढून राज्ये

स्थापिली आहेत आणि प्रतिकारक हिंसा किंवा न्यायरक्षणार्थ शस्त्रधारण हे पाप नव्हे, पुण्य होय, अशी अहिंसेची योग्य मर्यादा प्रतिपादिली आहे नि आचरिली आहे. वैदिक नि अवैदिक हे दोघेही एकाच आर्यकुलांतील, एकाच रक्तबीजाचे अंकुर होते. भगवान बुद्ध आणि भगवान महावीर हे दोघेही क्षत्रियकुलांतच जन्मले होते. वैदिक-वैदिकांत काही प्रसंगी विग्रह झाला, तर उलटपक्षी काही प्रसंगी अवैदिक-वैदिकांत आणि अवैदिक-अवैदिकांतही अंतर्गत यादवी झाली, जैनाजैनांत मतभेद होऊन कलह होत. शैव-वैष्णव दोन्ही वैदिक; पण क्वचित प्रसंगी आपसात हमरीतुमरीवर येत.

हीच गोष्ट आपल्या इतिहासाच्या सामाजिक, राजकीय, साहित्यिक, आर्थिक अंगांना लागू आहे. आपल्या गौरवाचा इतिहास स्वाभिमानी लेखक स्वाभाविकपणेच उत्साहाने यथावत् लिहितो; पण आपल्या इतिहासातील दोषास्पद किंवा यादवीचे किंवा पराजयाचे वृत्तान्त लिहितांना त्याला तितक्याच स्वाभाविकपणे ते गाळण्याचा किंवा टाळण्याचा किंवा सत्यकथनास विटाळण्याचा मोह होतो. पण हिंदुसंघटक इतिहासकारांनी तो मोह आवरावा. ज्या काळात जी वस्तुस्थिती असेल ती जशीच्या तशीच लिहावी. इतिहासाचे सत्य स्वरूप लपविण्याच्या एका हास्यास्पद प्रयत्नाचे उदाहरण द्यावयाचेच म्हटले, तर काही कॉंग्रेसी मंडळीनी गांधीजींच्या विक्षिप्त दिग्दर्शनास अनुसरुन आपल्या इतिहासावर लिहिलेली चोपडी पाहावी. त्यामध्ये औरंगजेब, अल्लाउद्दीन प्रभृति शेकडो मुसलमान सत्ताधीशांनी केलेल्या हिंदूंच्या छळाचा नि त्यांच्या धर्मांध क्रूरतेचा उल्लेखसुद्धा नाही. मुसलमानी धर्म, सत्ता, सभ्यता ही किती निष्कलंक, न्यायशील नि थोर होती नि हिंदूंना चांगल्या रितीने वागविण्यासाठी मुसलमानी नवाब, शहा नि बादशहा औरंगजेबसुद्धा किती अहमहमिकेने झटत ते दाखविण्याचा विक्षिप्त यत्न त्यात केलेला आहे. हिंदु नि मुसलमान अशा दोन धर्माच्या नि राष्ट्रांच्यामध्ये एक घनचक्कर प्राणांतिक नि शतकव्यापी असे भयंकर युद्ध चालू होते आणि त्यात हिंदूंनी शेवटी मुसलमानी साम्राज्याचे तुकडे तुकडे उडविले याचा नामनिर्देशही नसतो!!

पण असा असत्य इतिहास लिहिण्याने कधी हिंदुमुसलमानांतील तेढ मिटेल? जोवर त्या इतिहासाच्या हिंदु वाचकांना आजचे ताजे वृत्तपत्र उघडताच मलबारच्या दंग्याची किंवा पाकिस्तान परिषदेची बातमी वाचावी लागते, सीमेवरच्या हिंदूंच्या गावीच त्यांच्यावर मुसलमान जमाती चालून येत आहेत, त्यांची घरे जाळीत आहेत, तोवर बिहार शरीफासारख्या अनेक दंग्यांतून मुसलमानांची आगळीक घडताच संघटनांची नवी स्फूर्ति प्यालेले हिंदु, हे मुसलमानांना दे माय धरणी ठाय करून सोडणारच! भागानगरवर हिंदुत्वनिष्ठ दळे चढाई करणारच! पाकिस्तानचे कबरस्तान करण्याचा उठाव हिंदूंकडून होणारच! पण समजा, हिंदु समाजाच्या संघटित शक्तीमुळे म्हणा किंवा इतर परिस्थितीमुळे म्हणा, मुसलमानांना 'आपण अल्पसंख्य म्हणूनच अल्पशक्ति, तेव्हा ह्या

देशात आपल्या आधीच उदार असलेल्या हिंदु बांधवांशी शक्य तो गुण्यागोविंदाने नांदावे' असे वाटले आणि हिंदु-मुसलमान तसे उद्यापासून वागत राहिले तर केवळ मागे इतिहासात एकदा खर्ड्याची लढाई झाली होती म्हणूनच काय तो मराठ्यांचा दलभार खर्ड्याकडे वारावर वार करीत थोडाच चढाई करणार आहे? संधी होताच एका महिन्यात महायुद्धे संपून राष्ट्राराष्ट्रातील शांततेचे नागरिक व्यवहार सुरळित चालू लागतात. रशिया आज जर्मनीचा मित्र होतो, तर उद्या शत्रू. राष्ट्राराष्ट्रातील संधीविग्रह केवळ इतिहासाच्या आवृत्तीची हौस असते म्हणून होत नसतात. आजच्या परिस्थितीत अनुकूल काय, प्रतिकूल काय ते पाहूनच आजचे व्यवहार चालतात. आज स्कॉटलंड-इंग्लंड-वेल्स मिळून ब्रिटन हे अभंग, एकसंघ, एकजीव राष्ट्र झाले; पण म्हणून तेथील कोणत्याही शाळांतून वा ग्रंथालयातून त्यांची परस्परांत झालेली तुंबळ स्वातंत्र्ययुद्धे, धर्मयुद्धे, वाकयुद्धे ह्यांचे सविस्तर उल्लेख असलेल्या इतिहासांना काही बहिष्कारून वा जाळून टाकलेले नाही किंवा ते मागचे कलह वाचून विद्यालय सुटताच बाहेर पडणारे इंग्लिश, स्कॉच, वेल्श विद्यार्थी एकमेकांची डोकी फोडू लागत नाहीत. कारण इतिहास शिकवितानाच त्यांना तो वाचावा कसा, उपयोजावा कसा आणि त्याचे आपल्या उन्नतीसाठी कोणते तात्पर्य काढावे हेही शिकविले जाते. म्हणूनच ते मागचे अंतर्गत यादवीचे, त्याने सत्यतेचे वृतान्त वाचलेले असताही ते आजचे एकसंघ झालेले ब्रिटन एकाच ब्रिटिश ध्वजाखाली उभे राहून 'Rule Britania! Britania Rules the waves! Britains never shall be slaves!' असे आपले राष्ट्रगीत एकस्वराने गात आहे!

'मागच्या पिढ्यांतील वैराचे सत्य जर आम्हास कळले तर या पिढीतही मनुष्ये एकमेकांचे वैर करू लागतील, म्हणून असे इतिहास लिहूच नयेत!' असे ज्यांना वाटते त्यांना कळत नाही की, कागदावर लिहिलेले इतिहास फाडले तरी ते दगडांवर कोरलेले आहेत. त्या दगडांचे चूर्ण केलेत तरी इतिहास मरतोच असे नाही. भाषेत, वाक्प्रचारातून, चालीरीतीमध्ये, जातीय स्मृतीच्या रोमारोमात तो भिनलेला असतो. मूर्तिभंजकाचे दुर्बल हात सहसा न पुरतील इतका वर आकाशात उंच उंच अशोकाच्या स्तूपावर तो विराजत असतो किंवा भूगर्भातील खोल खोल मोहोंजोदडो-सारख्या पातालमंदिरात त्याची ग्रंथालये सहस्त्रावधी वर्षे अभंगची अभंग नांदत राहतात.

शक्य तितक्या सत्यास धरून इतिहास लिहीत असता विशेषतः आपल्या हिंदुराष्ट्राच्या इतिहासामध्ये कुशल लेखकाला असे कालखंड पाडता येतील की, ज्यायोगे आपल्या हिंदुजातीची संघटना, व्यापकता, गौरव नि प्रभाव हे एकंदरीत पहिल्या कालखंडाहून अधिक सरस आणि अधिक उठावदारच होते गेले, हे वाचकांच्या ध्यानात सहजच यावे. त्यातही आपल्या हिंदुराष्ट्राचा इतिहास असा आहे की, प्रत्येक मोठ्या बहिर्गत वा अंतर्गत संकटानंतर आपण जेव्हा जेव्हा, ग्रहणामधून सूर्य बाहेर पडतो तसे,

www.savarkarsmarak.com

बाहेर पडलो तेव्हा तेव्हा आपले हिंदुराष्ट्र पूर्वीपेक्षा संख्याबळाने आणि गुणबळाने, पराक्रमाने आणि सश्रीकतेने अधिकच विशाल, विस्तृत नि भास्वान् होऊन बाहेर पडत गेले.

ह्या अशा कुशलतेने पाडलेल्या कालखंडाच्या समारोपात शेवटी त्या काळाच्या इतर देशांचीही सत्य स्थिती नि आपल्या दिग्दर्शनास अवश्य ती माहिती द्यावी म्हणजे तुलनात्मक दृष्टीनेही आपल्या सतत चढत्या-बढत्या हिंदुराष्ट्राची सत्य असेल तितकी श्रेष्ठता उठावदार दिसेल. जसे हूणांनी सारे युरोप पादाक्रांत केले, रोमन साम्राज्य धुळीस मिळविले; पण त्यांना शेवटी धूळ चारली हिंदुराष्ट्रानेच. नर्मदेखाली तर त्यांना उतरूसुद्धा दिले नाही! सारे भारतवर्ष असे त्यांना बघतासुद्धा आले नाही. तीच गोष्ट मुसलमानांची. त्यांनी अरब, सिरिया, इराण, आफ्रिका, मोगल, तार्तार, तुर्क मुसलमानमय करून टाकले. पण सात शतके झुंजुनही हिंदुस्थान हिंदुस्थानच राहिले! त्यांच्या विषारी आक्रमणाची लाट शेवटी थोपवून, फोडून, त्यांचे राजस्व उच्छेदून आपले स्वत्व राखले असे हिंदुराष्ट्रानेच काय ते? इतर प्राचीन राष्ट्रे पार पिचून मरून गेली, मुसलमानमय झाली. त्या त्या कालच्या खाल्डियन, बाबिलोन, ग्रीक, रोमनांपासून तो मुसलमानप्रभृति राष्ट्रांच्या बाहेरच्या इतिहासाची संक्षेपतः माहिती प्रथम देऊन अशी तुलना ह्या प्रत्येक कालखंडाच्या समारोपात द्यावी.

आसिंधुसिंधु भरतखंड व्यापल्यानंतर आणि एकजीव केल्यानंतर किंवा करीत असताच आपल्या हिंदुराष्ट्राच्या वैदिक आणि अवैदिक अशा दोन्ही शाखांनी धार्मिक दिग्विजय प्रचंड प्रमाणावर केला. सैबेरिया, चीन, सयाम ते मेक्सिकोपर्यंत बुद्ध, जैन, शैव, वैष्णव प्रभृति आपल्या हिंदु प्रचारकांनी आपल्या हिंदु संस्कृतिचा ध्वज फडकवीत नेला. धार्मिक दिग्विजयाप्रमाणेच हिंदुराष्ट्र हिंदुमहासागर ओलांडून जे राजकीय दिग्विजय करीत गेले तेही ज्या कालखंडात ते वृत्त घडले त्या कालखंडात सलग वर्णिले जावे. कलिंग, आंध्र, पांड्य प्रभृतिंनी आपली हिंदुराज्ये सयाम ते इंडोचायना (हिंदुचीन) आणि फिलिपाअन्सपर्यंत प्रस्थापिली. काश्मीरच्या ललितादित्यप्रभृति राजांनी उत्तरेकडे तार्तारांना शिक्षा करण्यासाठी थेट तार्तरीवर केलेल्या स्वाऱ्या, रजपुतांनी बल्खबुखाऱ्यापर्यंत केलेल्या चढाया, नेपाळने तिबेटचे केलेले पारिपत्य, अरब-इजिप्त यांपासून तो केप ऑफ गुडहोपपर्यंत सिंधुमार्गाने सतत चालू असलेले आपले व्यापारिक नौकानयन आणि अरब आफ्रिकेत स्थापिलेल्या हिंदु वसाहती इत्यादी बृहत्तर भारताचा इतिहासही त्या हिंदुराष्ट्राच्या त्या त्या कालखंडाच्या इतिहासात यथावत वर्णिला गेला पाहिजे.

हिंदुराष्ट्राच्या त्या हिंदुस्थानाबाहेरील धार्मिक नि राजकीय दिग्विजयाचा नि साम्राज्याचा इतिहास आज आपल्या कोट्यवधी हिंदुना ठाऊक नाही. पौराणिक कथा काही माहीत आहेत; पण ह्या सामान्य जनतेस त्यातील ऐतिहासिक अर्थ विवेचिता येत नाही. ह्यास्तव ह्या बृहत्तर भारताच्या इतिहासाची निरनिराळी लहान नि चटकदार पुस्तके

प्रचारकांसाठी लिहिली जावीत. सयामातील हिंदुराज्य, चीन-जपानमध्ये बौद्धधर्माचा प्रसार अशा एकेक प्रकरणावरील पुस्तिका प्रत्येक हिंदु तरुणास वाचावयास मिळाल्या पाहिजेत.

इतिहास वाचावा कसा? - हिंदुराष्ट्राचा हिंदुसंघटनीय दृष्टीने लिहिलेला असा सत्य, असा यथावत् इतिहास लिहावा कसा हे सांगण्यापेक्षाही तो वाचावा कसा हे स्पष्टविणे आपल्या आजच्या परिस्थितीत अत्यंत अवश्य आहे. हिंदुराष्ट्राचा इतिहास उचलताच प्रथमतः ही भावना मनात उद्भवली पाहिजे की, हा माझ्या अखिल हिंदु जातीचा इतिहास आहे. तो केवळ ब्राह्मणांचा नव्हे, केवळ जैनांचा, लिंगायतांचा, आर्यांचा वा द्रविडांचा, बंगालचा वा गुजराथचा नसून मागे वर्णिल्याप्रमाणे तो आज ह्या सर्वांचे व्यक्तित्व ज्यात विलीन झालेले आहे, हे सर्व प्राचीन अर्वाचीन घटक मिळून जे समन्वित, संघटित, एकजीव असे 'हिंदुराष्ट्र' बनले आहे, त्या हिंदुराष्ट्राचा आहे, अखंडनीय हिंदुस्थानाचा आहे. यातील गुण, दोष, मान, अपमान हे आता आपणा हिंदुमात्राची सामाजिक मत्ता झालेली आहे. पूर्वी प्रांताप्रांताची स्वतंत्र राज्ये असत; पण आता ती सर्व मिळून एक अखंड हिंदुस्थान हेच काय ते सर्वांचे एक नि अनन्य राष्ट्र, एक नि अभंग देश, आमची सर्वांची पितृभू नि पुण्यभू झालेली आहे. शीखांचे अमृतसर, वैदिकांची काशी, बौद्धांची गया ही सारी आम्हा हिंदुंची सामाईक नि सारखीच पूज्यक्षेत्रे, होत. आमच्या भूतकालीन निरनिराळ्या उपराष्ट्रांची जात-गोत-पंथांची सामाईक अभिधा व्यक्तविण्यासाठी आसिंधुसिंधु अशी ज्याची विशाल व्याप्ती आहे तो 'हिंदु' शब्द प्रचलित झाला. आपल्या भूतकालीन सर्व लहानसहान उपराष्ट्रांचे नि राज्यांचे एकीकरणच नव्हे तर एकजीवीकरण होऊन हे 'हिंदुराष्ट्र' प्रकटले आहे.

हिंदुराष्ट्राच्या इतिहासाचे खरे स्वरुप आकलण्यास्तव सामष्टिक भावनेच्या प्रकाशातच तो जसा वाचला पाहिजे तसेच आपण जो वाचीत आहो तो इतिहास आहे ही जाणीव एकसारखी जागृत ठेविली पाहिजे. जे मागे घडले ते ह्यात यथावत नि यथाप्रमाण लिहिलेले आहे. आज काय घडावयास पाहिजे ते भूतकाल सांगणारे नसून तो प्रश्न आपण सोडविला पाहिजे. वर्तमानकालाने भूतकालात त्या त्या वेळच्या भिन्न भिन्न परिस्थितीप्रमाणे आपल्या तत्कालीन पूर्वजांना जे जे योग्य वाटले ते ते त्यांनी केले. आज जर परिस्थिती भिन्न असेल तर धार्मिक, सामाजिक वा राजकीय प्रकरणी आपण आपल्या हिंदुराष्ट्राच्या हिताला जे अनुकूल असेल तेच आचरिले पाहिजे. त्या त्या विगत कालखंडात आमचे आपसात काही धर्मकलह झाले असतील, जैन बौद्धांशी भांडले असतील, ब्राह्मण-क्षत्रियांचे कलह क्वचित झाले असतील, ब्राह्म-क्षात्र शक्ति एकत्र होऊन वैदिक अवैदिकांशी झगडले असतील, त्या वेळेस उत्तर सम्राट श्रीहर्ष आणि दक्षिण सम्राट श्रीपुलकेशी ह्यांच्या एकमेकावर स्वाऱ्या झाल्या असतील; पण भूतकालात हे घडले म्हणून आज ती जुनी वैरे का कोणी उकरून काढणार आहे? त्या काळी काही परिस्थितीत आज अन्याय्य वा

अवास्तव ठरणाऱ्या रूढी किंवा जातिधर्म हे त्या त्या मागच्या कालखंडात किंचित अत्यंत आवश्यक किंवा अपरिहार्य किंवा उपकारकही ठरले असतील; पण तेवढ्यासाठीच काय त्या त्या रूढी किंवा ते ते जातिधर्म आजही आपण पाळावयाचेच की काय? पूर्वीपासून हिंदुराष्टाच्या एकीकरणाची, पकटीकरणाची जी महान प्रक्रिया आश्चर्यकारक बुद्धिमत्तेने नि प्रबलतेने आपल्या पूर्वजांनी चालविली तिलाच अनुसरून हिंदुराष्ट्राच्या संघटनास आजच्या परिस्थितीत अस्पृश्यता, जन्माधिष्ठित जातिभेद इत्यादी अनेक चालीरीतींना नि जातिगत धर्माधर्मांना आम्ही ते आज विघटक होतात म्हणून, बदलेले पाहिजे. बुद्धधर्माची नि वैदिकधर्माची ज्या काल खंडात काही धार्मिक नि बहुतांशी राजकीय नि राष्ट्रीय कारणांनी लढाई जुंपली नि शेवटी बौद्धाचा पाडाव होऊन त्यांच्यापासून त्या काळी कोसळू पाहणारे राष्ट्रीय संकट निवारले गेले; तेव्हा पुढच्या कालखंडात हिंदुराष्ट्राच्या समन्वयप्रकियेमध्ये त्याच भगवान् बुद्धांना दहावा अवतार म्हणून समावेशिले गेले! तेव्हा हिंदुराष्ट्राचा इतिहास वाचताना हिंदुसंघटकांनी अशा समन्वय दृष्टीने वाचावा. भूतकालातील कोणत्याही घटनेची चिकित्सा वर्तमानकालाचे उपनेत्र लावून करू नये. तर ज्या कालखंडात ती घटना किंवा तशा विभिन्न समाजरचना होत्या, त्या कालाच्या परिस्थितीच्या प्रकाशात त्या निरीक्षाव्यात. त्याचे मूल्यपान, त्या चांगल्या होत्या की वाईट की अपरिहार्य हे ठरविण्याचा खरा निकष, म्हणजे त्या काळची परिस्थिती; आजची नव्हे. उलट पक्षी आज कार्य काय, अकार्य काय हे मुख्यतः ठरविले पाहिजे. आजच्या परिस्थितीप्रमाणे ही चेतावणी (Warning) प्रत्येक हिंदुसंघटक इतिहास लेखकानेच आपल्या ग्रंथाच्या समारोपात सयुक्तिकपणे देत जावी. कोण्या धर्मपंथात मागे कलह असेल किंवा कोणत्या उपजातीतील काही व्यक्तींनी वा गटांनी एखादेवेळी त्या काळच्या परिस्थितीत निंद्य धोरण स्वीकारले असेल; पण म्हणून ती जातची जात किंवा पंथाचा पंथ केवळ तेवढ्याचसाठी निंदनीय समजला जाणे अगदी अश्लाघ्य आहे. आजच्या परिस्थितीत जे निंद्य किंवा देशघातक तेवढेच आज त्याज्य. जे आज देशहितकारक ते आज आचरणीय. मागच्या इतिहासातील घटनांना उल्लेखितानासुद्धा ही काळजी अवश्य घ्यावी की, आमच्या आपसातील कलहाचा कोळसा पुन्हा पुन्हा उगाच उगाळत बसण्याचे शक्यतो टाळावे आणि ज्या घटनांच्या वर्णनाने आजचे आपले हिंदुसंघटनाचे कार्य अधिक बळकट होईल, हिंदूची परस्परप्रीती, सहकार्य, एकराष्ट्रीयत्वाची भावना ही वाढीस लागतील, अशाच आपल्या सर्वांच्या गौरवाच्या गोष्टी, आज उपकारक ठरणाऱ्या राष्ट्रीय कुलकथा, आजच्या लेखातून उल्लेखिल्या जाव्या. अगदी अवश्यच झाले तरीही मागे झाले-गेलेले कुलकलह उल्लेखावयाचे तर हळुवार हाताने अवश्य तितकेच निदर्शिले जावे की, ज्यायोगे कोणाच्या मनास फारसे न लागता त्या उल्लेखाचे काम भागावे आणि तरीही पुन्हा पुनरुक्तीचा दोष पत्करूनही तेथल्या तेथेच सांगावे की, ही गतकालाची कथा; आज पुन्हा तो दोष घडू नये

म्हणूनच हा उल्लेख केला. आज आपण हिंदुमात्र एकजीव अशा महान् राष्ट्रात एकसंध झालो आहोत आणि आज ते सारे विघटक वाद मिटलेले आहेत नि मिटलेच पाहिजेत.

* * *

# शिवछत्रपतींचा जयजयकार!

**रथस्यैकं चक्र भुजगयमिताः सप्त तुरगाः।**
**निरालंबो मार्गश्चरणहितः सारथिरपि।।**
**रविर्यत्येवान्तं प्रतिदिनमपारस्य नभसः।**
**क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे।।**

छत्रपति शिवरायांचा जन्मच अशा परिस्थितीत झाला की, सामान्य माणसाला शिवरायांनी जी गोष्ट प्रत्यक्ष केली ती गोष्ट नुसत्या कल्पनेने भाविता येणेही अशक्य होते. वर उद्धृत केलेल्या श्लोकात 'क्रियासिद्धीः सत्त्वे भवति महतां नोपकरणे' या सनातन तत्वाचा सिद्धान्त स्थापन करण्याकरिता कवीने जे उदाहरण घेऊन समस्यापूर्ति केली, त्या कवीच्या वेळी जर श्रीशिवराय आणि त्यांचे चरित्र हे अस्तित्वात असते तर वरील सूर्याचे उदाहरण नि तत्सदृश मदनाची इत्यादी आणखी तीन उदाहरणे तीन श्लोकात न देता केवळ श्रीशिवरायांच्या चरित्राचेच उदाहरण त्याने दिले असते, इतके श्रीशिवरायांचे कार्य हे कठीण होते. आजपर्यंत जगाच्या इतिहासात सामान्य बुद्धीला आणि शक्तीला अशक्य वाटणाऱ्या काही अपूर्व गोष्टी अलौकिक अवतारांनी करून दाखविल्या, श्रीशिवरायांनी जे कार्य केले ते सर्वथैव तशाच अलौकिक कोटीतले होते. आजपर्यंत कित्येकांची अशी समजूत आहे की, शिवरायांनी स्वराज्यस्थापना जी केली त्यात काय मोठेसे आहे? मोडकळीस आलेल्या विजापूरकरांशी नि आतून पोखरत चाललेल्या सत्तेशी झुंज करून सह्याद्रीच्या एका कोपऱ्यात एक लहानसे राज्य त्याने निर्माण केले, ह्यात एवढे ते काय मोठे शतकृत्य! त्याचे एवढे ते काय देव्हारे माजवावयाचे!

वरील आक्षेप घेणारे लोक एक तर इतिहासात अज्ञानी असतात किंवा काही तरी स्वतःचा स्वार्थी विवक्षित हेतु डोळ्यापुढे ठेवून वरीलप्रमाणे लिहीत आणि शिकवीत असतात. तेव्हा शिवाजीमहाराजांविषयी ज्याला सत्य इतिहास पाहावयाचा असेल त्याने ही अंधपरंपरा नि परप्रत्ययनेय बुद्धी टाकून देऊन स्वतंत्रपणाने श्रीशिवरायांचे चरित्र आणि कार्य यांचे निरीक्षण केले पाहिजे. शिवाजीमहाराजांच्या प्रचंड कार्याची कल्पना येण्यास केवळ दादाजी आणि मालोजी येथपर्यंतचीच परंपरा पाहून चालावयाचे नाही.

श्रीशिवाजीमहाराजांचे कार्य समजून घेण्यास काही केवळ भोसले कुळाचा इतिहास चाळून चालावयाचे नाही. ते कार्य आणि त्याचे महत्व पाहावयास प्रथम हिंदु जातीने आणि हिंदुस्थानने त्याच्यावर झालेल्या परकीय आक्रमणाला विरोध करण्याचा प्रयत्न थेट दाहिर -- पृथ्वीराजापासून जो केला नि पृथ्वीराजाच्या पतनानंतर ठायी ठायी हिंदुत्व रक्षण करण्याकरिता जे अनंत झगडे सुरू झाले, त्यांचाही इतिहास लक्षात घेतला पाहिजे. सातव्या-आठव्या शतकात सिंध देशावर मुसलमानांचे पहिले आक्रमण झाले. तेव्हापासून बाराव्या शतकाच्या अखेरपर्यंत म्हणजे जवळजवळ सहाशे वर्षे मध्यआशियातील नि इराण-अफगाणिस्तानातील काही धर्मवेडाने, काही राज्यलोभाने, काही पोट भरण्याकरिता, काही लूट मारण्याकरिता ज्या मुसलमानांच्या स्वाऱ्या चालल्या होत्या नि ज्यांचे अंतिम ध्येय हिंदुस्थानची हिंदु सत्ता नामशेष करून यवनांचा चांद सबंध हिंदुस्थानभर फडकविण्याचा होता, त्या स्वाऱ्यांशी सतत सहाशे वर्षे हिंदु जातीने टक्कर दिली. आणि ह्या सहाशे वर्षाच्या स्वरक्षक युद्धाचा अखेर परिणाम असा झाला की, ११९३ मध्ये हिंदुस्थानची सार्वभौम मानली गेलेली दिल्लीची सत्ता ही नामशेष झाली. हजारो हजार वर्षांपासून अखंड स्वातंत्र्य, अखंड स्वराज्य, अखंड सुख भोगीत असलेल्या आणि त्याच्याच अतिरेकाने विसंघटित, आळशी नि सुखलोलुप हिंदु जातीला यवनांचे झालेले हे आक्रमण केवळ प्राणसंकटच वाटले. ११९३ साली पृथ्वीराज पडला नि त्यानंतर केवळ १०० वर्षांच्या आतच सबंध उत्तर हिंदुस्थान यवनमय होऊन प्रत्यक्ष काळालाही काळ भासणारे राजपुतान्यातील सर्व रजपूत काही किरकोळ अपवादाने पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे पटापट यवनी सत्तेपुढे विलयाला गेले. आणि बरोबर शंभर वर्षांनी विंध्य पर्वताच्या अलीकडे दक्षिण हिंदुस्थानात यादवांचे प्रबळ राज्य जणू क्षणार्धात रसातळाला गेले. नंतर काही थोड्याच वर्षांच्या अवधीत इस्लामचा घोडा अप्रतिहत वेगाने रामेश्वरचे पाणी प्याला. एखाद्या पुराण जातीची आणि संस्कृतीची जशी मरणाची वेळ यावी तद्वतच प्रत्यक्ष मरणाचीच वेळ हिंदु संस्कृतीस नि हिंदु जातीस त्या वेळी आलेली होती. अशाच तऱ्हेची विगलित अवस्था एका काळी बलाढ्य रोमला प्राप्त झाली आणि त्याच्या सर्व वैभवासह ते रोम आणि इतरही तसलीच वैभवसंपन्न राष्ट्रे पृथ्वीतलावरून पुसटून जाऊन काळाच्या भक्ष्यस्थानी पडली. तीच अवस्था बाराव्या शतकापासून हिंदु जातीची होऊ लागली होती. उतरणीला लागलेला गाडा जसा शतगुणित वेगाने खाली खाली घसरत जातो, त्याचप्रमाणे हिंदु जातिही वैभवशिखरावरून खाली खाली घसरत थेट मृत्युच्याच जबड्यात अतीव वेगाने घुसत आहे असे भासू लागले होते. सर्व मोठमोठी हिंदु राज्ये तर नामशेष झालीच होती; परंतु काही काळपर्यंत विजयनगरला हिंदु स्वातंत्र्याचा जो दीप अडीच शतके विवक्षित भागात का होईना, स्वातंत्र्याचा प्रकाश देत होता, तोही तालिकोटच्या रणामध्ये हिंदु जातीच्या दुर्दैवाच्या प्रभंजनाने मालवून गेला. तेव्हापासून हिमालयापासून रामेश्वरपर्यंत आणि

सिंधुनदीपासून तो ब्रम्हपुत्रेपर्यंत सर्व हिंदुस्थानभर पारतंत्र्याचा, निराशेचा, हतबलत्वाचा गडद अंधार पडला आणि सबंध हिंदुस्थान हे एखाद्या नुकत्याच मरण पावून प्रेत बाहेर काढलेल्या धन्याच्या घराप्रमाणे मृत्यूच्या छायेने उदास, भयाण, ओसाड भासू लागले. प्रत्यक्ष काशीचा विश्वेश्वर आणि अयोध्येचा राम हे स्थानभ्रष्ट होऊन अवमानित झाले होते आणि तोडरमल्लासारखी राजकार्यधुरंधर बुद्धी, राजा मानसिंगासारखे दुर्दमनीय शौर्य, तानसेनासारखे स्वर्गीय गायन आणि पंडित जगन्नाथरायासारखी अलोट विद्‌वता आणखी मनाला मोहून टाकणारी कविता ही सर्व हिंदूतील सद्‌गुणमालिका परकीयांच्या पायापाशी दासीप्रमाणे राबत होती. यःकश्चित् मनुष्यासारखा मनुष्य परंतु तो दिल्लीच्या मुसलमानी गादीवर आरूढ होऊन 'दिल्लीश्वर' झाल्याकारणाने प्रत्यक्ष 'जगदीश्वर' वाटावयास लागला होता आणि त्या 'जगदीश्वरा'च्या पायापाशी आपली मान, आपला अभिमान, आपले चित्त, आपले वित्त, इतकेच काय, परंतु आपले कलत्र देखील अर्पण करण्याइतकी हीन दास्याची वृत्ति त्या वेळच्या उत्तम गणलेल्या हिंदु समाजातल्या मोठमोठ्या व्यक्तींनी निर्लज्जपणे अंगिकारिली होती. सारांश, सगळ्या हिंदु जातीवर मरणाची अवकळा आली होती, नाकाशी सूत धरले होते.

अशा वेळी 'पृथ्वी आंदोळली! धर्म गेला!' अशी संतप्त हृदयाची करूण हाक सर्व हिंदुस्थानभर निराश झालेल्या हतभागी लोकांना क्षणोक्षणी ऐकू येत होती आणि तरीही कोणी हिंदु ही हाक ऐकून तिला ओ देण्याइतका समर्थ नव्हता. फार फार तर सरदार व्हावे, 'प्याद्‌याचा फर्जी व्हावे,' फार फार तर यवनी सिंहासनाला मुजरा करण्याचा मान मिळावा, एवढीच आकांक्षा त्या वेळच्या हिंदुजातीतील तरूण पिढीमध्ये दृग्गोचर होत होती. हिंदूच्या ह्या अत्यंत हीन आणि दीन अशा अवनतीबरोबरच मुसलमानांच्या ऐश्वर्याची, सत्तेची आणि पराक्रमाची कमान चढती होती. उत्तर हिंदुस्थानात तर मोगल बादशहाची सत्ता अप्रतिहत रीतीने स्वर्गात प्रत्यक्ष इंद्र जसा प्रबळ त्याप्रमाणे सिंहासनारूढ झाली होती. आणि दक्षिण हिंदुस्थानात बहामनी राज्याचा विस्तार होऊन त्याच्याच पाच प्रबळ शाखा सबंध दक्षिण हिंदुस्थान व्यापून बसल्या होत्या.

कोठेही अल्पसा सुद्धा आशेचा किरण निरीक्षून निरीक्षून देखील दृष्टिपथात येत नव्हता. हिंदु लोकांच्या मनोवृत्तीवर निराशेची इतकी छाप बसली होती की, प्रत्यक्ष अहमदनगरचे निजामशाहीचे सिंहासन स्वतःच्या पराक्रमावर ज्याने हस्तगत केले, त्या शहाजींना त्याच सिंहासनावर स्वतः बसणे हे कसेसेच वाटू लागले आणि मुसलमानी बादशहाचे एक नाममात्र बालक मांडीवर घेतल्यावाचून त्यांना सिंहासनावर आपली मांड स्थिर ठेवता आली नाही. इतकी आत्मवचंना, इतकी निराशेची परिसीमा, इतकी अवनतीची शेवटची खोली हिंदु जातीला त्या वेळी प्राप्त झाली होती.

अशा परिस्थितीमध्ये सतरावे शतक उजाडले आणि प्रभू शिवरायांचा जन्म झाला. सामान्य तर काय, परंतु असामान्य दृष्टीलाही या वेळी स्वराज्याची, हिंदवी राज्याच्या स्थापनेची कल्पना; मृगजळाप्रमाणे अशक्य वाटत होती. भोवतालची सर्व परिस्थिती अशी निराशाजनक असताही शिवरायांच्या मनामध्ये हिंदवी साम्राज्याचे जे गगनगामी गंभीर विचार अगदी कुमार अवस्थेपासून उद्भूत झाले, यातच शिवाजीमहाराजांचा अद्भुतपणा! वयाच्या केवळ तेराव्या वर्षी की, ज्या वेळी सामान्य बालके एकटी अंधारात जायला भितात आणि ज्ञानाचे श्रीगणेशाचे धडेही आकलन करण्यास असमर्थ असतात, त्या वेळेला शिवाजीमहाराजांनी देशातील पारतंत्र्याच्या गडद अंधकारात त्याचे उच्चाटन करण्याकरिता उडी घातली आणि स्वातंत्र्यसंपादनाचे दिव्य धडे त्यांनी आपल्या सवंगड्यांना देण्याला आरंभ केला. ‘प्रतिपच्चचंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्वन्दिता। शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते’ असल्या भव्य महत्त्वाकांक्षेने ज्याच्या आयुष्याचे ध्येय वयाच्या केवळ तेराव्या वर्षीच निश्चित झाले होते ते शिवराय असामान्य, अलौकिक होते ह्यात काय संदेह आहे?

तेव्हा शिवरायाच्या चरित्राची कामगिरी तोलताना केवळ शहाजी-मालोजी पर्यंत परंपरा पाहून किंवा भोसले कुळाचाच इतिहास लक्षात घेऊन चालायचे नाही; तर त्याच्या पाठीमागे अनेक शतकांच्या परंपरेला नि हिंदूंच्या अनंत कुळाच्या इतिहासाला यथावत् जाणले पाहिजे म्हणजे शिवचरित्राचे खरे अद्भुतपण लक्षात येईल. त्याचप्रमाणे अशी एक भ्रांतिकारक कल्पना वर लिहिल्या गेलेल्या इतिहासातून बिंबविली जाते की, विजापूरकरांचे राज्य हे मोडकळीस आले होते आणि त्या मोडकळीस आलेल्या अव्यवस्थित राज्यामध्ये शिवाजीने आपली ‘पुंडाई’ चालू केली यात काय शौर्य आहे? परंतु हे विधान सर्वथैव असत्य आहे. त्या वेळी विजापूरची आदिलशाही ही मोडकळीस तर आली नव्हतीच; परंतु तिच्या काळातील एक उत्कृष्ट काळ होता. नुकतेच बुडविलेले शेजारच्या मुस्लिमशाहीचे राज्य अर्धेअधिक घशात घालून नि शहाजीमहाराजांच्या पराक्रमाने प्राप्त झालेला कर्नाटक आपल्या राज्याला जोडून विजापूरची आदिलशाही तिच्या इतिहासातील ‘न भूतो न भविष्यति’ अशी विस्तार पावली होती. उत्तरेतल्या मोगल बादशहाच्या खालोखाल जर कोणती एखादी मुसलमानी सत्ता त्या वेळी अस्तित्वात होती तर ती विजापूरची आदिलशाहीच होती. कुबेराची संपत्ती विजापूरच्या कोशागारात अविरतपणे वाहत होती. कर्नाटकाच्या संपन्न धनकनकाचा संग्रह होत होता. विजापूरचे चतुरंग सैन्य रणदुल्लाखान, मुरार जगदेव, शहाजी राजे ह्या रणकुशल सेनापतींच्या आधिपत्याखाली दिग्विजय करीत होते. दक्षिण हिंदुस्थानमध्ये अग्रपूजेचा मान विजापूरच्या सत्तेचाच होता आणि जर शिवाजी झाला नसता, तर थोड्याच वर्षात अखिल हिंदुस्थानच्या अग्रपूजेचा मान कोणाचा? उत्तरेकडील मोगल बादशाहाचा की दक्षिणेतील विजापूरच्या बादशहाचा, हा प्रश्न सोडविण्यास दोन्ही यवनी सत्तांमध्ये तुमुल युद्ध झाले असते.

या सिंहावलोकनावरून हे ध्यानात येईल की, विजापूरचे राज्य मोडकळीला आले होते म्हणून शिवाजीमहाराजांचा प्रयत्न यशस्वी झाला असे नव्हे तर शिवाजीमहाराजांचा प्रयत्न यशस्वी झाला म्हणून विजापूरची प्रबळ आदिलशाही मोडकळीस आली. शिवाजीने पोखरून ठेवलेल्या ह्या आदिलशाहीच्या आहुतीचा स्वाहाकार पुढे औरंगजेबाला लीलेने करता आला. आदिलशाही मोडकळीला आलेली असती तर मलिकंबरासारख्या, लखूजी जाधवासारख्या, शहाजीराजांसारख्या, निजामशाहीतील प्रबल सरदारांच्या फटक्यासरशी ती गारद झाली असती. शहाजहानच्या पहिल्या स्वारीच्या तडाख्यालाच ती मोगल सत्तेला बळी पडली असती; परंतु जे कार्य निजामशाहीला करता आले नाही, बेदरच्या बरीदशाहीला करात आले नाही, उत्तरेतल्या शहाजहानला करता आले नाही, ते अत्यंत अवघड कार्य शिवरायाने मोठ्या धाडसाने हातामध्ये घेतले आणि ते कशाच्या साह्यावर? विजापूरच्या कुबेराच्या धनापुढे तोरणा किल्ल्यातील दगडमाती खणता खणता सापडलेल्या एका क्षुद्र हंडाभर मोहरांच्या! विजापूरच्या सुसज्ज चतुरंग सैन्याशी मरणमारणाची देवघेव करण्याकरिता कृश देह धारण करणाऱ्या, वनवनांतरी जीवित कंठणाऱ्या, भुकेने तडफडणाऱ्या काही मावळ्यांच्या पथकांच्या! रणदुल्लाखानासारख्या आणि मुरार जगदेवासारख्या वयेची वये राजकारणात आणि मुत्सद्दीपणात घालविलेल्या राजकारण धुरंधरांशी कारस्थाने केली ती विशीच्या आतील असलेल्या अननुभवी तानाजी, मोरोपंत इत्यादी अल्लड तरूणांच्या संगनमताने! हे द्वंद्व असमान नव्हे काय? असे असूनही या द्वंद्वामध्ये शिवरायाने यश मिळविले!

आणि अशी ही असमानेची 'झुंज' एकीकडे विजापूरकरांशी लढत असता त्यातच शिवाजीचे धैर्य, शौर्य हे आटले का? नाही; तर एकाहाताने विजापूरच्या यवनी सत्तेची दाढी प्रतापगडावर, पन्हाळ्यावर, पावनखिंडित हिसडीत असताच आणि त्या हिसडण्यानेच विजापूरच्या यवन बादशहाच्या मस्तकावरी मुकुट कंपायमान होत असताच, शिवरायाने निर्धास्तपणे आणि अतुल आत्मविश्वासाने त्यांच्या पूर्वपिढ्यांना 'जगदीश्वरा' प्रमाणे वाटणाऱ्या दिल्लीश्वराला सुद्धा त्याच्या दाढीला हात घालून गदगदा हलवून सोडले ज्या दिल्लीश्वराच्या केवळ भ्रुकुटिक्षेपाने दुबळ्या झालेल्या हिंदु राजांचे मुकुट स्थानभ्रष्ट होऊन गळून पडत आणि ज्याच्या कोपाच्या भयाने मी मी म्हणविणारे जयसिंहासारखे रजपूत वीर गर्भगळीत होत असत, त्या अखिल हिंदुमात्रास भयविषय झालेल्या मोगल बादशहास शिवाजीच्या भयाने चिंताक्रांत करून सोडले.

पण केवळ अशा पराक्रमानेच शिवाजीमहाराज थोर म्हटले गेले काय? जर केवळ एका पराक्रमानेच ते थोर असते तर त्यांचे आज एवढे देव्हारे माजले नसते. कारण केवळ पराक्रमीच असणारे अनेक हिंदू त्या वेळी यवनी 'सेवेत' राबत होते; परंतु त्यांचे देव्हारे कोणी माजविले नाहीत. एकटा पराक्रम काही मृत राष्ट्र जिवंत करू शकत नाही; काही

स्वातंत्र्य मिळवीत नाही; तर त्या पराक्रमाला कोणत्या तरी दिव्य ध्येयाचे आणि युद्धकौशल्याचेही साह्य हवे असते.

शिवरायानेही मुसलमानी लढण्याची आपल्याला अनुकूल अशी एक नवीन पद्धत शोधून काढली. मुसलमान हे समोरासमोर तलवारीचे युद्ध करण्यात मोठे निष्णात असत. त्यांचा धिप्पाड देह, पुष्ट शरीर आणि अचाट शक्ति ह्यांच्या योगाने रजपुतांविना इतर हिंदु जाति त्यांच्यापुढे हीनबळ ठरल्या. मुसलमानांची लांब तलवार समोरासमोर येताच ती अधिक प्राणघातक होऊ लागली. प्रत्यक्ष रजपूतही त्या तलवारीच्या युद्धात फार फार तर बरोबरी करू लागले; पण बरोबरी केल्यानेच काही शत्रू मरत नाही ही गोष्ट लक्षात घेऊन शिवरायाने मुसलमानांच्या प्रखर समशेरीच्या आणि प्रचंड देहाच्या आटोक्याबाहेर राहून अमोघ प्रहार करणाऱ्या भाल्याच्या शस्त्रावर अधिक भर दिला. त्यामुळे तलवारीच्या लांबीबाहेर उभे राहून आपल्या त्रिशूळासारख्या तीव्र भाल्याचा नेम अचूकपणाने मारण्यात बुटक्या मावळ्याचे तरबेज झालेले डोळे मोगल पठाणांच्या हृदयावर आघात करण्यास समर्थ झाले नि यवनी सैन्य मराठ्यांशी अंगलट करण्याच्या आधीच हतप्रभ होऊ लागले. ही 'मराठी भाल्याची फेक' केवळ सह्याद्रीच्या गिरिशिखरावरून, पठारावरून आणि दऱ्याखोऱ्यामधून लंगोट्या मावळ्यांच्या हातांनीच यशस्वी झाली असे नव्हे तर ज्या वेळी लंगोट्या मावळ्यांचे क्षुद्र पथक वाढतवाढत थोरल्या बाजीरावांच्या काळी गंगेच्या प्रचंड ओघाप्रमाणे हिंदुपदपादशाहीच्या चतुरंग दळाच्या योग्यतेला पोचले, इकडे हिमालयाचा पायथा गाठला नि तिकडे अटकेला भिडले तेव्हा सिंधु नदीच्या वाळवंटात भाल्याच्या काठीवरच भगवा झेंडा रोवला.

सैनिक-वेषातही शिवाजीमहाराजांनी कल्पकता दाखविली. यवनांच्या ऐषारामी भरगच्चीच्या किनखाबी अगडबंब अंगरख्याला गुंडाळून शिवाजीने मावळ्यांना अंगासरशी असलेली हातभर बंडी दिली आणि अघळपघळ रूळणाऱ्या पायजम्यांना चाट देऊन सुटसुटीत आणि खुटखुटीत असा मांडचोळणा घालणारी मावळ्यांची सेनाही तशीच सुटसुटीत बनली. यवनांच्या सैन्याचा पसारा, त्यांचे शिबिर म्हणजे एक मोठे नगरच वसावयाचे; त्याला हैराण करण्यासाठी शिवरायांनी आपल्या मावळ्यांच्या सेनेला वाऱ्याप्रमाणे भराऱ्या मारायला शिकविले.

अशा रीतीने दूरवेधक शस्त्र, सुटसुटीत वेष, चपल सैन्यरचना योजून या प्रत्येक प्रकरणी यवनी सैन्यापेक्षा आपले सैन्य शिवरायाने अधिक समर्थ केले आणि मग अशा सैन्याला झेपेल अशी युद्ध करण्याची नवी पद्धती त्यांनी अंगीकारिली. ही पद्धती म्हणजे मराठ्यांची प्रसिद्ध 'गनिमी काव्या'ची पद्धत, 'वृकयुद्ध' होय. सहज पेलता येण्यासारखे भाल्याचे शस्त्र, सुटसुटीत वेष, वाऱ्याप्रमाणे भटकणारे चपल तट्टू यांनी सिद्ध झालेले शिवरायांचे मूठभर हिंदु सैन्य मुसलमानांच्या हजारो हजार अवाढव्य सैन्यावर आकाशातून

वीज पडावी तसे तुटून पडे, विजेप्रमाणे जाळपोळ करीत डोळ्याचे पाते लवते न लवते तो एकदम कुठेच्या कुठे अंतर्हित होऊन जाई. एखाद्या ज्वालामुखीच्या पृष्ठभागावर हरिततृणांनी आच्छादिलेली भूमि पाहून ज्या निर्धास्तपणाने अजाण पांथस्थ निवास करतात, त्याच निर्धास्तपणाने यवनांची सेना महाराष्ट्राच्या भूमीवर विश्रांती घेत पडत, त्याच वेळी ज्वालामुखीचा अकस्मात स्फोट व्हावा नि त्यातून अग्निरसाचे लोट वाहू लागावेत तद्वत 'हर हर महादेवा'च्या प्रचंड, गर्जनेत मावळ्यांचे कर्दनकाळ भासणारे सैन्य दऱ्याखोऱ्यातून उफाळावे आणि मुसलमानांना हत्यारे पकडण्याचा अवसर न देता तुडवीत, बडवीत, लुटालूट करीत पुनः कुठल्याशा अज्ञात दिशाविदिशांत विलीन होऊन जावे. उलटपक्षी चढाई करता करता मुसलमानांचे सैन्य न झेपेल इतके मोठे भासले की, लगेच तडक माघारा पाय घ्यावा, मागे हटावे नि जवळपास असलेल्या किल्लेखोऱ्यात गडप व्हावे किंवा कैक वेळा असे मागे हटता हटता तात्कालिक विजयाने फुगून गेलेले यवनी सैन्य विस्कळीत दिसताच पुनः उलटून पडून घे घे मार करीत पराजयाचे जयामध्ये रूपांतर करावे. शत्रूची असावध आघाडी मारावी, ती सावध होताच तेथून निसटून त्याच्या पिछाडीस दत्त म्हणून उभे राहावे आणि तीही मारून शत्रूची यथेच्छ लूट मिळवून शहाजोगपणाने यवनी सैन्याला वाकुल्या दाखवीत आपापल्या गडकोटात निघून जावे. अशी ही गनिमी काव्याची पद्धत शिवाजीराजांनी त्या वेळच्या युद्धकलेत प्रचलित केली. त्या वेळच्या युद्धशास्त्रामध्ये त्यांचे अपूर्व योजकपण, अपूर्व कौशल्य आणि अपूर्व समयज्ञता दिसून आली.

भूमीवरच्या सैन्याची अशी नवीन थाटाची उभारणी करून शिवाजीमहाराजांची कुशाग्र बुद्धि थांबली नाही, तर त्यांनी त्या वेळेपर्यंत कोणाही मुसलमान राजाने लक्षात न घेतलेली एक नवीन शक्ती निर्माण केली. आणि ही शक्ती म्हणजे सिंधु-सैन्याची. तोपर्यंत मुसलमानी सत्तेत मोठे नौकादल म्हणजे मोंगलांचे नि त्यांचा नौकादलाधिपती कोण? तर म्हणे जंजिऱ्याचा सिद्दी! ह्या सिद्दीने मक्कामदिनेचे यात्रेकरू सुरक्षित आणण्यानेण्यापलीकडे नि सामान्य व्यापार चालविण्यापलीकडे काही एक कार्य केले नाही नि त्यामुळे मुसलमानांच्या आरमाराचा धाक युरोपियन सिंधु-सैन्यास वाटत नसे, किंवा त्याचे मोगली सत्ता वाढविण्यास साह्य झाले नाही; परंतु शिवाजीमहाराजांनी ज्या समुद्रावर सबंध कोकणपट्टीत एकही नाव मराठ्यांच्या नावाने वावरत नव्हती तेथे केवळ दहा-पंधरा वर्षांच्या अवधीत एक व्यवस्थित, अत्यंत धाडसी नि पाश्चात्यांच्याही नौकादलास आणि त्यांच्या चांचेगिरीस धाक वाटावा असे एक नौकादल - एक सिंधु-सैन्य निर्माण केले.

शिवरायांनी सर्व कोकणपट्टी निरीक्षून अत्यंत कुशलपणाने आणि जन्मजात दूरदृष्टीने मालवण, विजयदुर्गासारखे अभेद्य जलदुर्ग बांधून ठिकठिकाणी माऱ्याच्या जागांवरून एकीकडे समुद्र, दुसरीकडे भूमी रक्षित केली. ह्याचकरिता शिवरायांना किल्ले

जंजिरा नेहमी आपल्यास हवासा वाटे. शिवाजी महाराजांचे एकाकी नौकादल अल्प अवधीमध्ये समुद्रयुद्धात इतके निष्णात झाले की, त्याने पोर्तुगीजास धाक बसविला, सिद्दीला हैराण केले आणि प्रत्यक्ष इंग्रजांना खांदेरी-उंदेरीला मुंबईच्या छातीवर जणू पिस्तूल रोखून नरम आणले.

आतापर्यंत आपण शिवरायांना केवळ वीर म्हणून, कल्पक आणि धाडसी सेनापती म्हणून निरीक्षिले; परंतु एवढ्यानेच शिवरायाचे महत्वमापन सरले नाही. हा केवळ एक भाग झाला. वीरामध्ये किंचित सापडणारे राजनीती निपुणत्व शिवरायामध्ये विपुलपणे भरलेले होते. परशत्रूशी झगडा चाललेला असताना केव्हा पड खावी, केव्हा उठाव करावा हे जाणण्यास कमीत कमी हानीचा आणि जास्तीत जास्त लाभाचा मार्ग शोधून काढण्यास, त्याचप्रमाणे निष्कारण शौर्याचे प्रदर्शन न करता अवश्य तेव्हाच त्याचे आविष्करण करण्यास मुत्सद्देगिरी अंगी लागते. कपटाने घात करणाऱ्या अफझलखानाला आधीपासूनच सावधानता ठेवून त्याचे कपट उघडकीस येताच बेधडकपणे आणि धैर्याची परमावधि दाखवून पोट फाडून मारावे केव्हा आणि जयसिंगासारखा उदारहृदय रजपूत राजा मुसलमानांच्या वतीने हिंदुरक्त सांडण्यात आला असता त्याच्याशी मानापमान गुंडाळून ठेवून आणि सुरक्षिततेचे एकही साधन हाती न ठेवता पूर्ण विश्वासाने त्याच्या स्वाधीन व्हावे केव्हा, त्याचप्रमाणे शहाजीराजे विजापूरकरांनी दगा करून भिंतीत चिणून मारण्याच्या धमकीने बंदीत घातले असता अत्यंत अल्पावधीत अगदी दीनवाणीने शहाजहानास आपल्या बाजूस वळवून घेऊन विजापूरकरांवर शहाजीला सोडण्याइतकी दहशत पाडण्याकरिता मोगलांचे मांडलिकत्व मान्य करावे केव्हा नि प्रसंग येताच विजापूरकरांशी संगनमत करून मोगलांना पिटाळून लावावे केव्हा हे सर्व कारस्थानी डावपेचही वीर शिवाजी लढवीत होता.

त्यांच्या अचाट धैर्याची आणि अकल्पनीय कल्पनेची चुणूक आगऱ्याला झालेल्या त्यांच्या बंदिवासात सापडेल. आजपर्यंत पुष्कळ बंदी निरनिराळ्या मार्गांनी आपापल्या बंदिशालांतून पळून गेले असतील. कोणी भिंत फोडून, कोणी तटावरून उडी टाकून, कोणी भुयारे खणून बंदीचा अंत केला असेल; परंतु शिवरायांनी औरंगजेबासारख्या कपटमुकुट-मणीच्या कचाट्यातून निसटण्याची जी अद्भुत युक्ती योजिली, ती पाहून इतिहासही तोंडात बोट घालून थक्क झाला! प्रत्यक्ष सिंहाच्या गुहेत प्रवेश करणे नि सर्व ऐहिक वैभवाच्या शक्तीने प्रबळ झालेल्या मोगल दरबारात प्रवेश करणे हे सारखेच भयास्पद समजले जात होते; परंतु अशा त्या दरबारात प्रवेश करताच बावळटाप्रमाणे गोंधळून न जाता मान-पान होण्यात जरा कसूर झाली हे पाहताच ज्यांचे आत्मतेज उसळून उठले नि त्या सिंहाच्या मिशा उपटण्यास सिद्ध झाले ते आत्मतेज आणि ते धैर्य काय सामान्य प्रतीचे असेल? दक्षिण दुरावली, उत्तर परकीय झाली, जयसिंहाच्या वचनाचे संरक्षण अपुरे पडले, रामसिंगाचे चालेनासे झाले, बरोबरचे सैन्य दर्यामे खसखसप्रमाणे झाले आणि स्वतःचे

राज्य पोरके झाले नि तरीही निराश न होता स्थितप्रज्ञ योग्याप्रमाणे सर्व परिस्थितीचे निरीक्षण करून ज्या बुद्धिमत्तेने पेटाऱ्यातून लहान मुलगा संभाजी ह्याच्या लोढण्यासह निसटून जाण्याची अपूर्व योजना कल्पिली त्या बुद्धिमत्तेचे कौतुक किती करावे? अशा रीतीने सिंहाच्या मिशा उपटून त्याच्या नाकावर टिचून निसटून गेल्यावर सुद्धा शिवाजीमहाराजांनी दक्षिणेत येण्याला जो मार्ग निश्चित केला तो पाहून तर मति कुंठित होते. कोणीही सामान्य मनुष्य उत्तरेतून निसटल्याबरोबर दक्षिणेस आपल्या घराकडे तडक चालता झाला असता; परंतु शिवराय असामान्य होते. औरगंजेब हा शेर आहे आणि त्याला सव्वाशेरपणा दाखविल्यावाचून आता सुटका नाही म्हणून त्यांनी हा सामान्य मार्ग न पत्करता औरंगजेबासही अतर्क्य असा एक मार्ग शोधून काढला. दक्षिण दिशा वर्ज्य तर साहजिकच एखादा हिंदु मनुष्य जोगी-योगी बनून हिमालयातल्या पुण्यक्षेत्राकडे लपतछपत फिरेल ह्या भरवशाने बादशहाने मारे धुमाकूळ करून दक्षिणउत्तर दिशा रोखून ठेवल्या; परंतु त्या खुळ्या औरंगजेबाला काय माहीत, की हा मराठ्याचा राजा शेराला सव्वाशेर आहे. शिवरायांनी प्रथम पूर्वेकडचा मार्ग पत्करला नि प्रयाग, गया करीत करीत एकदम एखाद्या धूमकेतूप्रमाणे ते जगन्नाथपुरीवर उतरले नि तेलंगणातून मार्ग काढीत काढीत कुतुबशहाच्या राज्यातून अत्यंत कौशल्याने पुनरपि केवळ नऊ महिन्यांच्या आत एवढ्या प्राणसंकटातून सुटून आणि कपटनाटकात प्रवीण झालेल्या औरंगजेबास चुकवून श्रीशिवाजी रायगडावर उदित झाले.

शौर्य, कारस्थानीपणा, कल्पकता, धाडस इत्यादी त्यांच्या अपूर्व गुणांचे आपण निरीक्षण केलेच; आता त्यांच्या संघटनाकौशल्याकडे जर आपण बघू लागलो तर तेथेही आपल्याला थोर व्यक्तित्व दिसून येते. निरनिराळ्या योग्यतेचे स्वराज्यस्थापनेला अवश्य असणारे सर्व योग्य तरूण त्यांनी वेचून घेतले नि त्यांच्यातून त्यांनी तानाजी, येसाजी, बाजी, मोरोपंत, सेनापती हैबतराव, वीरवर प्रतापराव गुजर, इत्यादी अनेक स्वातंत्र्यवीर निर्माण केले. हिंदु जातीतील अठरापगड उपजातीतून त्यांनी अठरापगड समर्थ लोक निवडून काढले. ब्राम्हण, प्रभू, मराठे, भंडारी, कायस्थ, इतकेच काय परंतु अस्पृश्य बंधु, महार-मांग बेरडासुद्धा त्यांनी आपल्या स्वराज्यघटनेच्या पवित्र कार्यात संमीलित करून घेतले. कुणाला कारकुनी तर कुणाला शिलेदारी देऊन ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे ज्याला त्याला जवळ दूर धरले आणि लोहचुंबकाप्रमाणे सर्वांचे प्रेम आकर्षित करूनसुद्धा सर्वांवर आपला धाक ठेवला. त्यांच्या शिक्षणात सिद्ध झालेले जेवढे जेवढे लोक होते तेवढे तेवढे राजाराम महाराजांच्या वेळी नि तदनंतर झालेल्या २५ वर्षांच्या स्वातंत्र्यसमरातही कामाला आले.

प्रो. यदुनाथ सरकार ह्यांनी ता. १ मे १९२७ च्या 'क्रॉनिकल' पत्राच्या शिवाजी-अंकामध्ये एक लेख लिहिला आहे. त्यामध्ये शिवाजीने राष्ट्र निर्माण केले काय? असा एक

प्रश्न टाकून त्याचे उत्तर नकारात्मक दिलेले आहे. दीड शतकानंतर शिवाजीने उत्पन्न केलेले राज्य गेले आणि अठराशे-अठरा साली पेशव्याचा पराभव झाल्यावर घराकडे फिरणाऱ्या सैन्याला जनतेने संत्रस्त केले असे मनरो नावाच्या इतिहासकाराचे म्हणणे आहे आणि त्या एका सद्गृहस्थाच्या म्हणण्यावरून शिवाजीमहाराज हे राष्ट्रनिर्माते नव्हते असे प्रो. सरकार सिद्ध करू पाहात आहेत. वादविवादाकरिता वरील सर्व म्हणणे जरी खरे धरले तरी काय सिद्ध होते? केवळ स्थापन केलेले राज्य लवकर बुडाले म्हणून काय त्यांनी राष्ट्र निर्माण नाही केले? मराठ्याच्या पंचवीस वर्षांच्या स्वातंत्र्ययुद्धात राजारामाचे वेळी जी चिकाटी, जे धाडस, जी अपूर्व राष्ट्रभक्ती दिसून आली ती काय शिवाजीने राष्ट्र निर्माण केले नसते तर दिसून आली असती? आपल्या वतनावर पाणी सोडण्यात जर राष्ट्रीय दृष्टी नसती तर काय खंडो बल्लाळ सिद्ध झाले असते? राष्ट्रीय दृष्टी नसती तर काय संताजी घोरपडे, धनाजी जाधव, परसोजी भोसले, पानसंबळ आणि इतर अनेक शत शत तरूण महाराष्ट्रवीर लोखंडाचे चणे खाता खाता रक्त सांडीत सांडीत स्वातंत्र्यसमर चालवू शकले असते? एक फितुरीचे कृत्य जरी केले असते, तरी मोगलांनी कोणत्याही क्षुद्र पाईकाला नाईक केले असते आणि नाईकाला सरदार बनविले असते; परंतु या सर्व पारतंत्र्याच्या वैभवावर लाथ मारून सबंध जन्मभर रानावनातून वणवण करीत महाराष्ट्राचे दोन लाख वीरसैन्य पंचवीस वर्षेपर्यंत झगडत, मारीत, मरत हिंडले असते? आपापसामध्ये चुरशीने लढणारे धनाजी-संताजी मुसलमानांचे सैन्य येताच जर राष्ट्रीय वृत्ती नसती तर काय एकत्र होऊन नि वैर विसरून जाऊन मुसलमानांशी लढले असते? इतकेच कशाला, परंतु मनरोसाहेब ज्या शेवटच्या पेशव्यांच्या दिवसांबद्दल गोष्ट बोलतो त्याच दहाबारा वर्षांच्या आगेमागे भागानगरच्या निजामाच्या दरबारात असलेल्या गोविंदपंत काळे या राष्ट्रभक्त वकिलाचे नाना-महादजींचा समेट झाल्यावर नानांना आलेले अत्यंत मार्मिक आणि देशभक्तीने ओतप्रोत भरलेले पत्र मनरोसाहेबांनी वाचले का? त्यांनी जरी वाचले नसले तरी श्री. यदुनाथ सरकारनी तरी ते वाचले असेल ना? पर्शियन ग्रंथकारावरून नि मोगली उर्दू दप्तरातील बाडांतूनच काय ती ज्यांनी मराठ्यांच्या इतिहासाची भूमिका अभ्यासिली असे पूर्वग्रहदूषित, अहंकारविमूढ नि मराठी इतिहासाचे हृद्गत न समजणारे श्री. यदुनाथ या पत्राचा जरा शांतपणे विचार कशाला करतील? मनरो काय म्हणतो तेच तेवढे त्यांचे वेदवाक्य! पुन्हा दीडशे वर्षेपर्यंत शिवाजीने प्रचलित केलेल्या हिंदवी साम्राज्याच्या ध्येयाने महाराष्ट्रवीर जे लढले तो दीडशे वर्षांचा काळ काय अगदी अत्यल्प झाला? मग ह्याच विधानानुसार गेल्या महायुद्धात कंबर मोडलेले जर्मनीचे राष्ट्र ज्याच्या प्रयत्नाने एक संघटित साम्राज्य झाले होते त्या प्रिन्स बिस्मार्कलाही केवळ दीडशे वर्षे तर राहो, पण शंभर वर्षे सुद्धा त्याची संघटना टिकली नाही म्हणून राष्ट्रपित्याच्या टिपणीतून काढून टाकावे लागेल. अजरामर राज्य असे कोणाचेच टिकले नाही--म्हणून राष्ट्रनिर्माता असा

जगात कोणीच झाला नाही म्हणावयाचा? समर्थ आणि शिवाजी ह्यांनीच महाराष्ट्रास व्यक्तिमत्त्वाची जाणीव दिली, एकजीव केले. 'एकराट्' केले

**या भूमंडळाचे ठायी।**
**हिंदु ऐसा उरला नाही।।**
**मराठा तितुका मेळवावा।**
**आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा।।**
**ये विषी न करता तकवा।**
**पूर्वज हासती।।**

ही हाक सह्याद्रीच्या शिखरावरून रामदासाने पुकारली. शिवाजीने शपथ घेतली ती 'हिंदवी (हिंदूंचे) राज्य स्थापण्याची! 'तुम्ही हिंदु आम्ही हिंदु' म्हणून शिवाजीनेच जयसिंगाला सांगितले. विस्कळीत महाराष्ट्रांतली 'रत्ने वेचून वेचून त्यांची माळ गुंफली'. 'दिल्ली द्रपदलिप्सवः' ची सैन्ये दिल्लीच्या रोखे चालू लागली. रामदास-शिवाजीच्या पिढीचेच हे सारे शब्द आहेत. रामदास शिवाजीच्या ह्या स्फूर्तीनेच मराठ्यांच्या तीन पिढ्या लढत राहिल्या. 'अरे पाहता काय? हिंदुपदपादशाहीचा दिवस उजाडला 'म्हणून गर्जत बाजीरावाने दिल्लीचे दरवाजे तोडले. भाऊने दिल्लीचे तख्त फोडले. भीमथडीचे घोडे सिंधूचे पाणी प्याले! विजयी भगवा झेंडा अटकेवर फडकावला!! असले राष्ट्रीय उत्थान अर्वाचीन हिंदु इतिहासात महाराष्ट्राबाहेर कुठे दिसले का? राष्ट्र निर्माण करणे ते हेच. हेच शिवाजीने केले; पण ते 'SIR' यदुनाथांना काय कळणार? शूर मर्दाचा पोवाडा। शूर मर्दाने गावा!' मुर्दाडाने नव्हे!

प्रा. महाशयांनी हिंदु समाजातील जाति-उपजातीचे अवडंबर माजवून तो अप्रस्तुत विषय ह्या वादात घुसडून देण्याचे धाष्टर्य करावे हे पाहून कोणासही विषाद वाटेल; परंतु ह्या जाति-उपजातीचे लोढणे गळ्यात असतानाच श्रीशिवाजी महाराजांनी प्रत्येक जाति आणि उपजातीकडून देशाधर्माच्या नावाने हिंदुपदपादशाही-साठी पिढ्यानुपिढ्या पराक्रम गाजविला तो काय राष्ट्रीय वृत्तीची प्रेरणा केल्यावाचून? शिवाजी राष्ट्रनिर्माता होता ह्याचे हेच तर उत्कृष्ट प्रत्यंतर आहे.

शिवरायाने केवळ राजकीय दृष्ट्यांच आपल्या राष्ट्राचे पुनरुज्जीवन केले असे नाही, तर सामाजिक उदारता दाखवून बदलत्या काळाप्रमाणे रूढीला बदलून आपली परंपरा अविकृत ठेवण्याची जी तत्परता दाखविली ती पाहून आजच्या सुधारकालासुद्धा खाली मान घालावी लागेल. बजाजी निंबाळकरासारखा अभिजात सरदार काही लालुचीला, काही छळाला बळी पडून मुसलमान झाला असता, हिंदु धर्माच्या वर्धिष्णु, सर्वसंग्राहक नि सर्वपाचक स्वरूपाकडे लक्ष देऊन शिवाजीने आज अजूनही ज्या नावाला काही अतिशहाणे दचकतात, ती शुद्धीची प्रथा सक्रिय सुरू केली. बजाजी निंबाळकरास शुद्ध केले; इतकेच नव्हे तर त्या

कुळात स्वतःच्या कुळातील मुलगी देऊन त्याला हिंदु समाजात पचवून टाकले. त्याचप्रमाणे नेताजी पालकर ह्यालाही महाराजांनी शुद्ध करून पुनरपि हिंदु करून घेतले होते. अशा रीतीने त्यांनी हिंदुसंघटन नि शुद्धि ह्या दोन अमूल्य संजीवनी त्याही वेळेला उपयोगात आणल्या होत्या.

ज्याप्रमाणे राजकीय आणि सामाजिक उत्थानाला शिवाजीने चैतन्य दिले होते, त्याचप्रमाणे राष्ट्राला प्राणाप्रमाणे असलेले वाङ्मयही त्यांनी उत्तेजित केले होते. त्या वेळी उर्दू भाषेने मराठी भाषेला जवळजवळ खग्रास ग्रहण लावीत आणले होते आणि जर शिवाजीने भाषाशुद्धीचा प्रयत्न करून मराठी भाषेला संस्कृतातून नवजीवन दिले नसते, तर आज मराठी भाषा कुठल्या कुठे विकृत झाली असती. परंतु त्यांनी 'राज्यव्यवहारकोश' करवून आणि उर्दू शब्द काढून टाकण्याची प्रवृत्ती वाढवून मराठी भाषेची मोठी सेवा केली. कवींना, ग्रंथकारांना उत्तेजन देणे ही राष्ट्रोद्धाराचीच कामे समजून शिवरायांनी तीही पार पाडली. भूषण ह्या नावाचा उत्तर हिंदुस्थानचा सुप्रसिद्ध राष्ट्रीय कवी शिवाजीने काही वर्षे आपल्या आश्रयास ठेवला होता नि त्याच्याकडून स्वतःच्या चरित्रावर सुंदर ग्रंथ सिद्ध करविला होता. त्याप्रमाणे पंडित परमानंदांचे, गागाभट्टांचे आणि अनेक संस्कृत पंडितांचे स्वागत करुन त्यांना यथान्याय नि यथायोग्य आश्रय देऊन गुणिजनांना आणि विद्वानांना आणि संस्कृत विद्येला त्याने उत्तेजन दिले.

मनुष्याचा उत्सवप्रिय असलेला स्वभाव जाणून शिवरायाने गतस्वातंत्र्याचे पुनरुज्जीवन नि हिंदुपदपादशाहीचे पुण्याहवाचन रायगडाच्या पुण्यभूमीवर सिंहासनारोहणाचा समारंभ घडवून आणून केले. अनेक शतकेपर्यंत हिंदुस्थानच्या दैवी, उभी असलेली हिंदु सिंहासने खचून गेलेली पाहण्याचे होते. राजमुकूट हिंदूंच्या हातात येत होते; परंतु ते परक्यांच्या मस्तकाला भूषित करण्याकरिता काय ते! छत्रचामरे ते पाहत होते; परंतु ती स्वतःच्या हातांनी परक्यांच्या मस्तकांवर ढाळावी लागत होती! आणि हाय! हे असे हृदयविदारक दृश्य एक नव्हे, दोन नव्हे, सतत पाचशे वर्षे हिंदु जातीच्या ललाटी लिहिले होते; परंतु शेवटी शिवाजीने मनु पालटविला. त्याने हिंदु जातीच्या इतिहासातील आणखी एक अद्भुत रोमहर्षक प्रसंग गागाभट्टाच्या हस्ते स्वतःला विधियुक्त राज्याभिषेक करवून घेऊन घडवून आणला.

धन्य तो दिवस, की ज्या दिवशी शिवनेरीच्या पडक्या दुर्गात जन्मास आलेले, तोरणागडावर अडखळणारे, एक यत्किंश्चित भासले जाणारे उनाड पोर अखिल हिंदु राज्याचे स्वामी झाले. हिंदु जातीचे भाग्य पुनरपि उदयाला आले. हिंदु हे नाव जगात जिवंत उरले.

तो धन्य दिवस हाच! --हिंदुपदपादशाह शिवछत्रपतींना आज राज्याभिषेक होत आहे! या पुण्यसरितांनो, आपल्या पवित्र जलांनी आपली पात्रे भरभरून रायगडच्या राजवाड्याकडे

या! आणि या हिंदु छत्रपतीवर राज्याभिषेक करा! पश्चिम समुद्र नि पूर्व समुद्र हे तुझे दोन्ही बाहू उभारून, हे हिंदुमहासागरा, तुझ्या कोषागारांतील अशेष रत्नामोत्यांची उपायने ह्या हिंदुपदपादशहाच्या चरणांवर अर्पण कर!

ह्या इतिहास घडविणाऱ्या दिवसाला आज ठीक तीनशे वर्षे झाली आणि या तीनशे वर्षांच्या अवधीनंतर हे हिंदुस्थान ह्या राष्ट्रवीराला उचित असा आपला कृतज्ञतेचा करभार सादर करीत आहे. त्या थोरामोठ्यांच्या करभारात हा माझाही कृतज्ञ पुरस्कार, शिवभूपते! तू स्वीकार आणि इतकेच 'पसायदान' दे की, तुझी दिव्यस्फूर्ती आम्हा सांप्रत हतबल बनलेल्या हिंदु जातीच्या अंगात संचरित व्हावी आणि तू तीनशे वर्षांपूर्वी हिंदु राष्ट्राचे, हिंदु धर्माचे आणि हिंदु जातीचे जसे पुनरुज्जीवन केलेस तसेच आजही करावयासाठी तुझ्याप्रमाणे आम्हालाही सामर्थ्य यावे!!

'श्रद्धानंद', मुंबई- ५ मे १९२७

* * *

# शिवरायांच्या यशस्वी राजनीतीचे एक सूत्र

कातर्यं केवला नितीः शौर्यं श्वापदचेष्टितम्।
अतः सिद्धिसमेताभ्यामुभाभ्यामन्वियेष सः।।

महाराज अगदी लहान होते. आठ एक वर्षांचे सुद्धा नसतील. तेव्हापासून आपल्या धर्माची नि जातीची अवनति पाहून त्यांचे हृदय तळमळत असावे. तेव्हापासून या अवनतीच्या प्रतिकारार्थ मी काय करू शकेन याचे विचार त्यांचे चित्तात घोळत असत. तेव्हापासून माझ्या राष्ट्राच्या नि माझ्या धर्माच्या गौरवासाठी, स्वातंत्र्यासाठी, सामर्थ्यासाठी मी आपला प्राणही देईन ही प्रतिज्ञा ते करीत असावे. त्यांच्या त्या चिमुकल्या मस्तकात 'हिंदवी स्वराज्या'च्या प्रचंड कल्पना नि मनोहर स्वप्ने उदय पावत, विस्तार पावत, प्रसार पावत; एखाद्या विद्युत् प्रवाहासारखी त्यांच्या संगतीत राहणाऱ्या बालकांच्या, तरुणांच्या इतकेच नव्हे तर वृद्धांच्याही अंगात संचार करू लागत.

स्वदेशाच्या नि स्वधर्माच्या स्वातंत्र्यासाठी प्राणही अर्पण करण्याचा निश्चय केला खरा. पण प्राण स्वातंत्र्यार्थ द्यावयाचे म्हणजे कसे द्यावयाचे? समोर प्रथम दिसेल त्या मुसलमानी तटाच्या भिंतीवर डोके फोडून? वा जे प्रथम वाटेत भेटेल त्या मुसलमानी

राजद्वाराशी धरणे धरून-उपास करून-दे माझे स्वातंत्र्य परत, आण तो माझ्या राष्ट्राचा राजमुकूट इकडे, नाही तर हे आम्ही सर्व मावळे, मराठे, ब्राह्मण तुझ्या घरात उपास करून मरतो! असे म्हणून विजापूरच्या नि औरंगजेबाच्या दारात वा वेशीत प्रायोपवेशन करून?

हे उपाय अनेक लोकांनी करून पाहिले होते. अनेक वेळा मोगल बादशहांनी त्यांस भीक घातली नव्हती. एकदा प्रत्यक्ष दिल्लीतसुद्धा ही गंमत होऊन चुकली होती. हिंदूंना शक्य त्या उपायांनी बाटविण्याचा नि त्यांचेवर करांचे जड ओझे अधिकाअधिक लादण्याचा औरंगजेबाचा प्रयत्न जेव्हा सर्व हिंदूंस त्राही त्राही करविता झाल, तेव्हा एकदा शेकडो हिंदी पुढाऱ्यांनी दिल्लीस जमून आपली कागाळी प्रत्यक्ष औरंगजेबाचे कानावर घालावी नि त्या पीडेचा अंत होईपर्यंत तेथून हलूही नये असा निश्चय करून दिल्लीस प्रयाण केले. आपण प्रजा, तो राजा. आपण जर त्याचे दाराशी न्याय मागावयास गेलो नि न्याय दे, नाही तर आम्ही या आमच्यातील अनेक ब्राह्मणांसह तुझ्या दाराशी धरणे धरून बसतो. मग तू आम्हास लाथा मार, बुक्या मार, काय वाटेल ते कर असे म्हटले नि वर्तले असता बादशहास दया आलीच पाहिजे, आत्मबलाने तो जिकला गेलाच पाहिजे असे भाबडेपणे समजून ते सहस्त्रो लोक दिल्लीच्या राजवाड्याभोवती गोळा होऊ लागले. तो शुक्रवारचा दिवस असल्याने बादशहा औरंगजेब मशिदीत जावयाचा होता. बादशहाची स्वारी सिद्ध झाली. हजारो घोडा थयथयाटत स्वारीपुढे रांगांनी उभा राहिला. सहस्त्रो घोडेस्वार झकझकणाऱ्या तरवारी, भाले, बंदुका पेलीत त्या अश्वांवर ऐटीने स्वार झाले. मध्ये प्रचंड हत्तीवरच्या उंच अंबारीत औरंगजेब बसून एखाद्या दुष्प्राप्य दानवासारखा दिसू लागला. ती स्वारी थोडी पुढे सरकते तो ते धरणे धरावयास आलेले सहस्त्रो हिंदु 'न्याय द्या! महाराज, न्याय द्या! 'म्हणून ओरडत ओरडत स्वारीच्या मार्गावर आडवे झाले. त्यास भालदार शिपाई दूर करू लागले, ते हटेनात. हिंदूंवर होत असलेले अत्याचार नि लादले जाणारे अन्याय्य कर दूर झाल्याविना आम्ही हलणार नाही अशी एकच ओरड झाली. औरंगजेब क्षणभर उभा राहिला. लोकांस वाटले शेवटी निःशस्त्र प्रतिकाराने डाव जिंकला, दगडासही पाझर फुटला. दयेने आग्निही थंड झाला. इतक्यात एक मुल्ला म्हणाला, निमाजाचा वेळ अगदी सन्निघ आला आहे! अधिक थांबल्यास प्रार्थना अधर्म्य होईल. औरंगजेब म्हणाला, 'चालवा हत्ती पुढे!' ते सहस्त्रो हिंदु म्हणाले, 'मायबाप! आमचे म्हणणे ऐकावे, मग पुढे जावे'. औरंगजेब म्हणाला, 'त्यास मार्ग सोडून उभे करा' रक्षक म्हणाले, 'ते मार्ग सोडून जात नाहीत, ते मार्गावर आडवे पडले आहेत!'

'बरे तर, त्यांच्यावरूनच हत्ती चालवा!!' औरंगजेब म्हणाला.

तरीही ते त्रस्त हिंदु, आपण मार्गावर आडवे पडलो आहोत, आता सागर तरून राम जाऊ शकेल. पण ह्या सर्व दिल्लीच्या मार्गावर उपाशी-तापाशी पालथ्या पडलेल्या आमच्या

आत्मबळास उल्लंघून हा औरंगजेब कसा जाऊ शकणार? अशा विश्वस्त धैर्यांने तसेच मार्गावर पडून राहिले तोच त्या स्वारीतील औरंगजेबाच्या आज्ञेने चवताळलेले अश्व, हत्ती उंट नि पदाती अल्ला हो अकबरची गर्जना करीत तिळभरही न डगमगता त्या माणसांच्या फरशीवरून थयथयाटत घुसले! त्यांस चेंदीत-मेंदीत पार निघून गेले! मऊ पायघडीवर पाय टेकण्यास जितका अल्प अडथळा होतो तितक्याही अडथळ्याविना बादशहाची स्वारी मशिदीत जाऊन पोचली. तो राजमार्ग चेंदामेंदा झालेल्या हिंदु रक्तमांसांनी चिणून गेला.

तेव्हा पूर्वीच्या असल्या अनुभवास पाहून नि ऐकून आलेला एक गोसावी महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या एका शिखरावर उभा राहून गर्जलाः- ‘देशार्थ, धर्मार्थ राष्ट्रार्थ प्राण द्यावयाचा निश्चित जो मार्ग तो असा नाही.

**‘पुण्यात्मा आणि पापात्मा। दोहीकडे अंतरात्मा।**
**परंतु साधु भोंदु सीमा। सांडूच नये।।**
**हे धकाधकीची कामे। तीक्ष्ण बुद्धिची वर्मे।**
**मोठ्या भावार्थ संभ्रमे। कैसे घडे।।**
**धटासी आणावा धट। उद्धटासी पाहिजे उद्धट।**
**खटनटासी खटनट। अवश्य करी।।**
**धर्मासाठी मरावे। मरोनि अवघ्यांसी मारावे।**
**मारिता मारिता घ्यावे। राज्य आपुले।।**
**हे धूर्तपणाची कामे। राजकारण करावे नेमे।**
**ढिलेपणाच्या संभ्रमे। जाऊचि नये।।**

महाराजांच्या चित्तात हा उपदेश पूर्णपणे ठसला. केवळ शौर्याने नव्हे नि केवळ कातर्याने नव्हे, केवळ दंडेलिने नव्हे नि केवळ नरमाईने नव्हे, तर जिथे जसा प्रसंग पडेल तिथे तसे वागून आपले मुख्य ध्येय - आपले मुख्य अवतारकार्य- साधावयाचे, हा त्यांनी निश्चय केला. त्यांनी निश्चय केला की

**साप विखारी देशजननिचा ये घेऊ चावा।**
**अवचित गाठुनि ठकवुनि भुलवुनि कसाही ठेचावा।।**

महाराज लहानपणी शिकलेले त्यांच्या राजनीतीचे हे मुख्य सूत्र प्रौढवयीही कधी विसरले नाहीत. ते विजापुरास आपल्या पित्यासह गेले होते, तेव्हा त्या यवनी बादशहास पाहून दिपून जाण्याचे स्थली त्यांचा सात्त्विक कोप भडकून उठला. त्यांचे पाय एखाद्या लोहस्तंभाप्रमाणे ताठ झाले. ते कुर्निसात करण्यासाठी काही केल्या लवेनात. त्याचप्रमाणे विजापूरच्या दरबारात गाईची होत असलेली हत्या पाहून त्यांनी स्वतः एका मुसलमानास छाटून काढले. त्यांनी अफझुलखानाची मगरमिठी पडताच त्या प्रचंड दैत्यास अचाट साहस करून पोटात वाघनखे खुपसून खाली लोळविले! भर मध्यरात्री शाहिस्तेखानाच्या प्रत्यक्ष

राजवाड्यात शिरुन त्याच्या सहस्त्रो सैनिकांचे भर गोटात त्यावर वार चढविला नि हा हा म्हणता पुन्हा जसेच्या तसे निसटून सिंहगड पाठीशी घातला. असली अचाट कर्मे करणारा शिवाजी भ्याड होता असे समजण्यास वा सांगण्यास कोणाची छाती आहे? प्रत्यक्ष रामदासांना या त्यांच्या अचाट साहसाची, कहातीपणाची, जिवाविषयीच्या निष्काळजीपणाची भिती पडून

**'मोहरा पेटला अभिमाना। मग तो जीवाकडे पाहेना।।'**

**हे काही ठिक नाही असे शिवाजीस सांगावे लागले.**

**'धुरेने युद्धास जाणे। ऐसी नव्हेत की राजकारणे।**

**धुराच करुन सोडणे। कित्येक लोक।।'**

**अशी चेतावणी द्यावी लागली.**

प्रतापाचा नि साहसाचा असा हा केवळ सूर्य असताही जेव्हा ते साहस वा तो प्रताप आपल्या अंगीकृत राष्ट्रस्वातंत्र्याचे विरुद्ध जाऊ पाही नि जेव्हा स्वीकृत महत्कार्याचे यशास्तव शौर्याचे स्थली शहाणपणा, शक्तीचे स्थली युक्ती नि तेजाचे स्थली थिल्लरपणा अधिक उपयुक्त दिसला तेथे तेच शिवाजीराजे असे वाकून घेत की, तेवढेच स्थली ज्यांनी त्यास पाहिले वा त्यांचे तेवढेच कृत्य ज्यांनी ऐकले अशा कित्येक क्षुद्र मनुष्यांनीही म्हणू लागावे की, शिवाजीहून मी किती तरी शूर मनुष्य आहे; हा केवढा भित्रा!

जावळीच्या विस्तीर्ण मंडपात जेव्हा विजापूरचा पराक्रमी, तेजस्वी नि दैत्यासारखा धिप्पाड सेनापती अफझुलखान मिशावर ताव देत बसला होता, जेव्हा त्यांचे प्रचंड सैन्य शेजारीच मैल मैल पसरले होते, जेव्हा त्याच्या केसास धक्का लागताच शेकडो तोफा धुव्वा उडवून देण्यास गुरगुरत होत्या. तेव्हा या मंडपात रुमालाने हात बांधलेला, 'मला शस्त्राचे भय वाटते, कृपा करुन आपण मला सडेच भेटावे' म्हणून थरथरत कापत म्हणणारा, ठेंगणा, दचकत् पाय टेकणारा, विजापूरच्या अपराधांची सेवकास क्षमा असावी अशी याचना करणारा नि मी माझे शिर कृतकर्मांची क्षमा मागून आपले पायी ठेवतो म्हणून अफझुलखानापुढे गयावया करणारा एक अगदी थिल्लरसा मनुष्य त्या मंडपात शिरला, तो शिवाजी होता. त्याच्या त्या वेळच्या मुद्रेवरून, शब्दावरून नि वर्तनावरून पहाणारास असेच वाटले की, त्याहून भित्रा मनुष्य या जगात कोण आहे?

तो अफझुलखानासमोर आला, अफझुल्लखानाने त्यास सहज बगलेत दाबले-जसे आपण सहज एखाद्या हरिणाची मान बगलेत दाबतो. तो काय झाले? तरवार चमकली. पोटात वाघनखे घुसली. तो धिप्पाड खान ची ची करीत अंकुशघाताने ची ची करणाऱ्या एखाद्या हत्तीसारखा कोलमडू लागला. पट्ट्यास पट्टा, खंजिरास खंजीर, तोफेस तोफ भिडली! खान ठार झाला! खानाची फौज ठार झाली, उधळली गेली. शिर छाटून, पोट फोडून, गोट लुटून शिवाजी एखाद्या सिंहासारखा गड चढू लागला! देवीचा सूड घेतला,

देवाचा सूड घेतला. शत्रूचा बारा सहस्त्र घोडा पाडाव करुन बांधून टाकला. एका क्षणापूर्वी या जगातील अत्यंत भित्र्या मनुष्यासारख्या दिसणाऱ्या त्या शिवाजीहून आता या जगात अधिक शूर, दिप्तीमान् नि साहसी कोण? त्या वेळी तो थिल्लर दिसला म्हणूनच या वेळेस त्याच्या मुद्रेवरील त्या दिग्विजयी दीप्तीवर कोणाची दृष्टि ठरत नाही. त्या मंडपात शिरतेवेळी तो मान अवनत करून शिरला म्हणूनच आता तो त्या मंडपातून विजयाचे पाठीवरील उन्नत अंबारीत बसून मान ताठ करुन बाहेर येत आहे!

पुढे जयसिंग आला. पुन्हा ध्येयासाठी नम्रता स्वीकारून त्याच्याशी संधिकरणे भाग पडले. घेतलेले गड दिले, बादशहाविरुद्ध केलेल्या बंडाची क्षमा मागितली, पत्करू नये ती त्याची नोकरीही पत्करली नि बादशहास पत्र लिहिले--

'मी शिवाजी, आपला गुन्हेगार नि अपराधी आहे. आपणास शरण येऊन जीव नि धनदौलत रक्षण करण्याची इच्छा धारण करीत आहे. अतःपर मी आपली नोकरी इमानाने बजाविण्यास सदैव तत्पर राहीन आणि आपली आज्ञा पाळण्यास भूषण मानीन. बंडाळी करून मी आपल्या सर्वस्वाचा घात कधीही करून घेणार नाही. मला सर्व अपराधाची क्षमा करून जीवदान द्यावे एवढेच या दासाचे आपणापाशी मागणे आहे.'

हे पत्र नि खाली दिलेले मूलपत्र यदुनाथ सरकारने प्रसिद्ध केले नि त्याचा आपल्या बखरीतून उल्लेखही आलेला आहे. हे पत्र जाताच धूर्त औरंगजेबाने पानावर पान ठेवून शिवाजीस क्षमादानाचे पत्र, पोशाख नि आज्ञा धाडली. ते कळताच 'मुसलमानी धर्मरक्षक' शिवाजी त्या आज्ञेचे सत्कारार्थ सहा मैल पायी चालून सामोरा गेला! नि पुन्हा प्रत्युत्तर लिहिता झाला:

'बादशाही ठसा नि पंजा यांनी अलंकृत झालेली आपली कृपापूर्ण आज्ञा येऊन पावली. ह्यायोगे बादशहांनी मला जीवदान दिले आहे. या पापी दासाचे अपराध क्षमेस पात्र नसताही बादशहांनी केवळ उदार अंतःकरणाने कृपा केली हे त्यांस मोठे भूषण आहे. मी आज्ञेप्रमाणे विजापूरकरांवरही चालून जाऊन नि त्या युद्धात विशेष पराक्रम गाजवून पूर्वीचा काळिमा धुऊन काढीन. आपल्या अनंत उपकारांची फेड अंशतः तरी करीन.'

या 'मुसलमानी धर्मरक्षक' शिवाजीने पुढे मुसलमानी धर्मांचे 'गोब्राह्मण प्रतिपालक' छत्र उभारून किती संरक्षण केले नि 'तुमची नोकरी इमानाने पाळीन म्हणून वचन देणाऱ्या या ऐंद्रजालिकाने त्या औरंगजेबाची चाकरी पुढे कशी बजाविली हे इतिहास-प्रसिद्ध आहे!

पण शिवरायांच्या कृत्यांचा पुढचा इतिहास ज्यांच्या अंधळ्या डोळ्यांना दिसू शकला नाही किंवा त्या वीरसिंहाच्या मागच्या अनंत धाडसाची, अपूर्व साहसाची नि दीप्ततम तेजाची दिप्ती नि स्मृति ज्यांच्या थिल्लर नि कृतघ्न मनात राहू शकली नव्हती अशा तत्कालीन बायाबापड्यांनी एकच कोल्हेकुई करण्यास आरंभ केला. अफझुलखानाकडे नुसत्या पाहण्यानेही ज्यांची गाळण उडाली असती, आजन्म मुसलमानांपुढे कुरनिसात

करता करता ज्यांच्या गुडघ्यांस घट्टे पडले होते नि विजापूरच्या नि दिल्लीच्या मार्गातून गाओींच्या कसाअखान्यांसमोरुन चालताना मुसलमान रागावतील या भयाने नाकास पदर लावून चालण्याचेही साहस ज्यांनी केले नाही असले भ्याड, देशशत्रूच्या नोकराणीचे नोकर तेही नाक मुरडून म्हणाले, की, 'छी, भ्याला लेकाचा! असली पत्रे धाडण्यापेक्षा शिवाजी मेला असता तर पत्करले असते!'

मूर्खानो! विजापूरच्या भर मार्गात गोवधाने चिडून मुसलमान कसायाचा लहानपणीच शिरच्छेद करणारा, अफझुलखानाचा हंता, शाहिस्त्याचा शास्ता, रामदासांचा पट्टशिष्य, अखिल हिंदुराष्ट्राची मूर्तिमंत महत्त्वाकांक्षा असलेला हा 'भित्रा' शिवाजी तुमच्यासारखा गुलामगिरीच्या नरकात पिचणाऱ्या लाखो वीर्यशाली' कीटकांपेक्षा जर अधिक भित्रा होता आणि तुम्ही जर आपणाला एवढे वीर्यशाली समजता तर तुम्ही का या धर्मयुद्धात नि स्वातंत्र्ययुद्धात त्याच्याहून अधिक शूरतेने लढत नाही? शाहिस्त्याला पिटाळून नि पाच शाह्यांस रगडून मग एक पत्र शिवाजीने लिहिणे नि तेही एवढ्यासाठी की, त्यायोगे रगडलेल्या पाच शाहीस नि उरलेल्या या मुख्य बादशाहीसही पिसून पिसून मातीला मिळविता यावे म्हणून! तुम्ही जेव्हा शाहिस्त्याला माराल नि पाच पादशाह्या रगडाल आणि तरीही भित्रे पत्र लिहिणार नाही तेव्हा कुठे तुमच्या या बालिश बडबडीचे समर्थन क्षणभर कोणी श्रवण तरी करील. तोपर्यंत हा एक शिवाजी मेला असता तर बरे असे म्हणण्याचे स्थली स्वदेशासाठी रक्ताचा एक थेंबही ज्यांनी सांडिला नाही, शत्रूचे जे जन्माचे मिंधे, जे शत्रूवर धर्मयुद्धांत हात उगारणे तर दूरच; पण दुसरे कोणी उगारू लागताच, गर्जू लागणाऱ्या शत्रूच्या क्रोधाच्या डुरकाण्या ऐकतानाही सकंप, दार लावून आत चुलीपाशी जाऊन बांगड्या भरून लपून बसतात नि जे तिथे मात्र शिवाजीच्या भित्रेपणाला हसतात अशा तुमच्यासारख्या लाख बायाबापड्या मेल्या तरी चिंता नाही असेच इतिहास गर्जत राहणार!

इतक्यात 'मुसलमानी धर्मरक्षक' शिवाजीस बादशहाने पत्र लिहिले.

'भेटीस या म्हणजे बादशाही कृपा संपादन कराल!' महाराजांनी युक्तीने मूग गिळून भेटीस जाण्याचे ठरविले. तो औरंगजेबाने दरबारात पाच हजारी स्वारात शिवाजीला उभे केले. पाच हजारी स्वारांत शिवाजीला! की, ज्याने अखिल भारताचे सिंहासनावर आपला अधिकार सांगितला-त्याला उभे केले. अंतर्गत तेज उसळून बाहेर येऊ लागले, मुद्रा लाल झाली, रागाने पुटपुटत महाराज काही वाकडेतिकडे शब्दही पुटपुटत गेले; पण त्वरित त्या क्रोधाच्या तरवारीस तितिक्षेच्या कोशात तसेच बळेच दाबून शिवाजीराजे नेमून दिलेल्या घरी गेले तो ते घर तुरुंग झाला नि औरंगजेबाचे सशस्त्र पहारे उभे राहिले. त्या वेळेस आपल्या अंगीकृत कार्याकडे जावयास, हिंदुस्वातंत्र्यश्रीच्या भावी राजमंदिरात घुसावयास एक लहानशी दिंडी काय ती उघडी होती; पण तीतून मान अगदी खाली घालून, गर्वाचा

ताठा अगदी नाहीसा करून, अवमानाच्या आकुंचनात अंगे अगदी दडपून टाकून गेले तरच क्वचित् त्या दिंडीतून निसटून पुढे जाण्याचा संभव होता. जर तिथे शिवाजी म्हणता, मी मान लववायचा नाही! मी हिंदु स्वातंत्र्याचा ध्वज! मी जीव गेला तरी लवणार नाही, तर ते कृत्य जरी निंदनीय झाले नसते तरी अभिनंदनीयही झाले नसते. तेव्हा ताठपणा नव्हे तर आकुंचनच अभिनंदनीय! पण निष्फळ नव्हे तर अभिनंदनीय असूनही सफळ होणारे होते. म्हणून महाराजांनी त्या दिंडीतूनच हिंदु राज्यश्रीच्या मंदिराकडे जाण्याचा निश्चय केला. जो पहारेकरी येईल त्याची स्तुति केली. कोणास पेटाऱ्यातून मेवा धाडला. मी 'मुसलमानी धर्मरक्षक शिवाजी. मी कधीही बादशहाशी वैर करणार नाही. मी गरीब आहे. मी अपराधी आहे!' इत्यादी निरोप त्यांनी मुसलमानी सरदारांस धाडले नि एक दिवस त्या पेटाऱ्यातील पेढे, मिठाई नि अफू खाऊन गुंग झालेल्या सरदारांचे हातावर तुरी देऊन महाराज त्यांचे हातून निसटून गेले! ज्या वेळेस ते एका पेटाऱ्यात अंगे आवळून वर भूस खाली भूस, वर मिठाई खाली मेवे असे एखाद्या पिंजऱ्यात पडलेल्या उंदरासारखे बसले होते, त्या वेळेस ते तसेच पहारेकऱ्यास सापडते तर औरंगजेब मोठ्याने हसून निश्चित म्हणाला असता, 'बेशक यह बेशरम एक पहाडका चुवा है! कैसा चुवेके माफक छिपता है, देखो!' पण त्यावेळी उंदरासारखे होणे हेच खरे शौर्य होते. त्या वेळेस सिंहासारखी गर्जना करणे ही शौर्याची केवळ विटंबना मात्र झाली असती!

थोडाच वेळ निघून गेला. महाराज सुरक्षित रायगडला आले आणि मग सिंहगर्जनेची खरी वेळ आली! दऱ्या डोंगरातून तोफेने अशी गर्जना केली. तो महाराष्ट्राचा सिंहनाद ऐकून पूर्वी ज्यास तुच्छतेने औरंगजेब 'उंदीर' म्हणत होता त्यासच 'सैतान' असे त्रासाने म्हणू लागला.

थोडेच दिवसात रायगडावर हिंदुपदपादशाहीची मुहूर्तमेढ रोवून, हिंदुश्रीचा स्वातंत्र्यध्वज उभारून हिंदु सिंहासनावर गोब्राह्मणांचे पालनकर्ते श्रीशिवछत्रपती-महाराज औरंगजेबाचे छातीवर हिंदुसाम्राज्याची प्राणप्रतिष्ठा करते झाले! जयसिंगाला ते शरणागतत्वाचे पत्र लिहिताना, मल्लयुद्ध पूर्ण भरात असताना शत्रूला पेच मारून उलथून पाडण्यासाठीच पण त्याचे पुढे नम्र होऊन त्याचे पायाला हात घालताना बायाबापड्या मूर्खपणाच्या डौलाने नि तिरस्काराने शिवाजीवर ओरडल्या होत्या, 'थूः शरण गेला! शत्रूचे पाय धरले!' आता त्या पाय धरणाऱ्या हाताने तोच शत्रूचा पाय हिसडून टांग मारून त्याच पेचाने शत्रूस चीत करताच हरिद्वारपासून कन्याकुमारीपर्यंत हिंदु जनता टाळी देऊन गर्जली-गर्जत आहे- आणि गर्जत राहील की, 'भले वीर! खूप पेच मारला! शत्रूस चारी मुंड्या चीत केला!'

ही झाली शत्रूची गोष्ट. दुष्टांशी महाराज असे वागले. कपटनीतिपटूशी हे वर्तन झाले. पण सुष्टाशी? साधूशी? रामदास म्हणतात,

**‘आचारशील विचारशील। न्यायशील धर्मशील।**
**सर्वज्ञ सुशील। जाणता राजा।।’**

की ज्याने इतक्या खटाटोपाने संपादिलेले राज्य एका कागदाच्या केवळ चिटोऱ्यावर केवळ एका शब्दाने हे राज्य ‘रामाचे’ म्हणून निर्देश करून दासांचे झोळीत भिक्षा घातली आणि आपण ‘हिंदुधर्मासाठी फकिरी घेतली!’

आदानं हि विसर्गाय सतां वारिमुचामिव।

साध्य जर पवित्र आहे तर त्याचेसाठी गाजविलेले शौर्य नि दाखविलेली नम्रता, कलेले रण वा निघालेले शरण, ही दोन्हीही पवित्रच आहेत. जे जे साधन पवित्रतम साध्याचे सिद्धिस्तव अपरिहार्य नि अंती मनुष्यजातीस लाभकारक ठरते त्याचे अवलंबन पवित्रच होय.

हिंदुधर्माचे पुनरुज्जीवन करून स्वराज्याचा प्राणाधार जे स्वराज्य ते संपादन करणे ही इच्छा जर न्याय्य आहे, हे कृत्य जर धर्म्य आहे, हे ध्येय जर दैवी ईश्वरी संपतीचे आगर आहे, तर मग त्या ध्येयाचे सिद्धीसाठी जेव्हा शौर्याने काम होण्यासारखे असेल तेव्हा सिंहाच्या तोंडात हात घालून त्याचे दात उपटण्यास धावणारे दुर्दांत शौर्य मी प्रकट करीन; पण जेव्हा ते महाकार्य शौर्याने साधण्याचे स्थली उलट बिघडणारे आहे, तेथे मी भयंकर भुजंगास भुलवून आणणारी आपली नम्रपणाची मंजुळ पुंगी वाजवीन. ह्या ध्येयाचे पूर्णतेसाठी, देवाच्या कार्यासाठी जनतेच्या कल्याणासाठी मी केव्हा ‘बळीस’ अगदी दुर्बळ दिसणारी वामनमूर्ती धारण करीन, जरासंधाच्या नगराच्या महाद्वारातून विजयवाद्य वाजवीत शिरण्याचा मूर्खपणा करण्याचे स्थली छद्मवेशांत आडमार्गाने दीनासारखा प्रवेशीन, कालयवनापुढे भरघाव पळ काढीन, मुचकुंदाच्या गुहेत लपेन, भीमासारखा सैपाकी होईन, पण संधि साधताच एकाएकी उलटून रामासारखा रावणावर तुटून पडेन, नरसिंहासारखा घोर होईन, अभिमन्यूसारखा विजय पाहण्याचीही आशा न धरता मारला जाईन- पण--

व्यूही शिरेन सरसा मागे परतेन एक पदही न।

शिवरायांच्या राजनीतीचे हे सूत्र होते, म्हणूनच औरंगजेबासारख्या कपटी, बापास बाप न म्हणणाऱ्या, मुसलमानी बादशहाचे तोडीस तोड देऊन त्यांना हिंदुपदपादशाही स्थापन करता आली.

**शिवरायांच्या यशस्वी राजनीतीचे हे मर्म होते. एतदर्थच**
**कातर्यं केवला नीतीः शौर्यं श्वापदचेष्टितम्।**
**अतः सिद्धि समेताभ्यमुभाभ्यामन्वियेष सः।।**

या नीतिसूत्राचे आधाराने वागून शिवाजी स्वराज्य स्थापू शकले! शिवाजी शिवाजी होऊ शकले!!

* * *

# 'थूः तुमच्या जिनगानीवर'

काय? आज तीनशे वर्षानंतर मला शिवाजीला, तुम्ही मराठ्यांनी जे बोलाविलेत, माझा वाढदिवस साजरा करण्याकरिता म्हणून मोठ्या गाजावाजाने जे आमंत्रिलेत ते काय माझी अशी संभावना करण्याकरिता? युद्धे, लढाया, सेना, सैनिक, धावे, स्वाऱ्या, अंतिमत्तरे, भगवे झेंडे, ताशे, ढोल केवढा गाजावाजा आणि केवढा गोंधळ तुम्ही करीत होतात-ते ऐकून मला वाटले की, तुम्ही मला जे बोलावता आहात ते अर्थात कोणता तरी महान पराक्रम करून दाखविण्यासाठीच होय. तीनशे वर्षांनी का होईना, पण माझ्या मागे माझे घालविलेले राज्य परत जिंकून ते माझ्या चरणी अर्पण करण्याकरिताच तुम्ही मला आमंत्रिले असाल- ह्या रणगर्जना आणि कोलाहल चालविला असाल!

पण पाहतो तो काय? नाटकगृहात चाललेले एखादे नाटक यापेक्षा अधिक रंगते! हे लोक सरड्यावर बसून स्वाऱ्या करीत आहेत. पिंडावर पोट भरू पाहत आहेत, जिभेचे पट्टे फिरवीत त्या पटाईत धारकऱ्यास धाकवू इच्छित आहेत, युद्धाच्या भातुकली खेळत आहेत, स्वातंत्र्य, युद्ध, कूच, स्वारी- या शब्दांचीच नव्हे तर या वाचिवीरांनी माझ्या शिवाजी या नावाची देखील इतकी विटंबना केली आहे की, त्याचा आता कोणास काडीचा देखील धाक देखील वाटत नाहीसा झाला. माझे नाव घेताच अगदी तीस पस्तीस वर्षांपूर्वी देखील माझे शत्रू चमकून उठत. त्यांना वाटे शिवाजीचे नाव म्हणजे रणदेवतेचा जाज्वल्य मंत्र आहे. जर का ते महाराष्ट्रात उच्चारू दिले, जर का कोणास त्याच्या चित्राची मिरवणूक काढू दिली वा त्याचा जयजयकार करू दिला तर न जाणो महाराष्ट्र आपले गेलेले राज्य परत मिळविण्यासाठी तानाजी, बाजीसारखे शिर हातावर घेऊन शत्रूवर तुटून पडेल! म्हणून ते नाव कोणाच्याही कोनाकोपऱ्यात ऐकताच माझे शत्रू चिडून जात, भिऊन उठत; त्या वासुदेव बळवंताने माझे नाव घेतले होते, त्या चाफेकराने माझ्यावर एक कविता रचून म्हटली होती- तर केवढी खळबळ उडाली, माझे उत्सव भयंकर अपराध ठरले. माझ्या नावास उच्चारण्याची बंदी झाली. हरीच्या नावाने राक्षस चिडत तसे माझे नावाने ते चिडत. पण हाय हाय! माझ्या नावास तुमच्या करंट्या जिभेचा स्पर्श होताच त्यातील ती खरी जादू आज निघून गेलेली दिसत आहे. दगडावर ठिणगीचा जसा काही परिणाम होत नाही तसा आजकालच्या या मुर्दाड महाराष्ट्रावर माझ्या नावाचा काहीच परिणाम होईनासा झाला. पूर्वी त्यास वाटत होते महाराष्ट्र हे दारुचे कोठार; त्यावर ही शिवाजीच्या स्मृतिची ठिणगी पडणे नको; पण आता त्यांना कळून चुकले की, हे दारुचे कोठार राहिलेले नसून नाल्याची घाणेरडी दलदल झाली आहे. शिवाजीच्या जळत्या नावाने ही दलदल पेटणे तर

दूरच; पण उलट त्या नावातील जळती ठिणगी तीवर पडताच ती ठिणगीच विझण्याचा पक्का संभव. म्हणूनच हे वाचिवीरांनो, तुम्हास आता माझ्या नावाचे जयजयकार, वाटेल तितके करू देण्यात येतात. कारण माझ्या नावाने तुमच्या मुर्दाड मनात एक कर्तृत्वशील चेतना उत्पन्न होणे अशक्य झाले आहे. त्या योगे माझ्या नावाचा दराराही नाहीसा होऊन माझे शत्रुदेखील माझे नावाशी विषारी दात काढून टाकलेल्या सापाशी गंमतीने खेळावे तसे खेळत आहेत. माझ्या अपमानाची परमावधी म्हणजे ज्यांनी माझे राज्य घेतले; माझ्या सिहासनावर जे आज बसत आहेत, त्यांनीच माझा पुतळा उभारावा! -भर महाराष्ट्रात उभारावा! अगदी पुण्यास उभारावा! ज्या प्रांतात मी शाहिस्तेखानावर छापा घातला आणि अफजुल्ल्याला चिरून काढले. त्यात उभारावा आणि तसे करण्यात माझ्या शत्रूंना यत्किंचितही भिती वाटू नये!! तुम्हांवर त्याचा काही लवलेश तरी परिणाम होईल अशी धास्ती वाटू नये!!!

दगडांनो! तुम्ही माझा या शिवाजीचादेखील एक दगड करुन टाकलात! राखेत टाकलेली आहुती जशी निष्फळ होते, व्रतच्युताच्या तोंडी भैरवमंत्रही जसा निस्तेज होतो, प्रेताला बांधलेली तलवार जशी प्रेतासारखीच पडून राहते, तसा हा माझा ह्या पुण्यक्षयी, क्षयग्रस्त पुण्यास उभारलेला पुतळा दगडासारखा एक दगडच होऊन पडला आहे आणि एखाद्या साध्या दगडाची जितकी भिती वाटच्या चोरास वाटते, तितकी देखील त्या माझ्या पुतळ्याच्या दगडाची भिती त्यास वाटत नाही. कारण तुमचे हे लुळे हात, हे पंगु पाय, ही मुर्दाड मने! ह्या माझ्या दगडी पुतळ्याच्या दगडाइतका देखील उपयोग करून घेत नाहीत!!!

मग तुम्ही मला बोलाविलेत तरी का? केवळ माझी अशी विटंबना करण्यासाठी? ज्या प्रतापगडावर मी अफजुलखानाचे शिर टांगले आणि शत्रूचा दहा हजार घोडा पाडाव करुन बांधून टाकला- त्याच प्रतापगडाला अवघ्या दहा-बारा पठाणांनी लुटावे, आणि माझ्या कुलस्वामिनीच्या मूर्तीस गदागदा हलवून सोडावे आणि त्या गडाच्या आजूबाजूस पसरलेल्या हजारो मराठ्यांनी बांगड्या भरून, लुगडी नेसून परकी पोलिसांच्या पाया पडत फिरावे. ‘ते बारा पठाण धरा! आमची देवी लुटली!’ थू: तुमच्या जिनगानीवर!! थू: तुमच्या जिनगानीवर!!

इकडे प्रतापगडची ही अवस्था असता तुम्ही तिथे जाऊन हा त्रिशत-वार्षिक शिवोत्सव-त्या प्रकारे, माझ्या मराठ्यांना शोभेल अशा प्रकारे त्या देवीच्या अपमानाचे उट्टे काढून साजरा करावयाचा का तिकडे जुन्नरला जाऊन मला अंगाई गीते गात बसायचे! अरे, ह्या माझ्या महाराष्ट्राच्या अपमानास पाहून माझ्या अंगाची लाही लाही होत असता तुम्ही बायकांसारख्या अंगाया गाऊन का मला शांत, प्रसन्न करू शकाल! आणखी मला पराक्रम असा कोणचा दाखविलात! होय, ती जुन्नर किल्ल्यावरची दौड! वाः ज्या

किल्ल्यावर मुलूखमैदान तोफा आहेत, शत्रूंचे झेंडे झुलताहेत, मारगिऱ्यातून आगीचा मारा चालला आहे अशा शतशः किल्ल्यावर भरधाव चालून जात जिवानिशी शत्रूंचे जीव घेणारे आणि किल्ले सर करणारे हजारो वीर ज्या ऱ्या त्या महाराष्ट्रात पाहिले, त्या मला ह्या तुमच्या एक गोटात देखील वरून फेकण्याची गोफण ज्या किल्ल्यावर नाही त्या किल्ल्यावर नुसते दुडदुडत धावत जाण्याचा तो पराक्रम दाखविलात! अशा प्रकारे तो किल्ला सर करून- पुनः तत्क्षणीच इंग्रजांचा इंग्रजास परत देऊन मागचे पाउली मागे फिरण्यात जो उदारपणा दाखविलात,तो पाहून तर मी अगदी थक्कच झालो. पायात पैंजण घालून किल्ल्यावर दुडदुड धावत जातात तर याहूनही बहार होती! खाली येताच लाडूचे जेवण; आणि मग ती भगव्याची मिरवणूक- ती व्याख्याने- माझ्यावरील तुमच्या अलोट प्रीतीची व्याख्याने! आणि माझ्या इतिहासाच्या साधनांचे भाराभर प्रसिद्ध केलेले भारूड. बस्स, हे काय ते तुमचे पराक्रम तुम्ही मला दाखविलेत!

माझ्या देशबंधुंनो, माझे तुमच्यावर निरतिशय प्रेम आहे. ह्या माझ्या हिंदुस्थान देशासाठी आणि हिंदु जातीसाठी मी अनेकवार माझे प्राण धोक्यात घातले, जन्मच्या जन्म कष्ट काढले, म्हणूनच मला तुमचे काही चुकत असेल तर ते कडकपणे सांगण्याचा अधिकार आहे. यास्तव मी स्पष्टपणे सांगतो की, तुम्ही माझेवर प्रीती करता याचा मला मुळीच संतोष वाटत नाही. तोवर केव्हांही वाटणार नाही की, जोवर तुम्ही या माझ्या मातृभूमीच्या उद्धारार्थ आणि हिंदु जातीच्या गौरवार्थ काही मिळवीत नाही, त्याग आणि शत्रूला धाकविणारे धाडस दाखवीत नाही, पराक्रम करीत नाही आणि नुसती माझी स्तुतिस्तोत्रे गात बसता!

जे हरविलेत ते मिळविलेत का? ज्या संकटाच्या कंसाने तुम्हास बंदीत टाकले त्या संकटाचा शिरच्छेद केला आहा का? ज्या पूतनेने फसविले तिची फासळी नि फासळी विदारली आहेत का? तुम्ही दासचे दासच आहात ना? या भूमातेच्या पायात परवशतेच्या बेड्या जशाच्या तशाच आहेत ना? मग तुम्ही माझी नुसती स्तुति करीत काय बसला आहात? त्या स्तुतीसारखी माझी दुसरी विटंबना नाही! कारण ज्या भारतात मी शिवाजी जन्मलो तो भारत ज्यांच्या हातात आहे तो मजहून, माझ्या जातीहून श्रेष्ठ ठरलाच पाहिजे. जितकी माझी अधिक स्तुती कराल तितक्या पटीने आपोआपच तो आपला विजेता अधिकाधिक श्रेष्ठ ठरत जातो. रावणाला दहा तोंडे आणि वीस हात होते म्हणून जितका अधिक गौरवाल, तितक्या अधिक पटीने त्यास जिंकणारा राम अधिकतर पराक्रमी ठरणार. तेव्हा माझी खरी स्तुती करावयाची असेल तर हे भारत मुक्त करण्यासाठी, जनतेसाठी तुम्ही काय केलेत ते कळवून घेण्यास मी आलो आहे, तर तुम्ही मला शिवकालीन इतिहासाचे संशोधनात्मक भारूड घेऊन सामोरे येता! अरे, शिवकालीन इतिहास मला माहीत आहे; तुम्हाला माहीत आहे त्याहून शतपटीने मला माहीत आहे. तुम्ही तुमच्या

काली कोणता बंब वाजविलात ते मला सांगा. तुम्हा स्वतःला कालच नाही की काय? तो तुमचा काल उत्पन्न करून तो मला वाचावयास द्या. ज्याला आपल्या स्वतःचे पौरुषाने स्वतःच्या कालाचा शककर्ता होता येत नाही, तो मुर्दाड देश, ती मुर्दाड पिढी, पूर्वजांच्याच कालाचे तुणतुणे तेवढे वाजवीत बसते. करंटाच आपल्या कोट्यधीश पणजाचे नावावर आपली पत नेहमी पटवू पाहतो. आजच्या करंट्या महाराष्ट्रा, तीच स्थिती तुझी झालेली आहे! जो उठतो तो शिवकालीन म्हणून काही तरी खरडण्यातच जन्मसाफल्य मानतो. जी कादंबरी पाहावी ती 'शिवकालीन', पोवाडा 'शिवकालीन', नाटके 'शिवकालीन', पुतळा शिवकालीन इतिहास 'शिवकालीन', संशोधन 'शिवकालीन!' शिवकालीन कालावाचून दुसऱ्या कोणा-कालास शिवण्याची चोरी! प्रत्यक्ष मला शिवाजीला आणि माझ्या शिवकालीन पिढीला देखील या शिवकालीन स्मृतिचा एखाद्या शिवीसारखा राग यावा तितका तिचा अतिरेक झाला आहे!

'देवा, माझ्या महाराष्ट्राच्या हितासाठी तरी आता महाराष्ट्राला माझा विसर पडू दे. माझ्या झाल्या गेलेल्या शिवाजीच्या स्मरणात गुंतलेला तो महाराष्ट्र इतका बेशुद्ध झाला आहे की, त्याला स्वतःला देखील शुद्ध उरली नाही. मी पूर्वीचा विगत शिवाजी त्यांना इतका आवडतो आहे की, त्यांना दुसरा एखादा नवीन शिवाजी उत्पन्न व्हावा ही इच्छा देखील असह्य होते. मी, तानाजी, बाजी आणि आमचे इतर खरे खोटे लहान मोठे सवंगडी जी लहानमोठी साहसे करीत होतो, परिस्थितीशी टक्कर देऊन लाथेसरशी उलटून पाडण्याची जी पौरुषी हाव धरीत होतो, तिची वाहवा करता करता या लोकांना पुरेसं होतच नाही. पण तसेच लहान मोठे साहस, तशीच एखादी पौरुषी हाव जर ह्यांच्यातीलच एखादा धरू लागला, तर हेच लोक त्याला माथेफिरू, अत्याचारी, अराजक, वेडगळ म्हणून शिव्या हासडू लागतात. आम्ही मूठभर होतो तरी झुंजू निघालो म्हणून आमची जे लोक स्तुति करतात, तेच लोक त्यांच्यातील कोणी त्याच हेतूने झुंजूं निघताच त्यांस 'मूठभर' म्हणून वेडगळ ठरवू लागतात! जो गुण आमच्या शिवकालीन कादंबऱ्यांत 'साहस' होतो, तोच प्रस्तुत कालातील एखाद्यात दिसताच माथेफिरू अत्याचार ठरतो! आणि आमचे पाय मागे ओढणाऱ्या पण सद्धेतुक वृद्धांच्या साहसशून्य शहाणपणास जे 'शिवकालीन' वाङ्मयात दोष देतात, तेच ती साहसशून्यता यांच्या पिढीत दाखवतात नि खरे शहाणे म्हणून मिरवू शकतात. फार काय सांगावे! पण आमच्या शिवकालीन आणि राजारामीय पिढीत जे काही देशभक्त जहागिरी इनामावरच झुंजत, त्यांच्याही देशभक्तीचे यथार्थ गौरव आणि योग्य कौतुक करणारे हे लोक यांच्या पिढीत जे देशस्वातंत्र्यार्थ झुंजताना फाशीवाचून दुसऱ्या इतर कोणत्याही जहागिरीचे अमिष डोळ्यापुढे धरीत नाहीत, अशा जाज्वल्य देशवीरांनाही देशवीर म्हणावयास सिद्ध नसतात. त्यांच्यावर एक अक्षरही लिहिणे म्हणजे असभ्यपणा होय असे समजतात. आता हे मी जाणून आहे की, हा प्रभाव त्या इंडियन पिनल कोडाचा

असावा आणि जर कदाचित त्या कोडात माझी स्मृति करणे दंड्य अपराध गणला जाता, तर या शिवकालीन काळालाही त्यांच्या भीतीच्या काळोखातच तोंड खुपसून राहवे लागते आणि आमचीही मराठी वाङ्मयात तशीच एकेरी उल्लेखिलेली संभावना होती की, जशी त्या वासुदेव बळवंतांची होते! त्या जाज्वल्य देशवीरांचे एक चरित्र अलिकडेच माझे अवलोकनात आले. त्यात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांना कित्येक ठिकाणी सन्मानार्थ बहुवचनी उल्लेखिले आहे. सार्वजनिक काकांनाही अहो जाहो म्हटले आहे. ते ठिकच आहे. तेही देशभक्त आणि त्यागी देशसेवकच होते; पण वासुदेव बळवंत फडक्यांना प्रत्यक्ष त्यांच्या चरित्रातच येथून तेथून एकेरी अरे तुरेने संबोधिले आहे. देशभक्तीत आणि देशसेवेसाठी केलेल्या त्यागात फडके त्यांच्या पिढीत इतके कमी प्रतीचे ठरले! कारण त्यांनी देशहितार्थ आयुष्याच्या सायंकाळची शिळोप्याची वेळ किंवा पगाराचा एक लक्षांश तेवढाच त्याग करण्याचा सभ्यपणा न करता आयुष्याचे आयुष्य आणि सर्वस्वचे सर्वस्व त्या देशासाठी त्यागाचे वेदीवर बळी देण्याचा हलकटपणा केला म्हणून त्यांना दीड दमडीच्या खर्डेघाशांनी देखील असे तुरे करावी!! वासुदेव बळवंतांचे साहस अयशस्वी ठरले; पण यश हेच जर अहो जाहोचे एकमात्र गमक असेल, तर माझे शिवाजीचे तरी काय? अफजुलखानाच्या कैचीत मी सापडलो तिथे म्हणे केवळ योगायोग होता. जर का मी मरतो, तर ह्याच जात्यावरच्या ओव्या, गाणाऱ्या बाया त्या सगळ्या डावाला मूर्खपणाची पराकाष्ठा म्हणत्या-म्हणत्या, आपण होऊन गाढवासारखा अफझुल्ल्याच्या तंबूत गेला! आणि शाहिस्तेखानाच्या बंगल्यात! रतीभर चाहूल अवेळी होती, एक ढेकूण भलत्याच वेळी त्या सैंपाक घरातील मुसलमानांपैकी कोणास डसून जागृत करता- मी जीवंत धरलाच जातो! आणि दिल्लीस त्या पेटाऱ्यात? ते मुसलमान मंत्री तंबाखूची पिचकारी टाकण्यासाठी जरी पुढे सरकते नि सहज जरा नुसते त्या पेटाऱ्यात डोकावते, एखाद्या उंदरासारखा सापडलो असतो! केवळ योगायोग म्हणून निभावलो! पण जर त्याच्या उलट घडते तर हेच 'शिवकालीन' आजचे भाट, यशाचे भोपे, मजवर 'माथेफिरू', 'गोंधळ्या', 'उल्लू' म्हणून भुंकत सुटते! म्हणून मला या तोंडपुज्या 'शिवकालीनांचा' अगदी तिटकारा म्हणून येत आहे. कारण यांना पराक्रमाची पारख नाही. ते केवळ यशाचे मिंधे आहेत. त्यांना हेतूची, त्यागाची आणि उत्कटतेची ओळख नाही. हे केवळ घुगऱ्या तिकडे उदो उदो करणारे आहेत! नाहीतर आमच्या पिढीतील वैयक्तिक पराक्रमाच्या तोडीस तोड देणारे पराक्रम आणि तेही क्वचित आमच्या पिढीहून एक रति अधिकच निर्भेळ अशा जाज्वल्य देशभक्तीने उत्स्फूर्त झालेले- यांच्या ह्या स्वतःच्या पिढीत यांच्या डोळ्यासमोर घडत असताना यांना असले देशवीरत्व, ते अजून अयशस्वी होत आहे, म्हणूनच काय ते हायकोर्ट जज्जपणापेक्षा किंवा वकीलपणापेक्षा सापेक्षतः असभ्य आणि हलकटपणाचे वाटते ना? दुर्लक्षार्ह भासते ना? आणि तेच गुण केवळ यशस्वी झाले म्हणून 'शिवकालीन पिढीत' वर्णनीय ठरले ना? यश!

ह्यांना एक सैनिक पडला न पडला की, लढाई जिंकली गेली पाहिजे; बीज टाकले न टाकले की, त्याचा आंबा होऊन पाडास लागून अगदी आढीत पिकून यांच्या ओठाशी आला पाहिजे. नाही तर ते बीज व्यर्थ गेले, तो सैनिक माथेफिरूसारखा व्यर्थ मेला! म्हणून देवा, या माझ्या 'शिवकालीन' स्तुतिपाठांपासून माझे रक्षण कर. माझ्या राष्ट्राच्या हितासाठीच मी शिवाजी अशी विनंती करतो की, महाराष्ट्रास माझा थोडा विसर पडू दे. मी मागचा शिवाजी त्यांना इतका आवडलो आहे की, नवीन शिवाजी उत्पन्न होण्याची इच्छा देखील त्यांना आता असह्य होते!

तुम्ही म्हणाल की, एका ओसाड किल्ल्यावर दुडदुड धावून येणे, लाडूच्या जेवणावळी झोडणे आणि माझ्या इतिहासाच्या संशोधनाचे भारूडाचा मला नैवेद्य अर्पिणे यापलीकडे या परिस्थितीत अधिक काही पराक्रम करून दाखविणे तुम्हास अशक्य होते- तर मी म्हणतो जोवर तुमच्या मुर्दाडपणाचे प्रतिबिंब असणारी ही परिस्थिती आहे तोवर यापुढे तुम्ही मला बोलावण्याचा मुर्खपणा तरी करू नये. हा तुमचा कार्यक्रम ज्यांच्या उत्सवाला शोभेल अशा कोणाचा, उदाहरणार्थ त्या पळपुट्या दुसऱ्या बाजीरावाचा उत्सव करीत जा. त्याला किल्ल्यावर हल्ला करण्याची धमक नव्हती- त्याला तुमच्या या दुडदुड धावत जाण्यायेण्याचे देखील आश्चर्य वाटेल. परक्यांचे झेंडे आपल्या राजवाड्यावर उडत असताही लाडूंचा नैवेद्य तो खाईल. मी एका राज्यारोहणाच्या दिवशी तेवढा लाडूस शिवतो. तो दिवस येईल तेव्हा मला बोलवा! सिंहाला आमंत्रण देऊन त्याच्या पानात हिरव्या गवताच्या पेंढ्या सोडण्याचा मूर्खपणा तरी पदरी बांधून घेऊ नका. ते अतिथ्य कोणा बैलोबाचा उत्सव चालू करून त्याचे वाट्यासाठी राखून ठेवा. अरे मी जर माझ्यापूर्वी होऊन गेलेल्या विजयनगरच्या हरिहर बुक्कांचे नुसते शतसांवत्सरिक उत्सव करून लाडू झोडतो किंवा त्यांच्या जन्मतिथींचा आणि लग्नतिथींच्या आणि मृत्युतिथींचा जंत्र्या जुळविण्यातच जीवनास कृतार्थ मानतो तर मी हिंदुपदपादशाही स्थापू शकून त्या माझ्या पूर्वजांच्या ऋणातून मुक्त होतो का? मीही रामायण ऐके. पण आजीबाईसारखे तांदूळ घेऊन जन्मभर तेच नुसते ऐकत बसत नसे किंवा मेलेल्या रावणासच प्रतिवर्षी नाटकानाटकातून, पोवाड्यापोवाड्यातून मारीत बसत नसे. तर मी माझ्या वेळच्या जिवंत रावणास, रामायण ऐकताच मारू धावे. मी अफजुल्ल्यास मारले, शाहिस्त्यास चिरले, पाच पादशाह्या धुळीस मिळविल्या! रामायण ऐकताच रामासारखे पराक्रम केले.नुसत्या रावणाच्या दहा तोंडाच्या वीस मिशांस केस किती होते आणि मारुतीच्या उड्डाणाच्या वेळी जी रेती वर उसळली तिच्यात कण किती उसळावे त्याचे ऐतिहासिक संशोधन करीत बसण्यातच रामायणाच्या वाचनाचे उद्यापन केले नाही. तर हनुमानाचे उड्डाणाची कथा ऐकताच जी तुम्हा अकर्मण्य भ्याडास, या माझ्या हिंदु जातीच्या आणि महाराष्ट्राच्या पोटी जन्मलेल्या पंगूहून पंगु पिढीस सदा भेडसावते, त्या परिस्थितीस, पायाखाली हनुमानाने जंबूमालीस तुडविले तसे

तुडवून दहा शतकांच्या राष्ट्रीय अवनतीच्या भयंकर गर्तेच्या समुद्रावरून उडी घेतली नि परदास्याची लंका जाळून भस्म केली.

तसे काही करा तर तुम्ही माझे नि मी तुमचा! अरे, माझे नाव गल्लोगल्ली गाणाऱ्या तुम्हा मुर्दाड महाराष्ट्रीयांपेक्षा आज जो माझे उत्सव बित्सव कधी फारसे करीत नाही तो बंगाल नि तो पंजाब मला तुमच्याहून फार जवळ वाटत आहे. कारण माझ्या हिंदु जातीच्या उद्धारार्थ माझ्या सैनिकाला शोभेल असे काही तरी साहस ते मधून मधून तरी करीत आहेत. जो माझ्या या कुलाचा, वंशाचा उद्धार करण्यासाठी संकटावर चाल करून जाऊन त्याचा शिरच्छेद करतो तो माझा मुलगा. मग त्यास माझी नक्की जन्मतिथी कोणती ते जरी पाठ नसले तरी चिंता नाही. पण जो माझ्या घरची इकडची काडी तिकडे करीत नाही, तर चोर घरात वावरत असता तोंडावर बुरखा ओढून 'माझे बाबा, माझे बाबा!' 'माझा शिवाजी, माझा शिवाजी' म्हणून नुसती माझीच माळ जपत बसतो तो माझा मुलगा नव्हे. तो पोटी आलेला जंत होय!

मी विचारतो, माझे राज्य कुठे आहे? माझा मुकूट कोठे आहे? हे आम्हा भारतीयांचे आकाश, ही भूमी, हा समुद्र- यांवर स्वामित्व कोणाचे आहे? का आहे? माझ्या अंगाची लाही लाही होत आहे! विचारू तरी किती, कसे?- या प्रश्नांची, विचारलेल्यांची आणि न विचारलेल्यांची उत्तरे द्या. परिस्थिती बदलली असेल, तर माझ्या मशालीने नसले तर विजेच्या दिव्यांच्या प्रकाशाने नवीन मार्ग काढा, नवीन योजा. मी देखील काही रामांच्याच धनुष्यबाणांनी लढलो नाही, मीही साधने बदललीच पण माझ्या काळचा रावण मारला! तुम्ही साधने बदला. नवीन वैध पवित्रे टाका. काय वाटेल ते करा- पण झुंज जिंका! आणि जोपर्यंत तुम्हास जसे काही करता येत नाही, वरील प्रश्नास उत्तर देववत नाही, तुम्ही एक वा अनेक शिवाजी उत्पन्न करीत नाही, तोवर महाराष्ट्रीयांनो, तुम्हास माझी शिवाजीचीच शपथ आहे की, माझे पोवाडे तुम्ही गाऊ नका, माझे नाव पुन्हा 'मी तुमचा' म्हणून घेऊ नका, तुमच्यासारख्यांनी नव्हे तर माझ्यासारख्या

**शूरमर्दाचा पोवाडा।। शूर मर्दाने गावा।।**

**अनुस्मरणाने नव्हे, तर यथाकाल अनुसरणाने गावा.**

- दिनांक ५ एप्रिल १९३०.

* * *

# अटकेवर हिंदु विजयाचा भगवा झेंडा

(१)

हिंदुंच्या अर्वाचीन इतिहासात, म्हणजे कमीत कमी गेल्या एक हजार वर्षांत हिंदुमात्रास अत्यंत मंगलकारक, अत्यंत अभिमानार्ह आणि अत्यंत गौरवास्पद असा जर कोणता दिवस उगवला असेल, तर तो तो होय की, ज्या दिवशी हिंदूंच्या भगव्या झेंड्यास झुंजवीत नेऊन, मुसलमानांच्या बादशाहीचे तुकड्यामागून तुकडे उडवीत, हिंदुच्या साम्राज्याचे प्रांतामागून प्रांत इस्लामी राज्यसत्तेच्या गुर्मीच्या छाटून टाकलेल्या पंज्यांतून विमुक्त करीत, हिंदुच्या विजयी सैन्यांनी त्यास इ.स. १७५८ च्या एप्रिल-मेच्या संधीस अटकेवर रोविले!

एकदंरीत पाहता दाहिर राजाच्या पराभवापासून म्हणजे आठव्या शतकापासून हिंदूंच्या पडत्या काळास आरंभ झाला. अफगाणिस्थानापासून तो बंगालच्या शेवटच्या नगरापर्यंत आणि काश्मीरपासून तो रामेश्वरापर्यंत हिंदूंची सारखी पिछेहाट होत होत सर्व हिंदूंची राजसत्ता मुसलमानांच्या हाती गेली. जर या पराभवाचे उट्टे हिंदूंना केव्हाही काढता आले नसते तर हिंदू जातीस आणि हिंदु संस्कृतिस जगात तोंड काढण्यास जागा उरली नसती. जेथे तेथे सारखी हिदुंचीच हार होत आली होती. त्यामुळे मुसलमानांसच नव्हे तर उभ्या जगास सहजच असे वाटू लागले असते की, हे हिंदू स्वभावतःच दुसऱ्यांचे दास होऊन राहण्यास योग्य आहेत. हिंदू संस्कृती ही मनुष्यमात्रास शेळपट, घरघालू, भित्रा आणि निर्जिव करणारी आहे. हिंदू हा जिवंत कलहात मुसलमान किवा पोर्तुगीज किंवा इंग्रज यांच्यापुढे टिकाव धरू शकण्यास कधीही समर्थ होणारा नसल्यामुळे, सृष्टीच्या निर्दय पण कार्यक्षम नियमाप्रमाणे ते हिंदू राष्ट्र राष्ट्रांच्या झुंजीत मेलेच पाहिजे. मुसलमान तर इतकेच म्हणून थांबेनात. त्यांचे सहस्त्रावधी मुल्ला आणि मौलवी मुसलमानांनी हिंदूवर मिळविलेल्या अखंड जयाकडे बोट दाखवून सर्व जगास सांगू लागले की, 'हे पहा! हे हिंदू मुसलमानांपुढे जे गोगलगाय होऊन जातात, ते काही त्यांच्यात जूट नाही म्हणून, मुसलमानांवर ते भोळसटपणे विश्वास टाकतात म्हणून, त्यांचे सैन्य-संघटन ढिले आहे म्हणून किंवा त्यांच्यात आत्मनाशक दुष्ट रुढी शिरल्या आहेत म्हणून नव्हे तर ह्या आनुषंगिक दोषांपेक्षा त्यांच्या प्रत्यक्ष मूलप्रकृतीतच अनुस्यूत असलेल्या न्यूनांमुळेच होय. हिंदु सामरिक कूटनीतीत अक्षम, फूट पडलेला, असंघटित आहे, म्हणूनच तो मुसलमानांच्या पुढे गोगलगाय झाला असे नव्हे तर हिंदू, हिंदू आहे म्हणूनच तो मुसलमानांपुढे हतबल ठरतो. आणि हिंदू, हिंदू आहे तोवर तो तसाच ठरणार! हिंदू

मूर्तिपूजक आहे-मुसलमान मूर्तिभंजक आहे. हिंदू हरला; मुसलमान जिकला. अर्थात् मूर्तिपूजक हा हरावयाचाच आणि मूर्तिभंजक हा जिंकावयाचाच! हिंदूंचा धर्म खोटा. हिंदूचे तत्वज्ञान फोल, हिंदूचे रक्त निःसत्व म्हणून हिंदूंकडे देवाने स्वतःच पाठ फिरविली आहे आणि त्यांना तो जय देत नाही. अहिंदूंना देव जय देतो, यावरूनच अहिंदूंचा धर्म खरा; त्यांचे तत्वज्ञान सत्य; त्यांचे रक्त जिवंत नि जिवंत राहण्यास योग्य! असा कोटिक्रम मुल्ला आणि मौलवी सरसकट करू लागले होते. इतकेच नव्हे, तर त्यांच्या त्या पुष्पित वागविग्वादाचा पगडा पडून शेकडो हिंदुचा देखील बुद्धिभ्रंश होत चालला. मुसलमानांच्या प्रत्येक समरविजयाबरोबर हिंदूंचा एकेक राजमुकूट चूर्ण होत असे. त्यांच्या संस्कृतिच्या आत्मविश्वासाचा आणि हिंदुत्वाच्या जीवनाचाही एकेक धागा तुटत जाई. जर हीच स्थिती तशीच राहती, तर रणक्षेत्रावर हिंदूस पराजयामागून पराजयच येत राहते, तर अहिंदूच काय पण सृष्टीदेखील तिच्या निर्घृण, निष्ठुर स्वभावानुरुप तशा अकर्मण्य आणि दुर्बल राष्ट्राकडे पाठ फिरविती आणि त्याच्या भाळी 'जीवनकलहात मरण्यासच योग्य' अशी मुद्रा ठोकून त्यास काळाचे जबड्यात ढकलून देती! आज हे जगत् हिंदूशून्य होऊन राहते. हा देश स्वतःस हिंदूंचे हिंदुस्थान न म्हणविता हिंदूचे कबरस्थान म्हणविता! कारण कुणी काहीही म्हटले तरी ज्यास झगड्यात झगडता येत नाही आणि जिंकता येत नाही त्यास जगात जगता येत नाही- येणार नाही! हा सृष्टीचा निष्ठुर नियम आहे. दुर्बलांनी पंगु इच्छेच्या गुलाबांच्या फुलांमध्ये 'झगड्यात जो जिंकील तो जीवनात जगेल!' हा निष्ठुर नियम खोदलेली ती निसर्गाची तरवार कितीही झाकली तरी तिची जीवघेणी धार आणि त्या निसर्गाची ती 'red in tooth and claw' असणारी रक्ताळ वाघनखे ही काही बोथट होत नाहीत! लपूही शकत नाहीत!

'शेवटी न्यायाचा विजय होईलच! भगवान करील ते खरे!', 'भजन करीत बसू या म्हणजे झाले!' अशा दुर्बलांच्या पंगु इच्छांच्या गुलाबांत ती निसर्गाची वाघनखे झाकू पाहणाऱ्या अकर्मण्य हिंदूंच्याच पिढ्या जर वाढत जात्या तर, जर रणक्षेत्रात हिंदूंना जिंकताच येते ना तर, हिंदूंना जगताही येते ना, त्यांचा वेदान्त त्यांच्या वेदांचा खरोखरच अंत करणारा ठरला असता, जर त्या वेदांस धनुर्वेदाचा पाठिंबा देणारा शिवाजी इ.स. १६२७त जन्मास न येता!

पण हिंदुंच्या सुदैवाने तो शिवाजी जन्मास आला. इ.स. ७२७ पासून हिंदुंच्या पराक्रमास लागलेले खग्रास ग्रहण बरोबर ९०० वर्षे टिकले! पण ९०० वर्षे पराभवाच्या राहूच्या पोटात खिचपत पडला, तरी तो हिंदुंचा पराक्रम पचून गेला नाही आणि अगदी पिचूनही गेला नाही! १६२७ मध्ये शिवाजी जन्मल्याघटीस त्या ग्रहणाच्या मोक्षकालाचा पहिला विपल जन्मला. तो त्या वेळेस कोणास कळला नाही. केवळ इतिहासाच्या उलट्या दुर्बिणीतून आज तो दिसू लागला आहे. शिवाजीने हिंदूंच्या स्वतंत्र साम्राज्याची संस्थापना

केली. तो रणक्षेत्रात उतरला तेव्हा 'न्यायाचा जय होईलच!' ह्या दैववादाची माळ घेऊन न उतरता ती निसर्गाची निष्ठुर वाघनखे घेऊन उतरला. 'रणक्षेत्रात जिंकील तोच जीवनक्षेत्रात जगेल!' हा निसर्गनियम आहे ना? ठीक आहे, असेल! पण तो अमोघ आहे; तो अनुल्लंघ्य आहे. म्हणून त्याच्या त्या निष्ठुरतेस निष्ठुरतेनेच तोंड देऊन त्या 'red in tooth and claw' असणाऱ्या जीवनकलहाच्या वाघनखानेच अहिंदु गर्वाच्या अफझुलखानास मी चिरीन, ही हिंदुपराक्रमाने प्रतिज्ञा केली आणि भगव्या झेंड्याच्या तळाखाली भयंकर संगर माजले!

लढाईमागून लढाई झाली; पण पूर्वी हिंदुंना जितक्या निश्चिततेने अपजय येई, तितक्याच निश्चिततेने त्या दिवसापासून अहिदूंना अपजय येत गेला. जेथे जेथे मुसलमान भेटला, मग तो मोगल असो वा पठाण असो, सय्यद असो वा शेख असो- तेथे तेथे हिदूंनी- मग तो रजपूत असो वा बुंदेला असो, मराठा असो वा शीख असो- त्यास पिटून काढले. केवळ मुसलमानांसच नव्हे तर इंग्रज, पोर्तुगीज, डच- जो जो अहिंदु दिसला त्यास हिंदुंनी होऊन होऊन टक्कर देऊन रणक्षेत्रात चारी मुंड्या चीत केले. अशी चढती कला अटकेच्या विजयापर्यंत सारखी चालली. रणक्षेत्रात जो जिंकील तोच जीवनक्षेत्रात जगावयास योग्य! या शत्रूंच्या रानटी परंतु अखंडनीय कसोटीप्रमाणे विजेता हिंदु जगावयास योग्य ठरला आणि म्हणूनच आजही तो जगलेला आहे आणि भविष्यकालीही जगू म्हणून म्हणत आहे.

शिवाजीची जन्मघटी हा हिंदुपराक्रमाच्या सूर्याचे सातशे वर्षांचे खग्रास ग्रहण सुटण्याचा पहिला विपल होता. तेथून ते ग्रहण सुटत सुटत ज्या दिवशी हिंदुपदपादशाहीचा मराठी घोडा अबदालीच्या सेनेस हाणीत, हटवीत, हुसकावीत अटकेस पोचला त्या दिवशी ते ग्रहण पूर्णपणे सुटून हिंदूंचा प्रताप आपल्या सहस्त्ररश्मींनी पुन्हा प्रकाशू लागला. म्हणूनच 'शिवाजीचा जन्मदिन' आणि मुसलमानादिक अहिंदू सत्तेस धुळीस लोळवून अटकेपर्यंत अखिल हिंदुस्थानभर हिंदुराष्ट्राचे वर्चस्व स्थापन करणारा हा अटकेचा 'विजयदिन' हे दोन्ही दिवस हिंदुमात्रास अभिमानास्पद आहेत.

## जयंती आणि विजयंती

पण त्यातही शिवाजीच्या जन्मदिनाहूनही अटकेचा विजयदिन आपल्या हिंदूंच्या इतिहासात अधिक तेजाने तळपत राहणारा आहे. माधवाचार्य, हरिहर, बुक्क, श्रीशिवछत्रपति, राणाप्रताप, श्रीगुरुगोविंदसिंह, छत्रसाल इत्यादी तत्कालीन अनेकानेक हिंदु वीरांच्या जन्मदिनाचे महत्व तो दिवस उगवला तेव्हा अर्थातच त्या त्या पिढीस कळणारे नव्हते, त्या दिवशी इतर किती तरी मुले जन्मली होती! इतिहासाच्या उलट्या दुर्बिणीने काय ते त्या दिवसांचे महत्व आज दिसू शकेल आणि आपण त्या जयंत्या पाळतो हे

ठीकच आहे; परंतु ह्या सर्व जयंत्यास जे महावीर जन्मले त्यांच्या पृथक् पराक्रमाचे संभूयफलित ज्या दिवशी दृग्गोचर झाले, त्यांच्या अनेक कष्टांचे ज्या दिवशी सार्थक झाले, ज्या दिवशी त्यांनी हिंदुत्वाच्या गौरवार्थ आरंभिलेल्या शतकव्यापक महान युद्धाचे सार्थक होऊन रामेश्वरापासून अटकेपर्यंत हिंदुस्थानभर हिंदूंच्या देशावर हिंदूंची सत्ता गाजू लागली तो अटकेच्या विजयाचा दिवस हा उगवला तेव्हा ह्या मित्रांचेच नव्हेत तर शत्रूंचेही डोळे दिपून जावेत अशा महान तेजाने तळपत उगवला! प्रतिज्ञेहून पूर्ती ही जितकी अधिक आश्वासक आणि अभिमानार्ह असते, तितकीच जयंतीतिथीहूनही अटकेची ही विजयंतीतिथी अधिक अभिमानार्ह आहे. बीजारोपणाचे साफल्य जसे फलांच्या घोसांनी वाकलेल्या तरूंत होते, पेरणीच्या दिवसांचे साफल्य जसे फलर्तूच्या दिवसात होते, त्याचप्रमाणे वीरजन्मतिथीस ह्या विजयंतीतिथी सफल करतात. 'अरावणमरामं वा जगदद्येति निश्चितः।।' अशी घोर प्रतिज्ञा करुन ठाणलेल्या झुंजीत ज्या तिथीस रावणाची दाही शिरे रामाने छाटली. त्या विजयतिथीनेच जशी रामाच्या जन्मतिथीस शोभा आली, किंबहुना या विजयतिथीनेच त्या जन्मतिथीस जयंती असे नाव सार्थपणे धारण करणे शक्य केले, त्याचप्रमाणे सात पिढ्यांच्या हिंदु पराजयाचा सूड घेणाऱ्या हिंदु वीरांच्या अटकेच्या विजयाने, त्या सात पिढ्यांच्या जन्मतिथींना जयंत्यांचे वैभव अर्पण केले. एतदर्थ अर्वाचीन हिंदु इतिहासात जो दिवस नि ज्या घटना गौरवपर आहेत त्या सर्व दिवसांत आणि घटनांत अटक विजयाचा दिवस आणि घटना अत्यंत गौरवास्पद आहे. कारण त्या दिवशी सातशे वर्षानंतर मुसलमानांच्या हातून उभे हिंदुस्थान जास्तीत जास्त अंशांनी विमुक्त होऊन हिंदुपदपादशाहीचा उंचातील उंच कळस उभारला गेला!

काबूल आणि दिल्ली या दोन्ही इस्लामी सत्तांच्या सवतीस खिळखिळ्या करून आमच्या मराठ्यांनी पंजाब प्रांतासही अटकेपर्यंत मोकळा केल्यानंतर, पुढे आमच्या हिंदु-शिखांनी पंजाबातून मुसलमानी राज्यांचे नित्याचे उच्चाटन करुन अटकेच्याही पलीकडे उतरुन काबूल नदीवर हिंदुंचे ध्वज रोवले हे खरे; पण त्या वेळेस इकडे दिल्लीच्या खालचा हिंदुस्थान एका नव्याच परकीय सत्तेचे-इंग्लंडचे हाती पडला असल्याने हिंदुसत्तेच्या अधिकात अधिक विस्ताराच्या दृष्टीने हा अटक-दिवस अग्रगण्य ठरतो.

खरोखर, महंमद कासीम सिंध ओलांडून आला त्या इ.स. ७३२ पासून जवळजवळ एक हजार दोनशे वर्षावर काल गेला, त्यात ज्या दिवशी अहिंदुंना चौफेर सामन्यात तोंड देत आणि अबदालीच्या पठाणांना सिंधूपार पिटाळीत हिंदुवीरांनी स्वातंत्र्याचा जरिपटका अटकेवर फडकविला तो १७५८ च्या एप्रिल-मेच्या संधीचा आठवडा हा हिंदु पराक्रमाने आणि हिंदु गौरवाने गाठलेले परमोच्च शिखर आहे! त्या दिवशी हिंदु शक्ती जितकी प्रखर तेजाने तळपली तशी आजपर्यंत पुनश्च कोणत्याही दिवशी तळपू शकली नाही. यद्यपी यापुढे मात्र ती त्या दिवसापेक्षाही अधिक तेजस्वी, ओजस्वी आणि यशस्वी होऊ इच्छित आहे.

तशी ती भविष्यकाली व्हावी म्हणून ह्या अत्यंत शक्तिहीन आणि स्फूर्तिहीन वर्तमानकालाच्या विषारी वातावरणातून एक दिवसभर तरी निघून त्या भूतकालाच्या अत्यंत स्फूर्तिदायक वातावरणात शक्तिसंचयार्थ श्वासोच्छवास करण्यासाठी आपण त्या अर्वाचीन हिंदु विजयाच्या स्मृतिच्या अत्यंत उच्च, पूज्य आणि पवित्र शिखरावर आजचा आठवडा घालवू या!

* * *

(२)

ज्या दिवशी मराठ्यांच्या सेना, त्यांचे सेनापती रघुनाथराव पेशवे यांचे हाताखाली अटकेपर्यंत मुसलमानांस जिंकीत गेल्या, त्या एप्रिल-मे सन १७५८ मधल्या दिवसांचा अभिमान प्रत्येक हिंदुमात्रास असला पाहिजे. कारण तो विजय हिंदुमात्राचा होता. आम्ही महाराष्ट्राच्या काय किंवा बुंदेल्यांच्या काय, रजपुतांच्या काय किंवा शिखांच्या काय- हिंदुस्थानात हिंदुजगत् आणि अहिंदुजगत् ह्यात झालेल्या अनेक शतकव्यापी महायुद्धास एकाच संकलित हिंदु इतिहासाची केवळ पृष्ठे समजतो. त्या अखिल हिंदु दृष्टीनेच आम्हास ह्या अटक-विजयाचा अत्यंत अभिमान वाटतो. कारण त्या दिवशी हिंदुसत्ता प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सर्व हिंदुस्थानभर पुनरपि स्थापित झाली होती!

दक्षिणेकडून आरंभ करून सरासरी सन १७६० व्या वर्षाचे निरीक्षण करू या. हे पहा त्रावणकोरचे राज्य; ते हिंदूच आहे. म्हैसूरचे अजून हिंदूंचेच हातात होते. अकोट-तंजावरपर्यंत लहान-मोठी राज्ये काही प्रत्यक्ष, काही अप्रत्यक्षपणे मराठ्यांचे कह्यात होती. त्यापुढे कोकणपट्टीत पोर्तुगीजांवर मराठ्यांनी मोठा विजय मिळवून, त्यास गोव्यापर्यंत मागे रेटले होते आणि कोकण बहुशः आपल्या हिंदु राज्यात समाविष्ट केले होते. महाराष्ट्र, उभी गुजराथ, धार, इंदूर, ग्वाल्हेर, बुंदेलखंड आणखी खालती नागपूर ते ओरिसापर्यंतच्या विस्तृत प्रदेशावर सलग आणि स्वतंत्र अशा मराठ्यांच्या हिंदुपदपादशाहीची प्रत्यक्ष सत्ता चालत होती. निजामाचे तेवढे एक मुसलमानी राज्य दक्षिणेत होते; पण त्यातही मराठ्यांच्या चौथाईची नि सरदेशमुखीची नखे खोल रुतलेली असून, ते वस्तुतः एक मांडलिक राज्य झालेले होते. ओरिसाच्यापुढे बंगाल. त्या बंगालच्या नबाबाने महाराष्ट्रीय हिंदुसत्तेस चौथाईची लक्षावधी रुपये खंडणी देण्याचे मान्य करुन त्याच वेळी आपला जीव सोडवून घेतला होता. अशा रीतीने राजपुतान्यापर्यंतचा प्रदेश प्रत्यक्ष मराठी हिंदूंचे राज्यात मोडला गेलेला. राजपुताना पंजाबपर्यंत रजपूत हिंदुंच्या हातात. जाटही हिंदूच. दिल्ली मराठ्यांचे कह्यात. पलीकडे नेपाळ हिंदुच. अयोध्येचा वजीर तेवढा उरला. तोही मराठ्यांच्या चौथाईने निजामाप्रमाणेच नरम करून सोडलेला, मुसलमानी सत्ता अशी रामेश्वर ते दिल्लीपर्यंत बहुधा नावाची देखील उरली नव्हती. राहता राहिला पंजाब.

मराठी सेनेपुढे चीत झालेल्या हिंदी मुसलमानांनी मोठा कट करून पंजाबातील राहिली-साहिली मुसलमानी सत्ता वाचविण्यास आणि हिदूंच्या वाढत्या शक्तीस नाहीशी करण्यासाठी अबदालीला हिंदुस्थानात बोलाविले. इ.स. १७५६-५७ मध्ये त्यांने पंजाब आपल्या हातात घेतला, दिल्लीत प्रवेश केला. मथुरेपर्यंत हिंदु तीर्थांचा आणि क्षेत्रांचा विध्वंस करीत तो खाली आला; परंतु मराठ्यांच्या मोठमोठ्या सेना दिल्लीकडे चालत येतातसे पाहून तो परत फिरला. त्याच्या मनात त्याचा मुलगा तैमूरशहा यास दिल्लीच्या सिंहासनावर बसवावयाचे होते. पण सध्या त्यास पंजाबचा प्रांत सांभाळण्यास नेमून अबदाली परत गेला.

इतक्यात मराठी सेना दिल्लीवर आल्या! सखाराम भगवंत, गंगाधर यशवंत इत्यादी मराठी सेनानायकांनी दुआबात प्रवेश केला आणि रोहिल्यांस आणि पठाणांस मोडून काढले. विठ्ठल शिवदेव दिल्लीवर चालून गेले आणि अबदालीच्या पक्षास पिटून दिल्ली हिंदूंचे हातात घेतली. हिंदूंचा हाडवैरी नजीब उद्दौला यास जिवंत पकडला आणि पंजाबवर स्वारी केली. सरहिंदला अबदुल सय्यद दहा हजार पठाणांनिशी अबदालीने ठेवला होता. त्या दहा हजारांशी लढाई देऊन त्यांच्या नायकाला मराठ्यांनी पाडाव करुन धरले. ह्या मराठ्यांच्या अप्रतिहार्य बलापुढे टिकाव धरणे अशक्य पाहून हिंदुस्थानचा बादशहा होऊ पाहणारा अबदालीचा पुत्र आणि प्रतिनिधी तैमूरशहा भिऊन पळू लागला. लाहोरात मराठ्यांनी विजयाच्या दुंदुभी वाजवीत प्रवेश केला. तत्काळ ते पळत्या पठाणी सेनेवर चालून गेले. तैमूरची युद्धसामग्री मराठ्यांच्या हातात पडली. त्यांचे शेकडो लोक कापले गेले आणि प्रत्यक्ष शिबीर मराठ्यांनी लुटून काढले! उभ्या हिंदुस्थानचा बादशहा होणारा तैमूर आणि ते पठाण जीव हाती घेऊन कसेबसे सिंधूपार झाले आणि हिंदुंच्या विजयी घोड्याने सिंधुनदीपर्यंत चाल करून अटकेलाच काय ते आपले लगाम, आपले रश्मी ढिले केले. एवढाच मराठ्यांच्या हातात पंजाब आणि सिंध ह्या दोन उरलेल्या मुसलमानी सुभ्यांचीही सत्ता आली.

अशा रीतीने त्रावणकोर ते नेपाळपर्यंत उभे हिंदुस्थान वास्तविकतः हिंदूंच्याच सत्तेखाली आलेले होते. त्रावणकोर, म्हैसूर, महाराष्ट्र, वऱ्हाड, ओरिसा, गुजराथ, काठेवाड, राजपुताना, इंदौर, ग्वाल्हेर, नेपाळ हा प्रचंड प्रदेश तर संपूर्णपणे हिंदुंच्या राजसत्तेखालीच होता; निजाम, बंगालचा नवाब, अयोध्येचा वजीर त्यास चौथाई देत होते आणि दिल्ली ते पंजाबपर्यंतचा प्रदेश महाराष्ट्रीय हिंदु सेनापतींच्या सैनिक शासनाखाली होता. अर्थात इ.स. ७३२ पासून आज सन १९२८ पर्यंत हिंदुंच्या हातात हिंदुस्थानचा जितका विस्तृत प्रदेश कधीही आला नाही तितका अटक-विजयाच्या आठवड्यात आलेला होता! हे स्पष्ट होण्यासाठी त्या विजयी स्वारीतील हिंदु सेनापतींचीच एक-दोन तत्कालीन पत्रे आम्ही आज प्रसिद्ध करीत आहोत. ती पत्रे अशी:

## रघुनाथरावास अंताजी माणकेश्वराचे पत्र

(हिंदूंचे सेनापती श्रीमंत रघुनाथराव ह्यांनी लाहोरवर आक्रमण करून ते घेतल्याचे वृत्त कळल्यानंतर अंताजी माणकेश्वर ह्यांनी जे त्या वेळी पत्र लिहिले आहे ते आम्ही खाली देत आहोत. ह्या पत्रावरून पृथ्वीराजानंतर हिंदूंचा विजयी अश्व पुन्हा जेव्हा त्या पवित्र पंचनद्यांच्या-पंजाबच्या प्रदेशात दौडत गेला, त्या वेळी प्रत्येक हिंदु अंतःकरणास कोण अभिमान वाटला हे वाचकास दिसून हृदय गर्वाने उत्तेजित होईल.)

अंताजी माणकेश्वर म्हणतो:- 'सेवकास स्वामीनी कृपा करून पत्र (१८ एप्रिल १७५८ चे) पाठविले ते पावले. वर्तमान लाहोरच्या फत्तेचे, शत्रूच्या पारिपत्त्याचे नि तिकडील मुलूख काबीज केल्याचे लिहिले ते सविस्तर वाचून परम आनंद झाला, तो पत्री कोठवरी लिहावा? हिंदुस्थानात कीर्त लौकिक मातबर जाली. कुलराजे, उमराव सुभे यांस दहशत पडली. सारे हिंदुस्थानचा सूड अब्दालीपासून एक स्वामीनी घेतला. तेणेकरून यशाचे पर्वत जाहले. स्वामी यशस्वीच आहेत. याचा विचार सेवकास लेखन करावयास सामर्थ्य कैचे. वर्तमान वजिरांनी ऐकोन बहुतच हर्ष मानिला. स्वामी अवतारी पुरुष आहेत. त्यांची स्तुति मनुष्यांनी काय करावी... जरी स्वामींची छावणी लाहोर प्रांती जाली तरी वजीर पातशहास घेऊन छावणीस आपल्याजवळ घेऊन येतो.'

## राघो भराऱ्यांचे अटकेहून शनवारवाड्यास पत्र

(हिंदुपदपादशाहीची मर्यादा अटकेपार नेणारे हिंदूंचे सुप्रासिद्ध सेनानी श्रीमंत रघुनाथराव पेशवे ह्यांनी खालील पत्र श्रीमंत नानासाहेब पेशव्यास पाठविले होते. त्या वेळच्या मराठ्यांच्या मनगटात केवढे दुर्दांत सामर्थ्य नि हृदयात केवढी विश्वव्यापी महत्त्वाकांक्षा उसळत होती हे हल्लीच्या कूपमंडूकवृत्तीच्या त्यांच्या वंशजांनी नीट पारखून पाहावे!)

दि. ४ मे १७५८ या दिवशी रघुनाथराव पेशव्यास लिहितोः- लाहोर, मुलतान, काश्मीर वगैरे अटकेअलीकडील सुभ्यांचा बंदोबस्त करून अंमल बसवावा त्यास काही जाला, काही होणे तोही लवकरच करितो. त्यमुर, सुलतान नि जहान खान यांचा पाठलाग करून फौज लुटून घेतली. थोडीशी झडत पडत अटकेपार पिशावरास ते पोचले. अब्दाल्ली इराणावर चालून गेला, त्याची फौज इराणच्या पातशहाने लुटून घेतली. अब्दाली कंदाहारास आला, इराण्याची फौज पाठलाग करीत आली आहे. जबरदस्तखान नि मुकर्रबखान या प्रांतीचे सरदार नि जमीनदार अबदालीचे जबरदस्तीमुळे त्यास रुजू होते, तेही बदलोन हंगामा करितात. हल्ली रफीक होऊन, सेवा करुन दाखवू, अब्दालीस तंबी करा ऐसा

www.savarkarsmarak.com

त्यांच्या अर्ज्या आल्या आहेत. अब्दालीचा धीर सुटला आहे. सारांश, त्यांचा जोर तिकडून होतो ऐसे नाही. तिकडून इराणचे शहाने जेरदस्त केले, इकडून जोरा पोचवून सरकारचा अंमल अटकेपार करावा. त्याचा पुतण्या नि दौलतेचा वारस स्वामीपाशी देशास आला तो स्वामीनी आम्हाकडे पाठविला होता. त्यास अटकेपलीकडे थोडीशी जागा बसावयास देऊन अटकेपार काबुल पिशावरचा सुभा देऊ. अब्दालीच्या फौजेवर अब्दुल समदखान सरहिंदेत होता, तो सरकारात पाडाव आहे. तो नि आणखी या प्रांतीची फौज, इराणी, मोंगल देऊन मशारनिल्हेची रवानगी करतो. हे तिकडील पैरवी करितील, स्वामीचे पुण्यप्रताप अब्दालीस जोरा पोचवून तंबी करितील, पारिपत्य उत्तम प्रकारे करून अटकेपार अंमल बसवितील. लाहोर प्रांती रेणको अनाजी नि रायाजी सखदेव असे ठेविले. गोपाळराव गणेश यांचांही पैगाम आहे. तेही राहतील. इराणचे पातशहाचे स्वदस्तुरचे कागदही आम्हास नि मल्हाररावास आले होते, ही लवकर कंदाहारेस यावे आणि याचे परिपत्य करून अटकेची हद्द करावी; परंतु आम्ही तरी काबुलचा सुभा अब्दुल रहिमखान स्वामीनी पाठविला, त्यास देतो. फौज वगैरे थोडेबहुत साहित्यही करितो. काबुल नि कंदाहार हे अटकेपारचे सुभे हिंदुस्थानकडे अकबरापासून अलमगीर पावेतो होते ते आम्ही विलायतेस का द्यावे? यास्तव तूर्त येथे सुभे देतो. त्यासही (इराणचे शहास) या सुभ्यांची दरकार नसेल. तो इराणचा अंमल करील. आम्ही कंधार पावेतो अंमल बसवून, तूर्त त्यास गोडच जाब पाठविणार आहो. जंबु काश्मीर वगैरे तमाम वकील आले आहेत. मामलत थोडीबहुत अटकेअलीकडील करीत आहोत. पलीकडील तूर्त होत नाही, खटपट मात्र होईल. तूर्त तांतडीमुळे जे होईल ते करितो. पुढील स्वारीस जो कोणी सरदार मातबर येईल तो बंदोबस्त करील. मुलूख दोचौ करोडींचा वसुली, परंतु जमीनदार मवास मोठमोठे आहेत. आम्ही नावास मात्र खंडणी करितो. जेथे पंचवीस लक्षांचा मुलूख तेथे एक दोन लक्ष येणेच कठीण आहेत, तूर्त माघारे फिरायचा डौल स्वामींचे आज्ञेवरून धरिला आहे. याजमुळे जे होते तेच करितो, तटी लावीत नाही. तूर्त अदिनाबेगावरच सारा यखतियार दिल्हा आहे. त्यासच कमाविसीने लाहोर, मुलतान दिल्हे आहे. यंदा तर सारे शिबंदीखालीच जाईल. शिबंदी वारताच कठीण पडेल. दोन-तीन वर्षांनी काही सोईस लागेल. स्वामीस कळावे.'

हिंदूंच्या ह्या गौरवाच्या दिवसाची स्मृति सर्व हिंदुमात्राने आज अभिमानपूर्वक साजरी करावी. कारण, महाराष्ट्राच्या एखाद्या प्रांतिक प्रश्नाकरिता नव्हे तर हिंदुपदपादशाहीच्या महान ध्येयाकरिता महाराष्ट्रीय वीरांनी ते प्रचंड युद्ध लढविले होते. दुसरे असे की, हिंदुतीलच काही राजांशी किंवा लोकांशी मराठ्यांस लढावे लागले. तरीही त्या आपसांतील यादवीच्या प्रश्नांचा ह्या विजयाच्या राष्ट्रीय स्वरूपाशी काही संबंध पोचत नाही. महाराष्ट्राच्या काय किंवा बंगालच्या काय जेवढा हिंदु इतिहास आहे तेवढ्याचे सामष्टिक अवलोकन करुनच असल्या महान हिंदु विजयांचे रहस्य जाणता येते- महत्व

मापता येते. चंद्रगुप्त हा मगधाचा राजा. त्याचे साम्राज्य पंजाबपासून दक्षिणेपर्यंत त्यानी स्थापिले. अर्थात आकुंचित प्रांतिक दृष्टीनेच पाहिले, तर पंजाबचा तो शत्रू ठरेल. महाराष्ट्रास चंद्रगुप्ताच्या विजयाचे अभिनंदन करण्याचे ठायी त्याचा द्‌वेष करावा लागेल; पण अर्थांत ही भयंकर आणि राष्ट्रघातक चूक होईल. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या दृष्टीनेच चंद्रगुप्ताच्या दिग्विजयाकडे आणि अफगाणिस्थानापासून दक्षिणेपर्यंत उभा हिंदुस्थान एका प्रबळ संघटित करणाऱ्या त्याच्या राष्ट्रीय साम्राज्याकडे आपण पाहतो आणि त्याचा गौरव राष्ट्रीय गौरव मानतो. तीच स्थिती विक्रमाची किंवा श्रीहर्षाची. कनोजचा श्रीहर्ष आणि महाराष्ट्र-कर्नाटकचा पुलकेशी लढले; पण आपण आज राष्ट्रीय दृष्टीने उभयतांसही आपल्या हिंदु-वैभवाचे स्तंभ समजतो. आज महाराष्ट्रास श्रीहर्षाचा आणि कनोजच्या हिंदूंस पुलकेशीचा अभिमान वाटत आहे. पृथ्वीराजाने अनेक रजपूत राजांवर स्वाऱ्या केल्या. गृहकलह झाले; पण तो घरगुती विचार. अखिल हिंदुदृष्टीने महंमद घोरीशी मरेपर्यंत जो पृथ्वीराज हिंदूंच्या साम्राज्याकरिता लढला, तो त्याने ज्यांच्याशी गृहकलह केले त्या हिंदूंनाही हिंदुवीर म्हणून पूज्य आहे- असला पाहिजे. तीच मराठ्यांची, शिखांची, रजपुतांची, हिंदूंतील प्रत्येक उपजातीची गोष्ट! अखिल हिंदू दृष्टीने पाहिले असता महाराष्ट्र जसा अशोक, चंद्रगुप्त, विक्रम, राणाप्रताप इत्यादी थोर हिंदु वीरांस त्यांच्या जयास आणि अपजयास आपले वीर, जय आणि अपजय मानतो, त्याचप्रमाणे महाराष्ट्राने हिंदुपदपादशाहीच्या प्रस्थापनेसाठी शिवाजीपासून अव्याहत जे परिश्रम केले आणि प्रचंड विजय मिळविले ते आपणा अखिल हिंदुस्थानातील हिंदुमात्रास अभिमानास्पद आणि ममत्वपूर्ण गौरवाचे वाटले पाहिजेत. हिंदुतील कोणीही थोर झाला तर त्यातच प्रत्येक हिंदु अंशतः थोर होतोच. हिंदुत कोणीही स्वतंत्र झाला, तर त्यातच प्रत्येक हिंदु अंशतः स्वतंत्र झालेलाच असतो.

हिंदुसंघटनाच्या सामष्टिक चेतनेने उदार, उत्स्फूर्ति पावलेल्या प्रत्येक हिंदू हृदया! यास्तव हा अटकेचा विजय तुझा आहे. आजच्या स्थितित त्याचे स्मरण कर! तुझा आत्मविश्वास प्रबळ होईल.

आणि हिंदूंच्या शत्रूंनो! तुम्ही कोणत्याही जातीचे वा गोताचे वा देशाचे असा, तुम्ही जे कोणी हिंदूंस तुच्छ लेखीत असाल त्या तुम्ही ह्या अटकेच्या विजयतिथीकडे पाहून एकदा तुमचे मदांध हिंदुद्‌वेषी डोळे त्या तेजाने दिपू द्या! हा जातिभेद, हा विटाळ, ही दुही, ही फूट, ही अस्पृश्यता, ही शिवाशीव, हा धर्मभोळेपणा ह्यासर्व लटांबरांचा धोंडा गळ्यात अडकविला असताना देखील हा हिंदु पराक्रम तुमच्या बादशाहीस आणि शाहीस पायाखाली तुडवीत अटकेपर्यंत आपला विजयी घोडा फेकीत गेला! मग आज तर आता सर्व राष्ट्रघातक चालींचे लटांबर तो हिंदु पराक्रम दूर फेकीत आहे! आज तो हातात घेतलेल्या एका शौर्याच्या तरवारीवाचून दुसरे काहीही ओझे जवळ न घेता सड्या स्वारीनिशी आपल्या

न्याय्य अधिकारास जिंकावयास निघू पाहत आहे. ज्याला त्यांच्या वाटेत आडवे यायचे असेल त्याने विचार करून यावे!!

हिंदू भित्रा आहे? तो पहा अटकेवरचा शत्रूंच्या गर्वाच्या प्रेतावर उभारलेला त्याचा भगवा झेंडा. तो पहा वसईवर पोर्तुगीजांवर चालून जाणारा चिमाजी अप्पा! जे पूर्वी बादशहा होते त्याची हिंदूने दाढी खेचून दिल्लीच्या सिंहासनावर आपला पाय रोवला. वैदिक काळाच्या या गोष्टी नाहीत; अगदी कालची गोष्ट. आता तर सर्व पूर्व वैरी त्यांच्या दृष्कृत्यांनीच हतबल आणि हीन झालेले आहेत. आता तुमच्या पीरास तो वीर कसला भितो? पीरास न पाद्र्यास, न काळ्यास न गोऱ्यास, जो जो आड येईल त्यास परास्त केल्याविना आणि ह्या आपल्या हिंदुस्थानच्या इंद्रप्रस्थी, पुनरपि इंद्राचेच प्रस्थ स्थापिल्याविना तो राहत नाही!

हिंदुद्वेष्ट्यांच्या हृदयात ही प्रबळ भीती ह्या अटकेच्या विजयदिनाची स्मृति उत्पन्न करो! आणि हिंदु हृदयात त्या भीतीस सार्थ करील अशी कोण्या मोठ्या भीमपराक्रमाची जयिष्णु स्फूर्ति जागृत करो!!!

1. (श्रद्धानंद दि. १०-०५-१९२८)

* * *

# केमालपाशाने केलेले तुर्कस्थानातून अरबी संस्कृतिचे उच्चाटन

(१)

१९१४ च्या जर्मन महायुद्धानंतर युरोपात आणि पूर्व आशियात जी अनेक नवीन राष्ट्रे उदय पावली किंवा जी नावाने जुनीच राहिली तरी कात टाकलेल्या नागाप्रमाणे आपले जीर्ण वार्धक्य टाकून नवीन जीवनाने मुसमुसू लागली त्यामध्ये पूर्व तुर्कस्थानचे राष्ट्र हेही एक गणले गेले पाहिजे. त्या राष्ट्राच्या उदयाचा इतिहास अभ्यसनीय आहेच; पण त्यातही आपल्या हिंदुस्थानच्या संक्रमणावस्थेत, तरुण तुर्कांच्या नेतृत्वाखाली आणि कर्तृत्वाखाली पूर्व तुर्कस्थानात तुर्कांचे हे जे प्रबळ राष्ट्र प्रगतीच्या घोडदौडीत आज अकस्मात पुढे सरसावले आहे त्याचा इतिहास आज हिंदी लोकांस विशेषच बोधप्रद होणारा आहे. त्यातल्या त्यात विशेषतः हिंदी मुसलमानांना तर या विषयाचे अत्यंत महत्व वाटले पाहिजे. कारण हिंदी मुसलमानांचा फार मोठा भाग अजूनही अरबी संस्कृति हाच स्वतःचा अपरिवर्तनीय धर्म म्हणून समजतो; इतकेच नव्हे तर ती हिंदु समाजावर लादून तिच्या भाषा, लिपि, निर्बंध (कायदा) इत्यादिंच्या साच्यात उभ्या भारतीय राष्ट्राचीच घडण बनविण्याचा अनावर मोह त्यास अजूनही होत आहे. अशा स्थितीत ही जीर्ण संस्कृति स्वतःच्या प्रगतीच्या मार्गात एक धोंड होऊन राहिली आहे असे म्हणणाऱ्या तुर्कांच्या मतात आणि अनुभवात जर तथ्य असेल आणि ते समजावून न घेता जर हिंदी मुसलमान तीसच यापुढे चिकटून राहण्याचा दुराग्रह धरतील तर त्यांचे आणि त्यांच्याबरोबरीने त्यांच्यामुळे साऱ्या भारतीय राष्ट्रांचे अहित झाल्यावाचून राहणार नाही. बरे, हे मत आणि हा अनुभव कोणी हिंदु वा गैर-मुस्लिम समाज पुरस्कारीत नसून हिंदी मुसलमानांतील बहुजनसमाज अजूनही ज्या तुर्कस्थानास अरबी संस्कृतीचा- म्हणजेच मुसलमानी संस्कृतिचा- पुरोध्वज, आधारस्तंभ, संरक्षक आणि सम्राट समजतात, तो तुर्कस्थानच ते मत पुरस्कारीत आहे! तुर्कस्थानाने महायुद्धानंतर खिलाफतीचे उच्चाटन केल्यानंतरही हिंदी मुसलमानांतील बहुजनसमाजाची तुर्कस्थान हा मुस्लिम समाजाचा कट्टर अभिमानी आहे ही जुनी समजूत जशीची तशीच राहिलेली आहे, म्हणून त्यांनी तुर्कस्थानात अलिकडे होत असलेल्या चळवळीकडे लक्ष पोहोचविल्यास आजच्या जगताच्या प्रगतीच्या स्पर्धेत अरबी संस्कृति किती टिकाव धरू शकेल याचा फेरविचार करण्याची आवश्यकता त्यांनाही भासू लागेल.

अरबी संस्कृतीची पूर्वकालीन उपयुक्तता

आजच्या प्रगमनशील परिस्थितीत अरब संस्कृति कितीही मागासलेली दिसली तरी हे विसरता कामा नये की, यापूर्वी एकदा जगाच्या फार मोठ्या भागातील मरणासन्न समाजात त्या संस्कृतीने नवचैतन्याचे वारे संचारविले होते. मानवी प्रगतीत एका काळी नवतत्वे, नवधर्म, नवशिल्प यांची बहुमोल भर तिनेही टाकली होती. तिचा उगम महंमद पैगंबरांनी मुस्लिम धर्माची मुहूर्तमेढ हजार-बाराशे वर्षापूर्वी जेव्हा रोविली तेव्हा झाला. ज्या दिवशी महंमद पैगंबरांनी कुराण शरिफाचे पहिले ‘आयत’- पहिला मंत्र- उच्चारला आणि तरवार अशी पहिल्यानेच उपसली त्या दिवसापासून एका शंभर-दीडशे वर्षांचे आत तिकडे स्पेन तो इकडे सिंधूपर्यंत ज्या संस्कृतीतील अंतर्गूढ आवेशाने नि शक्तीने अर्ध्या जगताचे रूप बदलून टाकले, जिच्या विजयाच्या अप्रतिहत वेगास स्पेनची सामुद्रधुनी, इराणचा अग्नि, सिंधूची अटक, चीनची भिंत वा हिमालयाची शिखरे ही अडवू शकली नाहीत, जिने आपल्या धर्माची, भाषेची, लिपीची, शिल्पाची, शास्त्राची राजमुद्रा ठोकून खंडेची खंडे अंकित करून टाकली, त्या अरब संस्कृतीस तिच्याशी टक्कर देऊ आलेल्या त्या कालच्या अनेक जीर्णशीर्ण संस्कृतीपेक्षा जे एकंदरीत ह्या काळच्या जगतात नुसते जगण्यासच नव्हे तर ह्या जगास जिंकण्यासही समर्थतर आणि योग्यतर ठरेल असे काही जरी असामान्य श्रेष्ठत्व, काही तरी नवे जीवनतत्व, होतेच होते हे निर्विवाद आहे.

संस्कृतीच्या उन्नतीच्या मर्यादा

पण अखंड विकासशील निसर्ग आणि अनावर काळ ह्यांना तर आळा घालून घेणे केव्हावी परवडत नाही, सहन होत नाही. साध्या कसरीपासून साध्या पुस्तकास त्याची नवीन प्रत करुन किंवा सुधारलेली आवृत्ती काढून एक वेळ चिरकाल सुरक्षित ठेवता येईल; पण काळाच्या कसरीपासून अपरिवर्तनीय अशा धर्मग्रंथांचे सर्वकाळ रक्षण करणे प्रत्यक्ष देवदूतासही शक्य होत नाही. कारण काळाची कसर त्या अपरिवर्तनीय धर्मग्रंथांची नुसती पानेच खात नाही तर त्यातील अर्थासच कुरतडून त्याची नुसती चाळण करून सोडते! त्यामुळे त्याची नवीन प्रत केली तरी ती निरर्थक होते. आणि अपरिवर्तनीय धर्मग्रंथाची सुधारून वाढविलेली आवृत्ती काढणे तर मुळातच असंभवनीय असते, निषिद्ध असते, ते वदतो व्याघातच असते! अशा कारणाने अरबी संस्कृतीची अर्वाचीन युरोपियन संस्कृतीशी गाठ पडताच तिची दुर्दशा न उडणे हे असंभवनीय होते. अरब संस्कृति कोणत्याही अपरिवर्तनीय धर्मग्रंथात डांबून पडलेल्या संस्कृतीप्रमाणे एक स्वतंत्र, धार्मिक, स्थितिशील संस्कृति, पण अर्वाचिन संस्कृति जशी परिस्थिती पालटेल तसे पवित्रे बदण्यास

सर्वथैव स्वतंत्र असलेली शास्त्रीय, वैज्ञानिक (Scientific) यंत्रयुगाच्या अभ्युदयासारशी बाष्पविद्युत् रेडियोंना आपल्या लगामी आणून उंच आकाशात चंद्रावर विमानांची स्वारी करू पाहणारी आणि सखोल महासागराच्या तळाशी बसलेल्या अरण्यांचे प्रकाशलेख घेणारी, काळाच्या हातात हात घालून धावणारी गतिशील संस्कृती! त्यांची टक्कर जुंपताच ती अरबी- ती मुस्लिम संस्कृती- त्या युरोपियन संस्कृतीसमोर तशीच हतबुद्ध नि हतबीर्य होऊन गेली की, जशा अरबी संस्कृतीच्या पहिल्या आवेशासमोर, तिच्याहून टाकाऊ असलेल्या त्या दहा-पंधराशे वर्षांपूर्वीच्या जीर्णशीर्ण संस्कृति आणि सत्ता हतप्रभ नि हतवीर्य होऊन गेल्या!

तरुण तुर्कांचे बंड

ही स्थिती पाहताच साऱ्या मुसलमानी राष्ट्रांत जर कोणी पहिल्याने अपरिवर्तनीय मुस्लिम संस्कृतीच्या शृंखला तोडून युरोपियन राष्ट्रांच्या वैज्ञानिक संस्कृतीचा अवलंब करण्याचे साहस केले असेल तर ते ‘तरुण तुर्क’ नावाच्या या शतकाचे आरंभी उदय पावलेल्या संस्थेनेच होय. अनवरपाशा, केमालपाशा प्रभृति या तरुण तुर्क संस्थेच्या पुढाऱ्यांचे शिक्षण जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड इत्यादी देशांतच झालेले असल्यामुळे युरोपातील राष्ट्रवाद, राज्यघटना, शास्त्रे, शासने, यांत्रिक, सैनिक, सामाजिक क्रांति यांचा अवलंब केल्यावाचून आणि त्यांचे मार्गात आड येणाऱ्या जुन्यापुराण्या भाबडेपणास सोडल्यावाचून तुर्कस्थानास स्वतंत्र आणि समर्थ राष्ट्र म्हणून जगणे अशक्य आहे ही गोष्ट त्यांच्या मनात पक्की बिंबली आणि तुर्कस्थानात आज अरबी संस्कृतीचे उच्चाटन करण्याचा जो भगीरथ प्रयत्न चाललेला आहे तो त्याच तरुण तुर्कांच्या ह्या प्रगमनशील ब्रीदाचा आणि प्रतिज्ञेचा परिणाम आहे. तुर्क राष्ट्राच्या उत्कर्षास जी जी ज्या ज्या परिस्थितीत अवश्य असेल ती ती सुधारणा तत्काळ घडवून आणावयाची, मग तिला, अपरिवर्तनीय धर्मग्रंथात आधार सापडो वा न सापडो हा तरुण तुर्कांचा जो बाणा होता तो आज साऱ्या तुर्कस्थानचाच बाणा झाला आहे.

तरीही हे ध्यानात ठेविले पाहिजे की, आजच्या परिस्थितीशी टक्कर देण्यास अरबी संस्कृति असमर्थ आहे म्हणूनच काही तुर्क तिच्याविरुद्ध इतके खवळलेले नाहीत, तर त्या राष्ट्रात चाललेल्या या सामाजिक क्रांतीच्या मुळाशी दुसरेही एक ऐतिहासिक कारण आहे. अरब संस्कृतीविरुद्ध उभारलेल्या या तुर्की बंडास अरब संस्कृति ही माझी संस्कृति नव्हे असा तुर्कस्थानच्या राष्ट्रवादी पक्षात संचरलेला जात्यभिमानी आवेशही प्रोत्साहीत आहे. केमालपाशा हा हजारो हिंदी मुसलमानांस अजूनही ‘धर्मवीर’ ‘गाझी’ वाटतो. ज्या तुर्कांचा खलिफा आणि सुलतान म्हणजेच मुस्लिम धर्माचा आणि सत्तेचा जगद्गुरु आणि

जगत्सम्राट म्हणून शेकडो वर्षे ते ऐकत आले आणि त्यास संरक्षिण्याची देवापाशी प्रार्थना करीत आले; त्या हिंदी मुसलमानांस तेच तुर्क लोक त्याच मुस्लिम संस्कृतीस 'अरबी' म्हणून परकी समजू लागले आहेत, ही गोष्ट ऐकून मोठे आश्चर्य वाटते. ते कोडे त्यास उलगडत नाही. आजच्या अरबी संस्कृतीविरुद्ध तुर्कांनी असे चिडून का जावे याचा वाचकांस उलगडा होण्यासाठी त्या बंडाच्या मुळाशी असलेल्या ह्या दुसऱ्या कारणावर प्रकाश पाडण्यापुरता तुर्कांचा आणि अरबांचा पूर्वापार संबंध कसा आला आणि कसा वाढला याच्या वृत्तान्ताची किंचित रुपरेषा येथे देणे भाग आहे.

अरबी साम्राज्यात तुर्कांचा प्रवेश

महंमद पैगंबर यांनी अरबांमध्ये मुसलमानी धर्म आणि मुसलमानी राज्य स्थापिल्यामुळे त्यांच्या हाती धर्मदंडाची आणि राजदंडाची दुहेरी सत्ता एकत्रित झाली. मुसलमानी जगाचे तेच खलिफा आणि तेच सुलतान, तेच जगद्गुरू आणि जगत्सम्राट होते. त्यांच्यामागे अबुबेकर, उमर, उस्मान आणि अल्ली ह्या पहिल्या चार सत्ताधाऱ्यांच्या हाती ती दुहेरी सत्ता तशीच चालत राहिली. पुढे ओमेयेड आणि फातिमाइड वंशांच्या हक्काची भांडणे लागून सुन्नी आणि शिया अशी मुस्लिम जातीची दोन शकले झाली. प्रथम ओमेयेड नि नंतर अबास, मनसूर, महादी आणि हरून रशीद हे मोठे बलाढ्य खलिफा होऊन गेले. अरेबियन नाअट्सचे हेच नायक होते. पण पुढे सुन्नी-शियांत आणि सुन्नीसुन्नीत राजसत्तेविषयी इतकी भयंकर यादवी माजली की, त्या अरबी खलिफास स्वतःचे अरब सैन्य ह्या धार्मिक आणि वांशिक पक्षभेदाच्या वादळात सापडून केव्हा कोण कोणाचा पक्ष घेईल याचा विश्वास वाटेनासा झाला. त्यामुळे ज्यांना वेतनाच्या रक्कमेवाचून दुसऱ्या कसल्याही मुसलमानी धर्मवंशपंथ यांची लवलेश चाड नसे असे गैरमुस्लिम सैनिकच नोकरीस ठेवणे अरब खलिफास बरे वाटू लागले. त्या संधीसच मुस्लिम सत्तेची लाट मध्य अशियातील तुर्कस्थानच्या सीमेस भिडली होती. तेव्हा त्या तुर्क-तार्तरांची कडवी लढवय्यी वृत्ती पाहून बगदादच्या खलिफानी त्यांचीच भरती आपल्या सैन्यात करण्याचा सपाटा चालविला. धार्मिक बखेडे माजवून बंडे करण्यास सोकावलेल्या स्वतःच्या मुस्लिम अरबी सैन्यापेक्षा, वेतन दिले की, सुन्नी असो शिया असो, सांगाल त्याची कत्तल करण्यास सिद्ध असणारे हे गैरमुस्लिम तुर्की सैन्यच खलिफा आपल्या अत्यंत विश्वासू कामावर नेमू लागले. सन ८३३ त अब्बासी खलिफा मुतासिम हा गादीवर आल्यापासून तर त्याने अरबी अधिकाऱ्यांस काढून बहुतेक मोठमोठ्या अधिकारांवर ह्या मुसलमान नसलेल्या तुर्कांनाच नेमण्याचा सपाटा चालविला. होता होता खलिफांच्या राजवाड्यात देखील तुर्की सरदारांच्या शब्दावाचून पान हालेनासे झाले. या परस्थ आणि परधर्मीय

तुर्कांनी आपले अरबी साम्राज्य ग्रासून टाकावे याचे अरब लोकांस मोठे वैषम्य वाटू लागले; पण अरबांची आपसातील यादवी इतकी चिरडीस गेली होती की, तुर्कांचा चढेलपणा त्यास मुकाट्याने सहन करीत राहणे भाग पडले.

इ.स. ८६९ मध्ये तर तुर्कांनी बगदादचा अरबी खलिफा मुतादि यास वेतन थकले म्हणून गादीवरून ओढून फरफटत आणून रस्त्यात फेकून दिले, तुरुंगात कोंबले नि शेवटी हालहाल करून ठार मारिले! तेव्हापासून खलिफाचे देहरक्षकच नव्हेत तर चालक नि पालकही तुर्कच झाले. ते वाटेल त्यास खलिफा करीत, वाटेल त्यास काढून टाकीत. बगदादच्या सुन्नी अब्बासी वंशाचीच ही स्थिती झाली नाही तर तिकडे इजिप्तमध्ये असलेल्या शियांच्या फातिमाइड खलिफांचीही तुर्कांनी तीच गत करून सोडली. त्या इजिप्तच्या अरब राज्यातील तलाई नावाच्या बलाढ्य तुर्क सरदाराने तर स्वतःस 'खलिफांचा कर्ता' म्हणवून घेऊन त्यांचे पालकत्व नेहमी आपल्या पक्षाचे हाती असावे म्हणून खलिफा अल्पवयी असला पाहिजे हा अलिखित दंडकच जणू घालून दिला. मोठ्या वयाचा औरस पुत्रही बाजूस सारून त्या वंशातील कोणाचा तरी दूरचा अल्पवयी मुलगा आणून त्यास तो खलिफा करी. अरबी साम्राज्यात तुर्क आतून असे पोखरीत असताना बाहेरुन त्याजवर जगज्जेत्या चेंगीझखानची स्वारी येऊन वज्रपातासारखी आदळली! चेंगीझखान हाही मुसलमान नव्हता. आपल्या इकडे हिंदुस कोणाला 'खान' म्हणताच आणि मुसलमानास कोणाला 'जगज्जेता' म्हणताच तो मुसलमान असलाच पाहिजे असे वाटते. आम्ही असे अनेक अनाडी मुसलमान पाहिले आहेत की, 'शिकंदरखान' (अलेक्झांडर) हा मुसलमान नव्हता म्हटले की ते चिडून जात! 'मुसलमान नसता तर खुदा त्याला फत्ते कशी देता?' हा त्यांचा कोटिक्रम! तोच अरब लोकांचाही कोटिक्रम असे! आणि मुसलमानांच्या अशाच बढायांनी चिडून जाऊन मुस्लिम नसलेल्या चेंगिझखानाने मुसलमानांचा नुसता फडशा पाडला. त्याने बगदाद धुळीस मिळविले. दमास्कसचा दम उखडून टाकला, मशिदीची मैदाने केली, लक्षावधी मुसलमानांची कत्तल करून त्यांच्या कापलेल्या डोक्यांचे ढीग रचून त्यांच्यावर आरुढ होऊन चेंगिझखानाचे डोके चांदण्यात विचार करीत बसे! मुसलमान नसलेल्यासही देव फत्ते देतो अशी अरबांची निश्चिती पटावी इतका त्या चेंगिझने त्यांचा भयंकर फडशा पाडला. मुसलमान तवारिखकार त्यास अजूनही 'देवाचा शाप!', 'देवाचा प्रकोप!' म्हणून संबोधतात. खरे पाहता अरब साम्राज्याचा इथेच अंत झाला.

तुर्की सुलतानांचा उदय

चैंगिझखानाची ही जग हादरुन सोडणारी प्रलयंकर वावटळ शमून मध्य आशिया खंड पुनः दिसू लागले तेव्हा पाहतात तो खलिफांचा वंश म्हणून सापडेना! शेवटी इजिप्तच्या प्रबळतर तुर्क सेनानीने कोठून तरी त्या वंशातला एक पुरुष शोधून आणला आणि त्यास धर्मदंडाच्या अधिकारापुरता खलिफा करुन राज दंड उघडपणे स्वतःचे हातात घेतला. त्या वेळेपासून तुर्क सुलतान झाले, सम्राट झाले आणि अरबांच्या हाती निर्माल्यवत् झालेली खिलाफती (धर्मगुरुपण) तेवढी राहिली; परंतु जो स्वतंत्र आणि सत्ताधीश तोच खलिफा होऊ शकतो असा मुसलमानी धर्मशास्त्राचा दंडक असल्याने शेवटी मुसलमानी जगत् तुर्की सुलतानाने खलिफाही व्हावे या गोष्टीस अनुकूल होत चालले आणि अंती तुर्कस्थानचा पराक्रमी सुलतान सेलीम ह्याने अरबांचे हातून तो धर्मदंडही काढून आपल्या हाती घेतला. तेव्हापासून तुर्कच सुलतान नि खलिफाही झाले. अरबांची प्रख्यात क्षेत्रे मक्का आणि मदिना तुर्कांनी घेतली. आपली सत्ता चालविण्यास मुसलमानी धर्म आणि संस्कृति उपयोगी पडत होती म्हणून तुर्की सुलतानांनी मुस्लिम धर्म नि अरबी संस्कृति स्वीकारली. पण ह्या लेखातून पूर्वी सांगितल्याप्रमाणे अर्वाचीन युरोपशी टक्कर देण्यास ती अपुरी पडते असे पाहाताच त्यांनी तिला झुगारून देण्यासही कंबर कसली. कारण तिचे खरे महत्व असे त्यास केव्हाच वाटत नव्हते.

आज तुर्कस्थानात अरब संस्कृतीचे उच्चाटन करण्याची केमालपाशाच्या नेतृत्त्वाखाली जी प्रबळ उठावणी झाली आहे तिची दोन मुख्य कारणे आणि ऐतिहासिक पूर्वपिठीका ह्या लेखात अशी रुपरेखिल्या-वर आता पुढील लेखात धर्म, भाषा, लिपी, निर्बंध, जनरीती, निती प्रभृति प्रकरणी तुर्कांनी गेल्या दहा वर्षांत कशी क्रांती घडवून आणली आहे त्याची उद्‌बोधक अशी प्रकरणावार माहिती देण्याचा विचार आहे.

('केसरी', दिनांक २ मार्च १९३४)

* * *

(२)

अरबांशी तुर्कांच्या आणि तुर्कांशी अरबांच्या भूतकालापासून चालत आलेल्या ऐतिहासिक तेढीमुळे त्या अरबांच्या सांस्कृतिक दास्याचा तुर्कांना आधीच आलेला तिटकारा आणि त्यातही अपरिवर्तनीय धर्मग्रंथांशी ती संस्कृति नित्याची जखडली गेल्यामुळे प्रगतीशील भविष्यकालाशी तोंड देण्यासाठी ज्या युरोपियन वैज्ञानिक सुधारणा अवश्य होत्या त्यांना ह्या धार्मिक अरबी प्रवृत्तींचा होणारा विरोध ह्या दोन मुख्य कारणांमुळे तरुण तुर्कांनी अरबी संस्कृतीवर चढाई करण्याचा ठाम निश्चय केला. इतकी ह्या विषयाची

पूर्वपीठिका पहिल्या लेखात दिल्यानंतर आता ह्यात त्या चढाओढीचे स्फुट वर्णन देण्याचे योजिले आहे.

जर्मन महायुद्धाचे अंती सन १९१९ व्या वर्षी तुर्कांच्या झालेल्या पराभवाचा पुरा पुरा लाभ घेऊन व्हर्सेलच्या संधीत तुर्कांच्या साम्राज्यास युरोपियन राष्ट्रांनी आपसात वाटून घेतले. तुर्की स्वातंत्र्य पुरते गतप्राण होण्याचे आधीच केमालपाशाने आपल्या खड्गाच्या सुईने त्यात पराक्रमाची संजीवनी संचरविली. देखत देखत कॉन्स्टॅन्टिनोपलपासून स्मर्नापर्यंतच्या विस्तीर्ण रणांगणात ग्रीकांची रग जिरविली आणि नवशक्तीने मुसमुसलेले तुर्कांचे स्वतंत्र राष्ट्र पुनः आपल्या पायांवर उभे राहून, अढळ ठाण मांडून, तुझ्या व्हर्सेलच्या संधीस मी भीक घालीत नाही जा म्हणून युरोपास आव्हानू लागले. या लेखाचा हेतु तुर्कस्थानातील या राज्यक्रांतीचे विवरण देण्याचा नसल्यामुळे ज्या सांस्कृतिक क्रांतीचे वर्णन या लेखात द्यावयाचे आहे ती या राज्यक्रांतीमुळे शक्य झाली आणि ती या राज्यक्रांतीचाच पहिला अपरिहार्य परिणाम होता हा कार्यकारणभाव दाखविण्यापुरतेच तिला असे नुसते निर्देशून ते पुनरुज्जीवित तुर्की राष्ट्र चिरस्थायी करण्यास्तव केमालपाशाने पहिल्या धडाक्यासच तुर्कस्थानातून खिलाफतीची हकालपट्टी का नि कशी केली ते पाहू!

## अरबी खिलाफतीचे उच्चाटन

जर्मन महायुद्धाच्या प्राणसंकटात तुर्क सापडले असता त्यांच्या साम्राज्यातून फुटून अरबांनी गैरमुस्लिम ख्रिश्चन राष्ट्राचे बाजूने बंड केले होते. या अरबांच्या विश्वासघाताने तुर्क चवताळून गेले. तरुण तुर्कांच्या उदयानंतरही महायुद्धापावेतो त्यांनी ह्या खिलाफत संस्थेचा हत्ती जो पोसला होता तो त्या खलिफापदाचे त्यास धार्मिक ममत्व वाटत होते म्हणून नसून अरबप्रभृति मुसलमानांना ह्या धार्मिक पीठाचे अधिकारी म्हणून तुर्की साम्राज्याचे ममत्व वाटेल नि त्यांचे पाठबळ तुर्क राष्ट्रास मिळत राहील या राष्ट्रीय लाभासाठीच होय; परंतु अरबांनीच त्यांच्या या खलिफास ठोकरून दिल्यामुळे आणि मिसर, इराण, अफगाणिस्थान प्रभृति कोणत्याही मुसलमानी राष्ट्रांनी तुर्क आपला खलिफा, त्याने जिहाद-धर्मयुद्ध पुकारले, आपणास त्याच्या झेंड्याखाली जाऊन त्याच्या शत्रूशी लढलेच पाहिजे अशा धार्मिक भावनेने तुर्कांस म्हणण्यासारखे कोणतेही रणसाहाय्य दिले नसल्याने खिलाफतीची संस्था ठेवली असता मुसलमानांच्या शक्तीचे केंद्रीकरण आपल्या तुर्की राष्ट्रध्वजाखाली करता येईल ही अपेक्षा फोल ठरली. ह्याला न सांगितला तरी चालेल असा एकच अपवाद काय तो आढळला. तो म्हणजे ज्यांना स्वतःचे राष्ट्रच नव्हते अशा हिंदी मुसलमानांचा आणि गांधीवादी हिंदुंचा! ह्या सज्जनांना तुर्की खिलाफतीची चिंता तुर्कांपेक्षाही अधिक ममत्त्वाने विव्हळवू लागली; हिंदी खिलाफत मंडळाने ती कोलमडणारी

तुर्की खिलाफत सावरून धरण्यासाठी आपल्या गवताच्या काडीची कुबडीदेखील केमालपाशाच्या हातात दिली; पण तिचा टेकू घेऊन हिंदी मुसलमान नांदत होते तशा सुस्थितीत नांदण्याचे केमालपाशाच्या दैवी नसल्याने त्या कुबडीच्या सहाय्याची देखील वास्तपुस्त करण्याची दुर्बुद्धि त्याला आठवली नाही. त्यास कोणाचा काय उपाय? त्याचा ठाम सिद्धांत ठरला की, ह्या पॅनइस्लामिझमच्या खुळाने तुर्की राष्ट्राचा यापुढे लवलेश लाभ होण्याचा संभव राहिला नाही!

उलट ती पॅनइस्लामिझम तुर्कांच्या प्रगतीचे मार्गात दुर्लंघ्य विघ्ने मात्र आणण्यास कारणीभूत होत राहणारी आहे अशी केमालपाशाने उघडउघड घोषणा केली. कारण तुर्कस्थानचा सुलतान हाच जोवर मुसलमानी धर्माचा खलिफाही म्हणवून घेईल तोवर मुसलमानांच्या धर्मशास्त्रातील नितीनिर्बंध हेही त्यास पाळावेच लागणार. हजार-दीड हजार वर्षांपूर्वी अरबस्थानच्या विशिष्ट परिस्थितीत जे लागू पडले ते लग्न, वारसा, स्त्रीदाससंततिविषयक अधिकार, दंडविधान, राजनिती, तत्वज्ञान प्रभृति व्यक्तिजीवनातील आणि राष्ट्रीय जीवनातील झाडून साऱ्या प्रकरणांचे कुराणात सांगितलेले निर्बंध आणि नियम आजच्या मनूतही तंतोतंत लागू केलेच पाहिजेत; नव्हे ते त्रिकालीही बदलता कामा नयेत, हे तत्व स्वीकारणे म्हणजे खिलाफत चालू ठेवणे होते!

इतकेच नव्हे तर तुर्की जातीवर अरब जातीहून नीचतर असण्याचा छाप त्या खिलाफतीच्या धर्मदंडाने नित्याचा मारलेला असावा याचेही तरुण तुर्कांस मोठे वैषम्य वाटत होते. कारण इस्लामी धर्मशास्त्राप्रमाणे पैगंबराच्या अगदी कुळातील नसले तरी त्याचा जन्म ज्या पोटजातीत झाला त्या कोरेश वर्गातील रक्तबीज ज्यात असेल तोच खलिफा होऊ शके. ती पैगंबराच्या जन्माने धन्य झालेली जात भक्तिमान अनुयायांस साहजिकच उच्चतम आणि धर्मगुरुत्वधारणाची अनन्य अधिकारी अशी वाटे. त्या धार्मिक समजुतीस मान तुकविल्यावाचून तुर्कांचे पहिले प्रबळतम सुलतानही खलिफापदास तोवर योग्य समजले गेले नव्हते की, जोवर त्यांच्या रक्तात, निदान मातेच्या बाजूने तरी, अरबी खलिफांच्या श्रेष्ठ रक्ताचा अंश उतरलेला नव्हता. यामुळे तुर्की सुलतानांनी स्वतःच पदच्युत केलेल्या दुर्बल खलिफांचीही मनधरणी करुन त्यांच्या कन्यकांशी विवाह करण्याची तुर्की सुलतानांना वरचेवर धडपड करावी लागे. तुर्की सुलतानांच्या अंगातील तुर्की रक्ताच्या पराक्रमी तेजामुळे ते खलिफापदाचे पावित्र्य पावत नसून त्यांच्यातील जन्मजात उच्चतर नि शुद्धतर अरबी रक्तच काय ते त्या गौरवाचे अधिकारी होते असाच ह्या धार्मिक समजुतीचा गर्भितार्थ होता आणि तीच तुर्कांच्या जातीची गर्भित निंदा होती. आपल्या जातीय रक्तबीजाला अरब रक्तबीजाहून हीनतर लेखण्याइतके तरुण तुर्क मूर्खही नसल्यामुळे किंवा मुर्दाडही नसल्यामुळे त्या मानहानीनेच जी स्वीकारली जाऊ शके, त्या खलिफाच्या पदवीसच धिक्कारून देण्यास ते सिद्ध झाले.

अशा रीतीने जिच्यापासून यापुढे लाभ तर होणारा नव्हता, हानी मात्र निश्चित होती नि जी स्वजातीय रक्ताचा उपमर्द करणाऱ्या तत्वावरच अधिष्ठित होती ती ही खिलाफत संस्था उखडण्याची संधीही तरुण तुर्कांस आता आली! वर सांगितल्याप्रमाणे सन १९१४ चे महायुद्धाचे अंती स्मर्ना नि कॉन्स्टँटिनोपल या नगरांतून ग्रीक सैन्यास पिटाळून तुर्क राष्ट्र पुन्हा रणविजयी होताच त्या विजयाने फुरफुरणाऱ्या आपल्या घोड्यास टाच देत नि हातात रिव्हॉल्व्हर रोखीत केमालपाशा जो निघाला तो थेट खलिफाच्या त्या दुबळ्या राजसभेत जाऊन थडकला. सोंगट्यांचा पट उधळावा तशी त्याने ती राजसभा उधळून दिली, खलिफास गादीवरून खाली आणले आणि तुर्कस्थानातून खिलाफतीस आमूलाग्र उच्चाटून, पदभ्रष्ट खलिफास राष्ट्रातून हाकून दिले!

जो खलिफा तोच सुलतान. त्या खलिफास पदभ्रष्ट करण्यातच केमालने त्या सुलतानालाही पदच्युत केले. खलिफाशाही आणि सुलतानशाही दोनही जीर्णशीर्ण संस्था एका घावासरशी गतप्राण झाल्या. धर्मसत्ताक राजसत्तेचा अंत होऊन, Theocracy संपून, तुर्कस्थानात बुद्धिनिष्ठ लोकसत्तेची स्थापना झाली, आणि तीच अपरिवर्तनीय अशा अरबी धर्मसंस्कृतीच्या अतिश्रीची अथश्रीही होती!

## अरबी धर्मनिर्बंधांचे उच्चाटन

महायुद्धात तुर्कस्थानच्या शत्रूंचे हातात हात घालून तुर्की सत्तेस अरबांनी झुगारले होतेच. त्यांनी तुर्कांची राजकीय सत्ता झुगारली तर तुर्कांनी त्यांची धर्मसत्ता झुगारून दिली. त्यांच्यात आता कोणी कोणाचा राहिला नव्हता. खलिफाचे उच्चाटन करताक्षणीच धर्माची राजकारणातून साफ उचलबांगडी झाली. तोवर तुर्कांचे सारे व्यवहार कुराणातील पुरातन अरबी साच्यात ढाळलेल्या आणि अपरिवर्तनीय मानलेल्या धर्मनिर्बंधानुरुप होत आले होते; पण तरुण तुर्कांनी पहिल्या धडाक्यासच धर्मनिर्बंध हा समास सोडविण्याचे भरीस न पडता तो मुळी तोडूनच टाकला. धर्म निराळा, निर्बंध (कायदा) निराळा, एक शब्दनिष्ठ श्रद्धेचा प्रांत, एक प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगाचा, त्याचा विषय परलोक नि याचा अहलोक. 'अतः प्रत्यक्षमार्गेण व्यवहारविधी नयेत्' ह्या तत्वाची घोषणा करुन तरुण तुर्कांनी लोकसभेच्या पहिल्यावहिल्या बैठकीतच व्यवहारविषयक ते ते सारे धर्मनिर्बंध रद्द करून टाकले. स्विट्झर्लंडमधील मोठमोठे निर्बंधपंडित (कायदेपंडित) आणून त्या देशाचे पौरविधान (Civil Law) तुर्क राष्ट्रास लागू केले. एकाही मुल्लास वा मौलवीस धर्मशास्त्र या सुधारणेस अनुकूल की प्रतिकूल ते विचारण्यात आले नाही. एका दिवसात लोकसभेत हे पौरविधान संमत झाले. छेदकवार चर्चा तर दूरच; पण ग्रंथवार चर्चेतदेखील कोणी वेळ गमावला नाही. महिनोगणती ये-जा होऊन आधीच ठरलेल्या विवाहाच्या औपचारिक

वाङ्निश्चयाचे नाटक जसे घटकेत घडून येते तसे त्याचे एका दिवसात एक युग उलटून गेले. त्याच्या दुसऱ्याच दिवशी ते नवे पौरविधान वर्तव्यातही आल्याची द्वाही फिरली. इस्लामी लग्नप्रथा रद्द, इस्लामी वारसाप्रथा रद्द, इस्लामी बहुपत्नीत्व रद्द, धार्मिक न्यायशासन रद्द, पौरविधान स्विट्झर्लंड-मधील लागू केले तर दंडविधान (Criminal Law) इटलीतील निर्बंधपंडित आणून त्यांच्याकडून बनवून घेतले. चोरी, दरोडे, हत्या इत्यादी साहसांना आणि अपराधांना कुराणातील अरबी धर्मकल्पनानुगामी पुरातन शासने न देता प्रागतिक काटेकोरपणास साजेल असा न्यायनिवाड्याचा आणि दंडशिक्षेचा प्रघात चालू केला.

स्विस पौरविधान आणि इटालिअन दंडविधान जसे झटपट लागू केले तसेच वाणिज्यविधान (mercantile Law), सैनिक-रचना, सैनिक शिस्त, रणनितीप्रभृति सुधारणा जर्मनीकडून अवश्य तशा घेतल्या आणि तुर्की लोकसभेने त्यास तशीच घाऊक संमती झटपट देऊन टाकली.

हे सारे निर्बंध संमत करून नि सुधारणांचे हे नुसते ठराव करुनच तुर्की लोकसभा थांबली नाही. केमालपाशा हा नुसता ठरावी मनुष्य नव्हता. तो वर्तावी पुरुष! ठराव करण्यात दाखविलेल्या तातडीहूनही अधिक निकडीने नि नेटाने त्याने दुसऱ्याच दिवसापासून त्या ठरावांचा वर्तावही चालू केला. एका दिवसात एक युग बदलून टाकणारी युक्ति कोणत्या मंत्राने केमालपाशास साध्य झाली? ही जादू घडवून कोणत्या कांडीने आणली? अवघ्या एका वाक्याने! कोण्या अपरिवर्तनीय धर्मग्रंथात सांगितला म्हणून कोणताही ऐहिक व्यवहार सततचा धर्म्य वा अधर्म्य ठरत नसून तो राष्ट्रास आजच्या परिस्थितीत हितप्रद आहे की अहितप्रद आहे या प्रत्यक्षनिष्ठ कसोटीनेच तसा ठरविला पाहिजे. जुने पुस्तक काय म्हणते, हा प्रश्न दुय्यम, औषध आजोबांच्या बटव्यातलेच आहे ना, हा प्रश्न दुय्यम, आजच्या रोगावर ते रामबाण आहे का हा प्रश्न मुख्य! तरुण तुर्कांनी हे सूत्र उच्चारले आणि मन्वंतर झाले.

पण जर का मौलवीमंडळाकडे हे काम केमालपाशाने दिले असते तर? त्या सुधारणांतील एकेक शब्द धर्मग्रंथाद्वारे नक्की करण्याचे आधी त्या धर्मग्रंथातील किती वाक्यांचे किती अर्थ करावे लागते, किती ओढाताण, किती भाष्ये, टीका, वादविवाद! आणि शेवटी नवमतप्रवण मौलवींनी जुन्या शब्दांत नवा अर्थ आहेच म्हणून शास्त्रनिर्णय दिला असता आणि जीर्णमतवाद्यांनी सुधारणा शास्त्र-बाह्य आहे, म्हणून त्याज्य आहे हा शास्त्रनिर्णय दिला असता!! नवमतवाद्यांना करावा लागता बौद्धिक अप्रामाणिकपणा; जीर्णमतवाद्यांना करावा लागता त्याहूनही भयंकर असा राष्ट्रीय आत्मघात! आणि इतकेही

करून पुन्हा एकमुखी निर्णय न झाल्याने शास्त्रार्थाचा प्रश्न राहता पहिल्याने जिथे होता तिथेच! आणि तसाच अनिर्णीत!

धर्मस्वातंत्र्याची घोषणा

यास्तव धर्मग्रंथ उघडून सुधारणेचा प्रश्न सोडविण्याचे भानगडीत शतकानुशतके न खर्चता तरुण तुर्कांनी धर्मग्रंथ मिटून तो प्रश्न सुटतो की काय ते पाहिले. तो काय? धर्मग्रंथ मिटला आणि तत्काल तो प्रश्न सुटला! व्यवहारात धर्माची अशी नड उरलीच नाही. धर्म त्याच्या त्याच्या वैयक्तिक मतापुरता राहिला त्यासरशी तुर्कस्थानात धर्मस्वातंत्र्याची घोषणा करण्यात आली. फार काय, हिंदुस्थानात जे वाचणे अनेक इस्लामी धर्मवीरांस केवळ नरकाचे साधन वाटते ते हिंदूंचे वेद तुर्की विद्यापीठांतून परमादराने, पण ऐतिहासिक दृष्ट्या आज अभ्यासिले जात आहेत. काही प्रमाणात त्यांचा अभ्यास आवश्यक समजला जातो.

अरबी लिपीचे उच्चाटन

अरबी लिपी ही कुराणामुळे तुर्कस्थानात धर्मलिपीचे पावित्र्य पावलेली, इतकेच नव्हे तर तीच एक अनन्य लिपी त्या देशात पूर्वापार चालत आलेली. पण ती अतिशय बोजड, मुद्रणार्थी, शिक्षणार्थी पराकाष्ठेची अडाणी, तुर्कांत शेकडा ९० अशिक्षित लोक, पण त्यास युरोपच्या शेकडा ९० शिक्षितांच्या मांडीस मांडी लावून बसावयाचे तर ती अरबी लिपीची धोंड वाटेतून काढणेच भाग! मुद्रणावर रुळलेली युरोपची रोमन लिपी समोर होतीच. केमालपाशाने तत्काळ तिलाच उचलली. साधारणतः एक वर्षाची अवधी ठरवून सारे सरकारी काम त्या अवधीनंतर रोमन लिपीत चालणार म्हणून आज्ञा सुटली. शाळांतून तर त्याच दिवसापासून रोमन लिपी चालू! ही लिपीशुद्धिची चळवळ त्यांनी इतक्या नेटाने रेटली की, स्वतः केमालपाशा शाळांतून ती शिकवू लागले. केवळ दहा अक्षरे बदलताच रोमन लिपीच्याही तोंडात मारू शकेल इतकी मुद्रण आणि शिक्षणसुलभ होणारी आमची देवनागरी लिपी जर केमालपाशाचे हाताशी असती तर त्याने अरब लिपी बदलण्यास एक वर्षाचा अवधीसुद्धा राष्ट्रास दिला नसता! कारण दहा अक्षरे देखील बदलण्यास पन्नास वर्षे र र र करीत रेंगाळत राहण्यास केमालपाशा कोणी क्षयरोगी थोडाच होता! ठरलेल्या दिवशी त्याचे सरकारी काम, सारी वृत्तपत्रे साऱ्या राष्ट्रभर अगदी नवीन अशा रोमन लिपीत चालू झाली!

अरबी भाषेचे उच्चाटन

तुर्कांस स्वतःची लिपीच नव्हती; पण भाषा होती. तथापि जेते तुर्क राजे असता राजभाषेचा मान होता जितांच्या अरबीस! त्या सावटाखाली तुर्की भाषा पार खुरटून गेली. सारे साहित्य अरबीत, तुर्की घरादारांत अरबी शब्दांचा बाजार! स्वाभिमान जागृत झालेल्या

तरुण तुर्कांस ते कसचे खपणार? शिवाजी महाराजांनी मराठीस ह्याच अरबीप्रभृति परकीय शब्दांच्या धुडगुसापासून मुक्त करण्यासाठी राजाज्ञा काढली होती, पण महाराजांइतके त्यांचे राष्ट्र करारी, चिकाटीचे नसल्यामुळे आजही मराठीत 'कबूल', 'हल्ली', 'शिवाय', 'तहह्यात' प्रभृति शेकडो परकीय शब्द आपल्या स्वकीय शब्दांच्या थडग्यावर भरभराटलेले आढळत आहेत! केमालचे नवतुर्कांचे राष्ट्र सुदैवाने त्याच्याइतकेच करारी पडले. त्यांना स्वभाषेतील थोडेसे परकीय शब्दच काढून टाकावयाचे नव्हते, तर जवळजवळ मेलेली भाषाची भाषा जिवंत करावयाची होती! पण त्यांनी तेही केले. मध्यआशियातील तुर्कांच्या मूळस्थानात संशोधनमंडळे गेली आणि तिकडून पूर्वीचे शब्द शक्य तितके गोळा केले! पंधरा हजार शिक्षकांना तुर्की शब्द पुनरुज्जीविण्याचे किंवा नवीन निर्मिण्याचे कामावर नेमण्यात आले! तुर्कीत वाङ्मय नसल्यामुळे सारे साहित्यिक शब्द नवे पाडले! कोणी वीस हजार तुर्की शब्द जमवून दिले! स्वतःचे बोलण्यात बिनतुर्की-विशेषतः अरबी शब्द सापडणे ही गोष्ट शिष्टाचाराविरुद्ध समजली जाऊ लागली! मंत्रिमंडळातील मोठमोठे 'पाशा' प्रधान एका तासात कोण परकी शब्द कमीत कमी वापरतो याच्या चढाओढी लावू लागले आणि सरकारी राजपत्रात (गॅझेटांत) प्रत्यही पाच नवे तुर्की शब्द राष्ट्रभर वापरण्यासाठी प्रसिद्ध होऊ लागले.

तुर्की राष्ट्रांतही या भाषाशुद्धीच्या वावटळीस पालापाचोळ्याचा थोडा विरोध झाला. कित्येक म्हणाले, परकीय शब्दांनी भाषासंपत्ती वाढते. केमालपाशा म्हणाला, स्वकीय शब्द नाहीतच त्या अर्थाचे परशब्द घेईन, त्याने भाषासंपत्ती वाढते; पण स्वकीय शब्द मारून जे परशब्द जिवंत राहू पाहतात त्याने संपत्ती वाढते असे म्हणणे म्हणजे औरस पुत्र मारून दत्तक घेतल्याने संतति वाढते असे म्हणण्यासारखेच आहे! स्वधर्मातील माणसे राखून बाटलेल्यांना पुन्हा स्वधर्मात आणणे ही खरी शुद्धी होय, पण जितके परधर्मीय शुद्ध करुन घेणे तितकेच स्वधर्मीय ठार मारून टाकणे ही शुद्धी नसून बेशुद्धी आहे!! तुर्की भाषेसारखी आसन्नमरण आणि मूळचीच साधी भाषा, पण तिचा हा केवढा अभिमान! मग जर का कुबेरासारखा संपन्नतम शब्दसागर घेऊन त्याच्या पाठीशी, आमच्या पाठीशी आमची संस्कृताची देववाणी आहे, तशी एखादी भाषांची राणी उभी असती तर त्याने देवांच्या राष्ट्रावर सुद्धा ती स्वभाषा लादण्याची आकांक्षा धरली असती! 'कायद्या' सारख्या शब्दासाठी देखील आमच्यासारख्या करंट्या शालीनतेने तो दारोदार भीक मागत थोडाच फिरता!

अरबी पूजाप्रार्थनादि आचारांचे उच्चाटन

नैर्बंधिक क्रांतीचे मागोमाग आचारांची क्रांती घडन आली. सारे कुराण तुर्की भाषेत अनुवादिले गेले. अत्यंत पवित्र 'अल्ला' शब्द देखील अरबी म्हणून निषिद्ध झाला! देवास

तुर्कीही कळते! असे म्हणून त्या अर्थांचा 'तारी' हा शब्द प्रार्थनेत योजला. पहाटे मशिदीतून जी 'आजाना'ची आरोळी ठोकण्यात येते तिचा मंत्र साऱ्या मुसलमानी जगात अरबी आहे. केमालने तो मंत्र तुर्की भाषेत अनुवादला नि तुर्की संगीतात बसविला. तोच तुर्कराष्ट्रभर आता पहाटे ललकारला जातो. कुराणातील अत्यंत प्रमुख प्रार्थना निमाजातील पण ती अरबी भाषेत होती. तीही तुर्की भाषेतच भाषांतरली जाऊन निमाज तुर्कीतच पढले जाऊ लागले. कारण देवास तुर्कीही समजत असलेच पाहिजे! देव काही जन्मजात अरब नाही! पैगंबराच्या काळापासून स्त्रियांनी बुरखा वापरणे हाच अरबी धर्म. तुर्की तरुण स्त्रियांनी बुरखा झुगारून दिला. अरबी बुरख्यांतून- कित्येक शतकांच्या बंदीतून- तुर्की स्त्री बाहेर आली! स्वेच्छेनेच नव्हे, कारण बुरखा हाच जिला धर्म वाटत होता अशी हजार हजार तुर्क स्त्रीच या सुधारणेचा विरोध करीत राहिली- पण तरुण तुर्कांनी जो सुटेना तो बुरखा फाडून टाकला. विद्यापीठे स्त्रीपुरूषांस संमिश्र वर्गांतच शिकवू लागली. बुरख्यास मज्जाव झाला. हीनतेची खूण म्हणून फेज टोपी घालणे निर्बंधविरुद्ध कृत्य ठरले!

फेज टोपी फेकून दिली

फेज टोपी वापरणे हा दंडनीय अपराध ठरताच अशिक्षित तुर्की समाजाने दंगल केली; पण ठरल्या दिवशी ज्याने 'फेज' फेकली नाही त्याची फेज फेकली गेली. सभ्य स्त्रीपुरूषांनी एकत्र नाचणे ही अरबी आचारात दुराचाराची सीमा! तरुण तुर्कींनी नगरोनगरी सार्वजनिक नृत्यालये काढली! स्वतः केमालपाशा अशा सभ्य नरनारींच्या सार्वजनिक नृत्यात भाग घेऊ लागले. तुर्की स्त्रिया नगर संस्थातून, न्यायालयांतून, मंत्रिमंडळात देखील मोठमोठ्या अधिकारावर कामे करू लागल्या. सैनिक गणवेषाचा मांडचोळणा घालून, बंदुकी खांद्यावर घेऊन कॉलेजांतील कन्यावीरांची शेकडो पथके सैनिकी थाटाने मिरवू लागली! खेळात, घोडदौडीत, वैमानिक स्पर्धेत पुरूषांसह समानतेने भाग घेऊ लागली! निर्बंधाधारे लग्ने न नोंदविता ज्यांनी हट्टाने मौलवीमुल्लांकडूनच धर्मविधीने विवाह केले त्यांची संतती निर्बंधविरुद्ध ठरली! ती नैर्बंधिक (कायदेशीर) ठरावी म्हणून मग त्यांनी आपली जुनी लग्नेच पुन्हा जेव्हा निर्बंधानुसारे नोंदविली तेव्हा प्रश्न सुटला. स्वतः महंमद पैगंबराचे एक चरित्र केमालपाशाने आपल्या देखरेखीखाली लिहविले. देवदूताची (पैगंबराची) श्रद्धाशील भूमिका सोडून 'एक ऐतिहासिक पुरूष' याच भूमिकेवर ते सारे चरित्र लिहिण्यात आले. एक प्रबळ अरबी राष्ट्रनिर्माता, क्रांतिकारक, धर्मप्रवण, शूर असा तो मुसलमानी धर्मसंस्थापक होता असे त्या चरित्रात महंमदाचे शब्दचित्र रेखाटले आणि ते ऐतिहासिक चरित्रच खरे चरित्र म्हणून साऱ्या विद्यालयांतून शिकविण्यात येण्याची व्यवस्था केली.

विरोधाचा शतमुखी रावण

ही क्रांती केमालपाशालासुद्धा विरोधावाचून करता येणे शक्यच नव्हते. 'हळुहळू', 'सुवर्णमध्य', 'अतिरेक', 'वचनात्प्रवृत्तिर्वचनात् निवृत्तिः' प्रभृति नावाच्या अनेक प्रबळ पुढाऱ्यांचे नेतृत्वाखाली केमालपाशाच्या तरुण तुर्कांवर जुन्या तुर्कांनी चौफेर हल्ल्यावर हल्ले चढविले! तुर्कस्थान स्वतंत्र करणारा केमालपाशा स्वदेशात मोठा लोकप्रिय असला पाहिजे असे बाहेर सहजच वाटते; पण सुधारक म्हटला की तो स्वातंत्र्यवीर असला तरी, बहुधा बहुजनात अप्रियच असणार. कारण सुधारणा म्हणजेच अल्पमत नि बहुमत तीच रुढी. रशियात तीनचतुर्थांश लोक लेनिनवर तुटून पडले. मुसोलिनीवर अजूनही वर्षाकाठी दोनचार इटालियन मारेकरी घाला घालतातच. डी व्हॅलेराविरुद्ध आयर्लंडात केवढा मोठा पक्ष जळफळत आहे! त्यातही धार्मिक वा सामाजिक सुधारणेत लोकप्रियतेचे नावही घेण्यास नको. 'वरं जनहित ध्येयं केवला न जनस्तुतिः' हा बाणा ज्यास धरवेल, ती धमक अंगी असेल, त्यानेच ते पाऊल टाकावे; तशाच निडरपणे केमालपाशाने ते पाऊल टाकले. अकस्मात सुधारणांचा धडाका उडाला आणि लोकसभेच्या दाराशी राजकीय केंद्रा-केंद्रांवर तोफांच्या रांगा रोखून, जुन्या पक्षाशी युक्तिवाद करण्याचे काम प्रथम त्या तोफांच्या तोंडाकडेच सोपवून, केमालने जो अपरिवर्तनीय म्हणून पूज्य झाला तो धर्मग्रंथच्या ग्रंथ अपरिवर्तनीय म्हणूनच रद्द करुन टाकण्याचे मुख्य काम तडकाफडकी पार पाडले. नंतर मतपरिवर्तनार्थ त्याने सारे मुद्रण, सारे वाक्पीठ, सामोपचाराच्या साऱ्या कला कामास लावल्या. पण असंतोषाची आग विझेना. फेज टोपी रद्द केली म्हणून अशिक्षितांनी दंगे केले. कुराणातील पवित्र अरबी मंत्र रद्द करुन ते तुर्की भाषेत चालू केले म्हणून अरब मुल्लामौलवींच्या अनुयायांनी आग पाखडली. केमालवर मारेकऱ्यांचे घाले पडले. शेवटी कुठे कुठे पलटणी देखील फितल्या आणि सशस्त्र बंडे उठली! तुर्कांच्या बाहेरच्या शत्रूंनीही या यादवीत थोडे फार तेल ओतले. पण ते तरुण तुर्क अल्पसंख्य असताही अल्पबळ नव्हते. त्यांच्या शिस्तीने, शौर्याने युरोपच्या तोंडात मारली होती. त्यांनीही रुद्ररूप धारण करताच दंगेखोरांची धुळधाण उडाली. बंडाचे कंबरडे मोडले. स्थलाभावामुळे ती झुंज उल्लेखनीय असताही वर्णिता येत नाही. तरीपण एक उदाहरण देऊ.

मुस्लिम सनातन्यांचे बंड!

आज ब्रुसाला सरकारी आज्ञेप्रमाणे मुअज्जीन (पुरोहित) निमाज पढण्यास नेहमीप्रमाणे आला. पण अरेबीत निमाज न पढता आज प्रथमच तो पाखंडपणे तुर्कीत पढला जाणार होता! हजारो वर्षांच्या रुढीचा आज भर चव्हाट्यावर शिरच्छेद होणार होता.

जनसमुदाय जमला होता. निमाजाला मुअज्जीनने आरंभही केला. पण ‘अल्ला’ शब्द गाळून ‘तारी’ हा नवा तुर्की शब्द उच्चारलेला ऐकताच मग मात्र क्षोभ कोणास आवरेना! उठा, धर्मनिष्ठ हो, उठा! असा एकच कल्लोळ उठला. हजारो लोक बिघडून उठले, निमाज भंग झाला! नगरभर नव्याजुन्यात हाणाहाण चालू झाली. पोलीस थकले. उपद्रव दिवसानुदिवस वाढत चालला. दंग्याला वाढत्या बंडाचे रूप आले. शेवटी स्वतः केमालपाशांना ब्रुसाला यावे लागले. तोंडदेखल्या गोष्टींनी आता भागत नाही हे दिसताच त्यांनी बेयोनेटांशीच गाठ घातली.

पन्नास-साठ मुल्लामौलवी पाडाव केले. हाती आले ते फाशी गेले. प्रकरण थंडावले. सरकारी निर्बंधाचा (कायद्याचा) वचक दूरवर पक्का बसला. याचप्रमाणे एका मोठ्या कटात मोठमोठे सरदार धरले जाऊन चौकशीअंती केमालने त्यांना फासावर टांगून दिले. त्यात त्याचा बालमित्र अरीफही होता. ते तिकडे ज्या वेळी फासावर लटकत होते त्या वेळी केमालपाशा इकडे जनिक नृत्यालयातील स्त्रीपुरूषांच्या एका मोठ्या संमिश्र नाचात स्वतः नाचत होते! विरोधाचा शतमुखी रावण जेव्हा जेव्हा सशस्त्र शासनवाद करू आला तेव्हा केमाललाही कृपाणाच्या अशा कठोर कोटिक्रमानेच त्याची समज पाडता आली!

कालचा पाखंड! आजचा पुण्यश्लोक

पण हे पहिल्या धडाक्याच्या तीन-चार वर्षांत जे काय झाले ते झाले. आज तुर्कस्थानच्या प्रजासत्ताक राज्यस्थापनेला दहा वर्षे झाली. नवथरच तुर्कस्थानभर तो दशम वार्षिक वाढदिवस उभ्या राष्ट्राने गाजविला! अपरिवर्तनीय अरब संस्कृतिशी जखडून टाकल्यामुळे तुर्कस्थान युरोपपुढे हतवीर्य नि हतःप्रभ होऊन गेला होता, पण ती Theocracy, ते धर्मसत्ताक राज्य, ती खिलाफत उखडून टाकून वैज्ञानिक संस्कृतीचे आणि प्रजासत्ताक राज्यांचे जीवनदान दिल्याविषयी ते सारे राष्ट्र केमालपाशाचे चरणी त्या दिवशी आपली कृतज्ञ-पुष्पांजली अर्पिते झाले! कालचा पाखंड केमालपाशा आजचा पुण्यश्लोक झाला!

* * *

# डॉ. आंबेडकरांना उत्तर.

# विजयशील हिंदुराष्ट्र !

'There is not a petty state in Rajasthan that has not its Thermopolyae and scarcely a city that has not produced its Leonidas.'

- Todd's Rajasthan.

कर्नल टॉडसारख्या परकीय इंग्रजी लेखकाने राजपुतान्याविषयी जे वरील वाक्यात म्हटले आहे की, तेथे ज्यात एकेक थर्मापिली नाही असे संस्थान नाही. एकेक लिओनिडास निघाला नाही असे नगर नाही. तेच या आसिंधुसिंधु विस्तारलेल्या अखिल हिंदुराष्ट्रा-संबंधीही म्हणता येईल!

परंतु हे ऐतिहासिक सत्य डोळ्याआड करून हिंदुराष्ट्राचे शत्रुही जे सहसा लावीत नाहीत ते दूषण डॉ. आंबेडकर आजकाल येता-जाता हिंदुराष्ट्रास लावीत आहेत! हिंदुराष्ट्राशी त्याना कोणताही संबंध ठेवावासा वाटत नसेल तर तो त्यांनी सुखेनैव तोडावा. आम्ही तो तोडू इच्छित नाही; उलटपक्षी तो समतेच्या नि ममतेच्या रज्जूंनी अधिक दृढ करण्यासाठी यथाशक्ति झटतही आलो आहो; परंतु हिंदुराष्ट्रावर उपकार करण्यासाठी म्हणूनच काय ते कोणी हिंदुत्वाच्या ध्वजाखाली यावे अशी कोणाची पायधरणी करण्याइतके काही आजही हे हिंदुराष्ट्र स्वाभिमानशून्य वा हतबल वा हताश झालेले नाही! आणि तशी वेळ दुर्दैवाने कधी आली तरीही अशा बाजारबुणग्यांच्या औदार्यावर जगण्यापेक्षा हिंदुत्वाच्या सन्मानास्तव झुंजत मरणेच कोणताही मानधन हिंदु श्रेयस्कर मानील!

आंबेडकरांचा आचरट आक्षेप

'हिंदुंचे जिणे हे आजच केवळ नव्हे तर सदासर्वदा लाजिरवाणेच काय ते होते. हिंदु अजूनही जे जगत आहेत ते काही त्यांच्या पराक्रमाने नसून दुसऱ्याच्या पायाखाली सदासर्वदा तुडविले जात असताही अशा जिण्याची लाजच त्यांना कधी वाटली नाही म्हणूनच काय ते होय! कालाच्या ओघात आम्ही जगतो आहोत, उरतो आहोत, याचा हिंदुराष्ट्राला वाटणारा अभिमान पोकळ आहे. कारण हिंदु समाजाचे जीवन हे सदासर्वदा दासांचे जीवन होते, अखंडित शरणागतीचे नि एकसारख्या पराभवाचेच काय ते! 'The Hindus' has been a life of a continuous defeat. It is a mode of survival of which every Hindu will feel ashamed! अशा आशयाचे आणि अशा कठोर शब्दांचे आक्षेप डॉ. आंबेडकरांनी पंजाबच्या जातपात-तोडक मंडळाच्या परिषदेत होऊ घातलेल्या त्यांच्या एका अध्यक्षीय भाषणात केलले आहेत.

डॉ. आंबेडकरांचे वरील आक्षेप हे सर्वथैव खोटे आहेत. जर त्यात सत्य असते, तर ते कितीही कटु असते तरी आम्ही त्याचा विषाद मानला नसता. डॉ. महाशयांनी अस्पृश्यतेच्या आजच्या अत्यंत अन्यायी नि दुष्ट रुढींविषयी जी निर्भर्त्सना केली आहे किंवा जन्मजात जातिभेदाच्या घातक परिणामाविषयी जी जळजळीत टीका केली आहे तिच्या इतक्याच न्यायनिष्ठुरपणे आम्हीही त्या दुष्ट रुढींना निषेधीत आलेले आहो, त्यांच्या उच्चाटनार्थ झटत आलेले आहोत. आमच्या हिंदुराष्ट्राच्या अंगी आज मुरलेल्या त्यासारख्या इतर अनेक दोषांनाही आम्ही सडेतोडपणे राष्ट्रहितार्थच आविष्कारण्यास कचरत नाही, हे आम्ही सांगितलेच पाहिजे असे नाही. आपल्या राष्ट्रीय दोषांना धिक्कारण्याचे साहस आणि प्रतिकारण्याची शक्ति ज्या राष्ट्रात उरलेली नसते ते राष्ट्र मृत्युपंथास लागलेच म्हणून समजावे, परंतु तसे साहस नि ती शक्ती आमच्या हिंदुराष्ट्रात आजही आहे असा आम्हास पूर्ण भरवसा असल्यामुळेच आम्ही आमचे दोष उघडकीस आणण्यात भीत नाही. तेव्हा आमच्या राष्ट्राचे असलेले दोष कोणी काढले तर तेवढ्यासाठी केवळ भावना दुखते म्हणून आम्ही त्यास निषेधू लागतो असे आमच्याविषयी तरी कोणासही म्हणता येणार नाही. अर्थात डॉ. आंबेडकर जे वरील आक्षेपात म्हणतात की हिंदुंचा इतिहास हा अखंड शरणागतीचाच इतिहास, हिंदुंचे जीवन म्हणजे प्रथमपासून आजपावेतो दास्याचेच जीवन, 'The Hindus' has been a life of a continuous defeat- ते जर ऐतिहासिक सत्य असते तर तो लज्जास्पद आक्षेपही आम्ही नाकारला नसता.

पण तरीही खऱ्या मानधन पुरूषाचे कर्तव्य ह्या परिस्थितीतही काय ठरते? ज्या हिंदुराष्ट्रात, हिंदुवंशात, आपण जन्मलो नि वाढलो त्या आपल्या राष्ट्राचा मागचा इतिहास असा अखंड शरणागतीचा आहे, आपल्या वाडवडिलांनी पराक्रम असा केलेलाच नाही, मानधन पुरूष असा आपल्या वंशात कोणी आढळतच नाही, असे ध्यानात येताच ज्यांच्या उदरी आपण जन्मलो त्यांनाच लाथाडून, तशा दुर्गतीत पिचणाऱ्या स्वतःच्या वाडवडिलांच्या पोटी आम्ही जन्मलोच नाही, स्वतःच्या वडिलांना वडील म्हणण्याची आम्हास लाज वाटते असे कापुरुषी रडगाणे गात दुसऱ्याचे वडिलासच वडील म्हणण्यासाठी हपापणे हे का आपल्या पिढीचे कर्तव्य ठरते? 'जो बापासि बाप न म्हणे' असा तो कुपुत्र तो त्या आपल्या नामर्द पूर्वजांहूनही नामर्द ठरतो! आपल्या झाडून साऱ्या पूर्वजांच्या 'अखंड शरणागती'चा कलंक दिसण्याइतका आणि तो मनात सलण्याइतका जो स्वतःस मानधन मानतो त्या पुत्राचे कर्तव्य आपल्या बापास बाप म्हणण्याचे सोडून दुसऱ्याचा बाप दत्तक घेणे हे नव्हे! तर स्वतःच्या पराक्रमाने आपल्या वंशाला लागलेला तो अखंड शरणागतीचा कलंक धुऊन टाकीन ही प्रतिज्ञा करून कर्तव्यरणात उतरणे हेच होय! जर माझे पूर्वज दुर्गतीत पिचत असतील तर मी आपल्या पुरुषार्थाने त्यांस उद्धारीन; माझ्या वंशात मागे कोणी पराक्रम केलेला नसेल नि त्याची लाज मला वाटत असेल तर मीच त्या माझ्या वंशातील पहिला

पराक्रमी पुरूष होऊन त्या माझ्या पुसट वंशावळीला जगातील इतिहासामध्ये सोनेरी अक्षरांत ठळकपणे छापविणे माझ्या कुलशत्रूनाही भाग पाडीन, माझ्या पूर्वजांनी कोणताही पराक्रम केला नाही म्हणून हसणाऱ्यांचे दात माझ्यासारख्या पराक्रमी पुरूषाला जन्म देण्याइतका त्यांचा जो बीजभूत पराक्रम होता तो दाखवून त्यांच्याच घशात घालीन, तितकेही न साधले तरी निदान माझ्या आईला घरात चूल वा पणती पेटविण्याइतकी देखील चेतना नसल्यामुळे अंधेरच अंधेर पसरलेला आहे ह्यासाठी तिला त्याच भुकेत नि अंधारात खितपत सोडून त्या तिच्या दुर्गतीच्या विटंबनेनेच तिच्या शत्रूंची हाजी हाजी करीत, त्यांच्या घरच्या तुकड्यांवर पोट भरीत त्यांच्या दिव्यांच्या दिवट्या पाजळीत राहणारा त्या आईच्या पोटी आलेला जंत न होता तिच्या त्या निराश नि निरभ्र दुर्दशेचा अंधकार घालविण्यासाठी आपल्या हृदयाचीच आगकाडी पेटवून निदान माझ्यापुरती तरी जी काही चेतना, प्रकाश नि ऊब तिला देता येईल ती माझ्या आईला देईन, असाच निश्चय नि प्रयत्न स्वतःस मनुष्य म्हणविणाऱ्याने केला पाहिजे!

जर खरोखरीच ‘The Hindus’ has been a life of a continuous defeat, जर हिंदुराष्ट्राचे जीवन हे एक अखंड नि सतत पराभवाचेच जीवन असते तर आम्ही तेही सत्य न लपविता किंवा ह्या योगाने हताश न होता हिंदूंच्या ह्या नि पुढच्या पिढ्यांना असेच उत्साहिले असते की, चला, आता आपल्या पराक्रमाने त्या ‘अखंड पराभवाचे’ उट्टे काढून आपल्या राष्ट्राचा तो कलंक धुऊन टाकण्यासाठी यापुढे तरी ‘हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्’ हा महाभारतीय मार्गच अनुसरू या!

यावरून हे स्पष्ट होईल की, आम्ही आंबेडकरांनी वारंवार केलेल्या वरील विधानांना जे निषेधू इच्छितो ते काही ती कडवट आहेत किंवा आमच्या राष्ट्रांच्या त्यात केलेल्या निंदेने आमच्या भावना दुखावतात यास्तवच काय ते नव्हे, तर ती त्यांची विधाने मुळातच अगदी खोटी नि खोडसाळ आहेत म्हणूनच काय ते होय. डॉ. आंबेडकरांसारख्या विद्वानाला हिंदुधर्मनीतीवर, श्रुतिस्मृतींवर, संस्कृतीवर, अनेक व्याख्याने आणि प्रवचने देत राहणाऱ्या आणि ग्रंथ लिहिणाऱ्या एका उत्तरदायी (Responsible) पुरूषाला त्यांची ही विधाने कशी सर्वथैव मिथ्या आहेत हे कळण्याइतके हिंदु इतिहासाचे ज्ञानही असलेच पाहिजे. निदान असावयास पाहिजे. तसे असताही त्यांनी ज्या अर्थी तापट अविवेकाचे भरी भरून हिंदुराष्ट्रांचे नावास हे नसते लांछन इतक्या अमर्यादपणे लावले आहे त्या अर्थी आम्हांस त्यांची ती विधाने नुसती खोटीच नसून खोडसाळही आहेत, असेच म्हणणे भाग आहे.

आपल्या पूर्वजांच्या ममतेपायी त्यांची नुसती स्तुती करीत सुटणे हे मूर्खपणाचे असले तरी माणुसकीस काही अगदीच सोडून नसते. पण आपल्या पूर्वजांची नसती निंदा करणं किंवा ती कुणी कुत्सिताने जाणूनबुजून तोंडावर केली असता तिचा तीव्र प्रतिवाद न

करता ऐकून घेणे हे माणुसकीस लांछनास्पद आहे. हिंदुत्वाचा संबंध, हिंदुराष्ट्राचे नाते, डॉ. आंबेडकरांनी तोडले असते तरीही केवळ न्यायाच्या, ऐतिहासिक सत्याच्या आणि निपक्षपाताच्या दृष्टीने तरी हिंदुराष्ट्राविषयी त्यांनी असली अगदी खोटी नि खोडसाळ विधाने वारंवार करीत राहावयास नको होते. अशा भरमसाट निंदेने हिंदुराष्ट्राच्या सत्कीर्तीपेक्षा निंदकाच्या सत्कीर्तीसच जास्त बट्टा लागतो हे डॉ. आंबेडकरांनी विसरू नये. तथापि ते विसरून जर कोणी अशी कुत्सित नि असत्य विधाने वारंवार करीत राहिला आणि जर त्यांचा वेळोवेळी साधार प्रतिवाद करीत गेले नाही तर अनेकदा ऐकता ऐकता असे असत्यही सहस्त्रावधी सामान्य नि अतज्ज्ञ लोकांना सत्यासारखे वाटू लागून राष्ट्राच्या आत्मविश्वासालाच धक्का पोचण्याचा उत्कट संभव असतो, हेही काही खोटे नाही. यास्तव ह्या असत्य विधानांचा निषेध करणे आणि ऐतिहासिक कसोटीस लावून त्यांचा खोटेपणा उघडकीस आणणे हे आम्ही आमचे कर्तव्य समतजो, सत्य काय ते जाणण्यासाठी तरी डॉ. आंबेडकरांनी ह्या ऐतिहासिक कसोटीचा नीट विचार करावा.

ह्या ऐतिहासिक छाननीत कोणत्याही लहानसहान किंवा विवादास्पद घटनांवर अवलंबून न राहता परकीय इतिहासकारांनाही नाकारताच येऊ नये. अशा ज्या अखंडनीय नि अगदी ठळक तेवढ्याच घटनांचा पुरावा आम्ही जमेस धरू.

ज्या अर्थी डॉ. आंबेडकरांनी त्यांच्यावर उल्लेखिलेल्या लेखात हिंदुराष्ट्राच्या कोणत्याही एका जातीला, प्रांताला, वर्गाला किंवा कालखंडाला लावून आपली विधाने न करता ती एकंदर हिंदुराष्ट्राला नि त्याच्या एकंदर जीवनकालास स्पष्टपणे उद्देशूनच केलेली आहेत, ‘The Hindus’ has been a life of a continuous defeat असेच ज्या अर्थी ते बेधडकपणे म्हणत आहेत त्या अर्थी त्यांचे खंडन करावयास ह्या विषयापुरते तरी हिंदुराष्ट्राच्या एकंदर इतिहासाचेच विहंगावलोकन करणे अवश्य आहे.

(१) वैदिक नि पौराणिक कालखंड

जे राष्ट्र आज ह्या आसिंधुसिंधु भारतवर्षाला व्यापून हिंदु म्हणून निवसत आहे त्याचा मुळारंभ वैदिक काळातील सप्तसिंधु ह्या नावाने प्रख्यातलेल्या राष्ट्रापासून झाला. त्या आमच्या अत्यंत प्राचीन सप्तसिंधु ह्या संस्कृत अभिधेचेंच हिंदु हे प्राकृत रूप होय. वैदिक काळातील त्या सप्तसिंधु राष्ट्रातील वीरांचे खड्ग नि द्रष्ट्यांची स्फूर्ति ते ज्या प्रज्वलित यज्ञाग्नीस आधारीत असत त्याच्या ज्वालांसारखीच कशी दैदीप्यमान नि दुर्घर्ष होती, त्यांच्या काळातील त्यांच्या शत्रूंवर विजयामागून विजय मिळवीत त्यांची सैन्ये, राज्ये नि संस्कृति, सरस्वतीपासून ब्रह्मावर्तास, ब्रह्मावर्तातून मगधास, प्रयागास नि काशीस, मथुरेस, द्वारकेस-पूर्व समुद्रापासून तो पश्चिम समुद्रापर्यंत अप्रतिहतपणे कशी विस्तारत गेली, विंध्य ओलांडून, सह्य ओलांडून अंती दक्षिण समुद्र ह्यांनी कसा गाठला,

अनादि घनदाट महाअरण्ये कापून-छाटून प्रदेशचे प्रदेश त्यांनी कसे वसविले, नांगरले, पेरले, सहस्त्रावधी नगरे आणि महानगरे कशी उभारली, वाटेत भेटली ती ती विभिन्न जानपदे नि विपक्षीय संस्कृति काही सामावून घेतल्या, काही पचवून टाकल्या, काही कशा मातीस मिळविल्या, कित्येक रावणांची दाही दाही शिरे कशी छाटून टाकली, कित्येक द्वेष्ट्यांचे सहस्त्र सहस्त्र बाहू कसे तोडून टाकले. कित्येक बळी-महाबळींना कसे पाताळी घातले, काव्यशास्त्र, व्याकरण, कृति, शिल्प, धर्मप्रयोग, तत्वज्ञान प्रभृति भौतिक नि आत्मिक प्रगतीतही केवढे महनीय स्थान त्यांनी पटकाविले ते काही आता नव्याने सांगावयास हवे किंवा पुराव्याने सिद्धावयास पाहिजे असे नाही! डॉ. आंबेडकर स्वतःच त्या निबंधात म्हणतात की, 'That the Hindu Religion was once a missionary rligion must be admitted. It would not have spread over the face of India if it was not a missonary religion!' 'हिंदुधर्म हा प्रचारशील धर्म होता ह्यात शंकाच नाही. नाही तर ह्या साऱ्या भारतवर्षास तो असा व्यापून टाकू शकताच ना!' हिंदुराष्ट्राच्या धार्मिक दिग्विजयासंबंधी डॉ. आंबेडकरांनीच जे वरील एकमेव प्रमाण पर्याप्त मानले आहे तेच वैदिक नि पौराणिक कालखंडातील सांस्कृतिक नि राजकीय दिग्विजयासंबंधीही निर्णायक धरले पाहिजे. वैदिक सप्तसिंधुंचे राष्ट्र पंचनदापासून ब्रह्मावर्तातून आर्यावर्तात नि आर्यावर्तातून ह्या 'उत्तर स्यात्समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम्। तं वर्ष भारतं नाम भारती यत्र संततिः' अशा उभ्या भारतवर्षात आपली संस्कृति नि साम्राज्य फैलावीत जात जात ज्याचा पुरोहित आणि सेनानी इंद्र आहे अशा आपल्या राष्ट्रांचे वर्चस्व ज्या काळाच्या जगात अप्रतिहतपणे गाजवीत राहिले होतो त्या काळाविषयी तरी 'Hindus' life has ever been a life of continuous defeat असे म्हणण्याची कोणाची छाती आहे? त्या हिंदूंच्या दिग्विजयी वैदिक, रामायणिक, महाभारतीय काळाचे वर्णन करावयाचे असेल तर असेच केले पाहिजे की, 'In the Vedic and Puranic period the life of the Hindus has ever been a life of one continuous triumph, of invincible independence, astonishing progress and unchallengeable superiority!'

आणि तो वैदिक नि पौराणिक कालखंडही काही लहानसहान नव्हता, शतकांनी न मोजता सहस्त्रांनी मोजला जावा इतका सुदीर्घ! त्या कालखंडातील अजिप्शिअन, बाबिलोनिअन, खाल्डिअन, असीरियन प्रभृति हिंदूंच्या त्या काळची समकालीन राष्ट्रे आपले सारे जीवनकार्य नि जीवन संपवून मरून, अस्थिशेष वा इष्टिकाशेष वा नामशेषही होऊन गेली!

२) ऐतिहासिक काल: प्राचीन खंड

ग्रीकांची स्वारी आणि शेवटी हिंदुंनी त्यांची उडवलेली धुळधाण- इतिहास कालाचे प्रारंभीच सिकंदराने इ.स. पू. ३२६ वे वर्षी हिंदुस्थानवर स्वारी केली. वैदिक नि पौराणिक काळातील दैत्यदानव, असुरनाग, यक्षराक्षसादि परकीय शत्रूंशी दोन हात करून हिंदूंनी त्यांचा धुव्वा उडवून दिला आणि त्या कित्येकांच्या बारशाप्रमाणेच सर्वांच्या बाराव्यालाही जेवून ते मोकळे झाले! त्यानंतरचा काळ तो इतिहासकाळ. त्याच्या आरंभीच सर्व पृथ्वी पादाक्रांत करू निघालेल्या ग्रीकांसारख्या बलाढ्य शत्रूशी सामना देण्याचा प्रसंग ह्या सिकंदराच्या स्वारीमुळे त्यांना आला.

पण ग्रीस देशातून निघाल्यानंतर सीरिया, इराणप्रभृति देशविदेश पादाक्रांत करीत आलेल्या सिकंदराच्या दिग्विजयाची लाट ह्या हिंदुस्थानच्या हिमालयीन तटावर आदळताच फुटून गेली आणि भारतविजेता म्हणवून घेण्याची सिकंदराची खुमखुमी तर पंचनद ओलांडतो तोच जिरून गेली! त्याने पौरसाचा पराभव केला. पण तो इतक्या निकराच्या लढाईनंतरच की ग्रीक सैन्याचे त्यापुढच्या साम्राज्याशी गाठ घालण्याचे धैर्यच काही अंशी तरी खचून जावे! व्यास नदी ओलांडून त्या मगध साम्राज्याशी गाठ घालण्याचे सिकंदराच्या सैन्याने साफ नाकारले, बंड केले आणि सिकंदराला परत फिरणे भाग पाडले. ह्या बंडाला इतरही काही कारणे असली तरी जर का मगध साम्राज्यामध्ये सिकंदरास इराणप्रमाणेच मोकळे रान सापडण्याचा संभव असता नि चालता चालता जिंकता येण्याइतके ते दुर्बल आहेसे त्या ग्रीक सैन्यास वाटले असते तर ते मगधाच्या राजवाड्यात दोन चार चमचमीत भोजनसमारंभ उरकल्यावाचून थोडेच परत जाते! आणि परत फिरले ते तरी कसे? तर पावलागणिक हिंदूंच्या लहानमोठ्या गणराज्यांनी केलेल्या लांडगेतोडीने भीक नको पण कुत्रा आवर असे संत्रस्त होत होत! त्यातही शूद्रक नि मालव येथील हिंदूंच्या गणराज्यांनी सिकंदराला असा उपद्रव दिला की, ग्रीक इतिहासकारांना देखील त्यांच्या शौर्याची वाखाणणी केल्यावाचून राहवेना. त्या दिग्जेत्या सिकंदराला हिंदुवीरांनी एकदा तर व्यक्तिशः घेरून घायाळ करून समरांगणात पाडला! हिंदूंच्या खड्गाघाताने बेशुद्ध नि रक्तबंबाळ होऊन पडलेल्या आपल्या त्या दिग्जयी सम्राटाला मोठ्या कडीनिकडीने बचावून यावनी सैन्याने रणातून त्या दिवशी वेळीच उचलून नेले म्हणून सिकंदर हिंदुस्थानातून जिवंतपणी परत तरी जावू शकला!

सिकंदर दिग्विजेता होताच होता;
पण तो भारतविजेता नव्हताच नव्हता!

पंचनदांच्यापुढे तो पाऊलदेखील टाकू शकला नाही. दक्षिण समुद्रापर्यंत पसरलेल्या हिंदुराष्ट्रसंघाचा केसदेखील तो वाकडा करू शकला नाही. दक्षिणेत तर तो आला ही बातमीसुद्धा पोचण्याचे आधी सिंधु ओलांडून तो आला तसा परतलाही होता! एक पंजाब तेवढा त्याने आपल्या साम्राज्यास जोडला (इ.स.पू. ३२५), पण हिंदूंनी ग्रीकांच्या अधिकाऱ्यांना पिटाळून लावून तो लगोलग परत घेतला (इ.स.पू. ३२२ चे आत)! अवघ्या चार वर्षांचे आत जगतातील त्या काळच्या बलाढ्य शत्रूचा पाय हिंदूंनी हिंदुस्थानातून रोवला जाता जाताच असा उखडून टाकला!

पण इतक्यावरच थांबले नाही. हिंदूंचा हा विजय अप्रत्यक्ष विरोधाचा, यावनी सैन्याशी समोरासमोर खड्गास खड्ग भिडवून काही हिंदूंनी त्यांना धूळ चारली नाही, असे कोणी वावदूक म्हणून लागला तर त्याचेही तोंड बंद पाडणारी घटना ग्रीकांच्या इ.स.पू. ३२२ तील वरील उच्चाटनामागोमागच घडून आली. ग्रीकांसारख्या बलाढ्य शत्रूशी सामना देण्यास पालटलेल्या परिस्थितीत जे अवश्य ते ते जुने टाकून, चाणक्याच्या अलौकिक प्रतिभेने नि चंद्रगुप्त मौर्याच्या पराक्रमाने मगधात मोठी राज्यक्रांती घडवून आणली. हिंदुसाम्राज्याची सूत्रे त्यांच्या हाती येताच ग्रीकांच्या हातातून हिंदूंनी पंजाब लगोलग हिसकून घेतला असे पाहताच सिकंदराचा प्रबळ सेनापती सेल्युकस हा यावनी सैन्यासह पंचनदावर इ.स.पू. ३०५ च्या संधीस पुन्हा चालून आला. तेव्हा सम्राट चंद्रगुप्तने त्याला रणांगणात गाठून अभिमुखसमरात ग्रीकांचा इतका पूर्ण पराभव केला की, पंचनदच नव्हे तर अफगाणिस्थान आणि बलुचिस्थान हे प्रांतही विजयी हिंदुराष्ट्रास देऊन वरती अहेर म्हणून ग्रीकसम्राट सेल्युकसने आपली कन्याही हिंदुसम्राट चंद्रगुप्ताला आर्पिली! त्या काळच्या जगातील बलाढ्यांतील बलाढ्य अशा ग्रीकांवर हिंदुनी असा निर्विवाद विजय मिळविला! इ.स.पू. ३०५ च्या आधी हिंदूंनी ग्रीक राष्ट्राचा पुरता मोड करून अवघ्या वीस वर्षांचे आत त्याची धुळधाण उडवून दिली आणि हिंदुकुश पर्वतावर हिंदुसाम्राज्याचा ध्वज नेऊन रोवला! पुढे दोनशे वर्षेपर्यंत हिंदुराष्ट्राकडे पुन्हा डोळा उचलून पाहण्याची ग्रीकांची छाती झाली नाही हेही ध्यानात ठेवले पाहिजे. सिकंदराने जिंकलेली आशिया खंडातील बहुतेक राष्ट्रे ग्रीकांच्या हाती राहून तेथे त्यांची चिरस्थायी राज्ये नांदली. त्यांच्या दिग्विजयाचे दात एका हिंदुस्थानानेच काय ते पाडले!

त्या काळच्या जगातील साम्राज्यांमध्ये चंद्रगुप्त-बिंबिसार, अशोकादी मौर्यसम्राटांचे हिंदुसाम्राज्य सर्वतोपरी श्रेष्ठ होते की नाही, स्वतंत्र होते की नाही, प्रबळ होते की नाही ते परस्परे चंद्रगुप्ताचे राजधानीत असलेला ग्रीकांचा राजदूत जो मेगॅस्थेनिस त्यालाच विचारा! त्या 'देवानाम् प्रिय' अशोकाच्या यशःस्तंभाना विचारा! ह्या पुराव्याला समोर ठेवले असता हिंदूंचे जीवन सतत 'शरणागतीचे' नि अखंड पराभवाचे' होते अशे कोणता पिशुन म्हणू धजेल!

मीनांदराशी युद्ध:- सेल्युकसला चंद्रगुप्ताने पराभविल्यानंतर कोणाही अहिंदूस भारतवर्षाची सीमा उल्लंघिण्याचे धाडस अव्याहत दीडशे वर्षेपर्यंत झाले नाही; पण मौर्यवंशाचे बौद्ध राजे पुढे दुबळे झालेले पाहताच आशियातील ग्रीक राजांनी हिंदुस्थानवर दुसरे मोठे आक्रमण करण्याचा घाट घातला. तेव्हा मागे नंदवंशीय सम्राट असेच दुबळे झाल्यामुळे चाणक्य-चंद्रगुप्ताने त्या नंदवंशीय सम्राटास ठार करून हिंदुसाम्राज्याची सत्ता जशी आपल्या हाती घेतली होती तशीच वैदिक धर्माचा निस्सीम अभिमानी असलेल्या सेनापती पुष्यमित्राने त्या दुबळ्या बौद्ध बृहद्रथ राजास मारून या वेळीही साम्राज्यसत्ता आपल्या पराक्रमी हाती घेतली. मगधात ही राज्यक्रांती होत आहे तोच ग्रीक राजा मीनांदर हा सिंधु ओलांडून पंचनदात इ.स.पू. १८० चे संधीस घुसला. ग्रीकांनी तडाख्यासरशी चाल करुन साकेत घेतले आणि ते मथुरेपर्यंत चालून आले, तोच सम्राट पुष्यमित्राने तेथे त्यांना गाठले. रणामागून रणामध्ये हिंदुसैन्याने ग्रीकांस चोप दिला आणि मागे रेटीत रेटीत शेवटी पुष्यमित्राने मीनांदराचा इतका धुव्वा उडविला की, त्यास धावपळ करीत सिंधूपार होता होताच नाकी नव आले. ह्या विजयाची घोषणा करण्यासाठी हिंदुसम्राट पुष्यमित्र ह्याने मोठा अश्वमेघ यज्ञ आरंभून आपला यज्ञीय विजयाश्व संचारार्थ सोडला. त्यास काही ग्रीक राजांनी अडविताच पुष्यमित्रांचा पुत्र जो युवराज अग्निमित्र ह्याने त्यांचाही मोड केला. हिंदूंच्या अप्रतिरथ पराक्रमाची द्वाही अशी देशादेशी गाजवीत तो विजयाश्व परतल्यानंतर पुष्यमित्र सम्राटाने आपला अश्वमेध यज्ञ पुरा केला.

मीनांदरच्या ह्या स्वारीविषयी हे लक्षात ठेवले पाहिजे की, मथुरेपर्यंतचा उत्तरपश्चिमेचा एक प्रांत सोडला तर बाकीच्या स्वाऱ्या दक्षिणोत्तर अशा विस्तृत भारतवर्षाशी सिकंदराच्या स्वारीप्रमाणे ह्या स्वारीचाही लवलेश संबंध आला नाही आणि त्या परशत्रूंना आत येता येताच हिंदूंनी असे लगोलग पिटाळून लावले.

शक आणि यूची ह्यांशी महायुद्ध:- सम्राट पुष्यमित्राच्या वरील दिग्विजयानंतर हिंदुराष्ट्राला अहिंदु आक्रमणाशी तोंड देण्याचा म्हणण्यासारखा प्रसंग शंभर वर्षे तरी काही आला नाही. त्यानंतर साऱ्या आशियाला हादरून टाकणाऱ्या शक आणि यूची यांच्या टोळधाडी जेव्हा उठल्या तेव्हा इसवीसनाच्या पहिल्या शतकात हिंदुराष्ट्रालाही त्यांचा प्रचंड धक्का बसून हिंदूंच्या प्राचीन इतिहासाला एक तत्कालीन लांछन लागावे इतका आमचा पराभव झाला. ग्रीकांच्या आक्रमक सैन्यांना हिंदुस्थानात घुसताच जसे एका दशकाचे आतच चंद्रगुप्ताने वा पुष्यमित्राने पुन्हा सिंधूपार पिटाळून लावले तसे या शक-यूचींचे परिपत्य लगोलग कोणी करू शकला नाही; उलट काश्मीर, पंजाब, सिंध, काठेवाड प्रभृति प्रांतात त्यांची राजसत्ता चिरस्थायीपणे स्थापिली जाऊन त्या अहिंदु राजवंशांनी उज्जयिनीप्रभृति दोन-तीन राजधान्यांतून दोन-अडीच शतके तरी राज्य करू शकावे, ही वस्तुस्थिती त्या कालखंडापुरती लज्जास्पदच समजली पाहिजे.

परंतु असा तात्कालिक पराभव होणे आणि दोनचार प्रांत शत्रूचे हाती पडणे हे निराळे आणि तो अल्पांशी नि अल्पकालीन पराभव झाला म्हणून त्या यच्चयावत राष्ट्राचे यच्चयावत जीवनच 'सतत पराभवाचेच काय ते होय' असे अप्रमाण नि आचरट विधान करणे हे निराळे!

विषप्रयोगाच्या संकटात बलिष्ठ भीमसेनही मूर्च्छित होऊन डोहात बुडाले, त्यावेळी कित्येक नागांनी त्यांना विळखून टाकले, कित्येक बेडूक त्यांच्या डोक्यावर नाचले, पण त्या नागांच्या त्या विषासही पचवून त्या विषप्रयोगाच्या बेशुद्धीतूनही ते सावरले आणि त्या विषप्रयोगाचा सूड त्या दुःशासनाचा कंठनाळ फोडून घेते झाले हेच भीमाचे भीमपण! पण ते विसरून आणि त्या तात्कालिक बेशुद्धीसच भीमसेनाचे सबंध जीवन समजून 'भीमाचे जीवन म्हणजे एक अखंड बेशुद्धीच होती, जन्मभर त्या दुबळ्याचे डोक्यावर बेडके नाचली' असे जर कोणी ट्रांवट्रांव धजेल तर ते कोणी फुगीर बेडूकच काय ते!

शक-यूचींच्या भारतावर कोसळलेल्या या आपत्तीचीही गोष्ट तशी आहे. गुजराथपर्यंत त्यांची सत्ता चालू होती. भारतीयांस त्यांचा यशस्वी प्रतिकार करवला नाही; पण त्या अवधीत आंध्रीय हिंदु सम्राटांनी आपली शक्ती एकवटून शक लोक नर्मदा उतरून येतात तोच त्यांची गाठ घेतली. प्रथम त्यांना नर्मदेपार हुसकले आणि मग आंध्रचा प्रबळ हिंदु नृपति गौतमीपुत्र विलीयंकूर शालिवाहन ह्याने शकांच्या हातून उत्तरेकडील प्रांतामागून प्रांत परत घेत शेवटी शकांचा प्रत्यक्ष राजा नहपान क्षहराट यास तुमूल संग्रामात पराभवून ठार मारले! त्या हिंदु विजेत्यांची आई जी गौतमी तिला आपल्या वीरपुत्राने अहिंदूंचा अशा सूड उगविल्याची बातमी कळताच इतका परमहर्ष झाला की, त्याची स्मृति कार्ले येथील शिलालेखात नित्याची कोरून ठेवली जावी! इ.स. १०६ ते १३० पर्यंत ह्या प्रतापी गौतमीपुत्राने राज्य केल्यानंतर त्याचा पुत्र राज्यावर बसला. तोच प्रख्यात शककर्ता पुलुमायी शालिवाहन हा होय! त्याने उज्जयिनीचा दुसरा पराक्रमी राजा जो रुद्रदामन त्याचाही पराभव केला.

इ.स. ३२० चे संधीस वैदिक धर्माभिमानी गुप्त वंशाच्या हाती जेव्हा उत्तरेच्या हिंदु साम्राज्याची सूत्रे गेली तेव्हा त्यांचा पराक्रमी संस्थापक सम्राट चंद्रगुप्त याने उत्तरेच्या यूचींचा नि शकांचा उच्छेद मांडला. त्याचा पुत्र सम्राट समुद्रगुप्त, ज्यास विदेशी इतिहासकारही भारतीय नेपोलियन म्हणतात, त्याने पंचनदात घुसून शक-यूचीशी दोन-तीन पिढ्या चाललेल्या त्या महायुद्धात विजयामागून विजय मिळवीत त्या परकीयांची धुळधाण उडविली! त्याचा पुत्र सम्राट चंद्रगुप्त (द्‌वितीय) होय. विक्रमादित्य तो हाच! कनिष्कापासून बळावलेली शक-यूचींची सत्ता त्याने साफ लयाला नेली. त्यांचा शेवटचा शत्रू जो रुद्रसिंह त्याचा हिंदुसैन्याने पुरता पराभव करून त्याची राजधानी जी उज्जयिनी तीही घेतली. सिंधु

नदीपासून पूर्व, पश्चिम, दक्षिण सिंधूपर्यंत जिकडे तिकडे हिंदुराष्ट्राचे विजय दुंदुभि पुन्हा अप्रतिहतपणे दुमदुमू लागले.

जवळजवळ दोनशे वर्षे काश्मीर ते नर्मदेपर्यंतचा सिंधु-गंगेच्या मधील भारतीय प्रदेश शक-यूचींच्या परकीय सत्तेखाली होता. हिंदु वंशांनी रणामध्ये त्यांचा चक्काचूर उडविला, हे तर झालेच; पण त्या सामरिक विजयापेक्षाही एक अत्यंत गौरवास्पद असणारा दुसरा जो विजय हिंदूंनी त्या लाखो शक- यूचींवर मिळविला तो होता सांस्कृतिक विजय! वास्तविकपणे शक-यूची आत आले तेव्हाच काय ते खरे परकीय होते, खरे शक-यूची होते; पण जेव्हा इ.स. १३० च्या संधीस कनिष्काने बौद्धधर्म आणि अतरांनी वैदिक धर्म स्वीकारला तेव्हाच हिंदूंनी त्यांना खऱ्याखऱ्या अर्थी पाडाव करून टाकले! एक शतकाचे आत हिंदुसंस्कृतीचा ध्वज त्या शक-यूचींच्या राजधान्यांवर नि राज्यांवर फडकू लागला! त्यांच्यातील सहस्त्रावधी जनतेने नि शतावधी राजपुरूषांनी, मोठमोठ्या राजवंशांनी, वैदिक धर्म, भाषा, देश, वेष स्वीकारला-कित्येकांनी बौद्ध! हिंदुराष्ट्राने त्यांची राज्येच काय ती छिनानून घेतली नाहीत तर त्यांचे स्वत्वसुद्धा सर्वस्वी छिनावून, महासर्प जसा त्याच्या प्रचंड जबड्यात घुसणाऱ्या हरिणाला जिवंतच्या जिवंत गिळून पचवितो तसे हिंदुसंस्कृतीने तिच्या जबड्यात घुसणाऱ्या त्या लाखो शक-यूचींना आपल्या प्रखर जठराग्नीत गिळून गाळून नुसते पचवून टाकले. त्यांनाच हिंदु करून सोडले! आपल्या ह्या इ.स. ३०० ते ४०० च्या पराक्रमी कालखंडास विदेशीय इंग्रज इतिहासकारही (Golden Age) स्वर्णयुग म्हणून संबोधतात. सुदैवाने त्याच वेळी चीन प्रवासी फाहाअन हा भारतवर्षांत आला होता. मेगॅस्थेनिसप्रमाणेच त्याने ह्या काळच्या हिंदु राष्ट्राच्या पराक्रमाचे, सुस्थितीचे नि वैभवाचे जे वर्णन लिहून ठेवले आहे तेच कुत्सित निंदेस सांगेल की, त्या काळी देखील हिंदुंचे जीवन पराजयाचे वा शरणागतीचे नसून शत्रूंना दाती तृण धरविणाऱ्या पराक्रमाचे, राष्ट्रस्वातंत्र्याचे नि त्यांच्या जगातील प्रबलतम साम्राज्याचे होते!

हूणांची स्वारी:- ह्या ऐतिहासिक काळातील प्राचीन खंडामध्ये हिंदुराष्ट्राला ज्या शेवटच्या राक्षसी शत्रूस तोंड द्यावे लागले. त्या हूणांविषयी इतकेच सांगतो आणि इतकेच सांगणे पुरेही आहे की, जी शक-यूचींची गोष्ट तीच हूणांची. या हूणांच्या प्रचंड प्रलयसमीराने युरोपातील रोमन साम्राज्याची कंबरच मोडली. रशिया ते चीनसुद्धा उभे जग उलथेच्या पालथे घातले. पण हिंदुस्थान? हिंदुस्थानात त्यांचा पाय शकांइतकाही रोवला गेला नाही. त्यांनी केलेला हिंदुस्थानातील उत्पात जितका भयंकर होता तितकाच त्यांचा उच्छेदही त्वरित झाला. पंजाबातून घुसून त्यांचा पुढारी तोरमाण ह्याने ५०० सनाचे संधीस माळव्यापर्यंत आक्रमण केले. ५०२ मध्ये त्याचा पुत्र मिहिरगुल गादीवर बसला. आणि लगोलग हिंदुराजांचा प्रबळ संघ एकवटून हिंदूंचा प्रतापी सेनापती जो यशोवर्धन त्याने हूणांना रणांगणात चोपून काढीत पंजाबपर्यंत रेटले आणि शेवटी एका तुंबळ संग्रामात

मुलतानजवळ कोरूर येथे त्याचा पूर्ण पराजय करुन रणाग्नीत त्यांची हिंदुस्थानातील राजसत्ता भस्म करून टाकली आणि जे सहस्त्रावधी हूण लोक मागे राहिले त्यांची वर्बरता ब्राह्मणांनी यज्ञाग्नीत भस्म केली! त्यांना हिंदूच करून टाकले!! Can this be called a life of continuous surrender or submission? No. It is a life of virile Triumph!

हिंदूंचे जागतिक आणि सांस्कृतिक साम्राज्य

या कालापर्यंत हिंदुराष्ट्राने आपले स्वतःचे राजकीय स्वातंत्र्य नि राजकीय वर्चस्व आसिंधु-सिंधु भरतखंडात भरभराटत ठेवले होते. इतकेच नव्हे तर मोठमोठी नौसैन्ये, नौसाधने (आरमारे) उभारून हिंदुमहासागरापलिकडे असलेल्या देशांवरही आपल्या सांस्कृतिक साम्राज्याप्रमाणेच जे राजकीय साम्राज्य प्रस्थापिले होते तेही या इ.स. १००० पर्यंतच्या कालखंडापर्यंत अबाधित ठेवलेले होते. मिसर (इजिप्त) पासून मेक्सिकोपर्यंत बुद्धकालाच्याही अनेक शतकांचे आधी हिंदूंनी स्थापिलेल्या राजकीय साम्राज्याच्या आमच्या पौराणिक किंवा पाश्चिमात्यांनी लिहिलेल्या दंतकथात्मक ग्रंथातील अस्पष्ट उल्लेखांना आपण या लेखापुरते सोडून देऊ अगदी ताम्रपट, शिलालेख, उत्खनन अत्यादींच्या साहाय्याने परकीय फ्रेंच आणि डच संशोधकांनी निर्विवाद म्हणून लिहिलेल्या इतिहासाप्रमाणेच सिद्ध आहे की, इसवीसनाचे आरंभापासून तो सन १००० पर्यंत आज ज्याला सयाम, जावा, सुमात्रा, बाली, आनाम, हिंदुचीन (इंडोचायना) म्हणतात, त्या सर्व देशांत भारतीयांची राज्ये थाटलेली होती. तिकडे चीन सम्राटांच्या सैन्यावर अनेक लढायांत भारतीय सैन्याने विजय मिळविले. तेथील नगरांची, देशांची, पर्वतांची, नद्यांची भारतीयांनी ठेवलेली संस्कृत नावे रूढ झालेली होती. ती आजही बहुतांशी तशीच टिकून राहिलेली आहेत. मलय (आजचा 'मलाया') साम्राज्य हे तीन-चार शतके अत्यंत प्रबळ म्हणून गाजले होते. 'अहो, पण ती भारतीय बुद्धपंथीयांचीच राज्ये होती!' असा निरर्थक श्लेष सुद्धा काढण्यास कोण्या हिंदुद्वेष्ट्या वावदूकाला इथे अवकाश नाही! कारण ती सारी राज्ये क्षत्रियादि वैदिक धर्माभिमानी राजांनीच स्थापलेली होती. बुद्धभिक्षूप्रमाणेच शैव-वैष्णवादि पंडितही भारतीय धर्म नि संस्कृति यांचा प्रचार करीत होते. या आठ-नऊ शतके चाललेल्या हिंदूच्या भिन्न भिन्न राजवंशांतील नावेच पाहा! चंपा (अनाम ते हिंदुचीन) त्या राज्यावर इ.स. ३८० मध्ये राजा भववर्मा हा बलाढ्य राजा राज्य करीत होता. त्याच्या राज्यातील विभागांची नावे अमरावती, विजय नि पांडुरंगपूर अशी होती. वेदपारंगत म्हणून त्याची ख्याती होती. चीनच्या राजाने चंपावर केलेल्या एका प्रबळ चढाईत चंपा राज्य धुळीस मिळण्याचा प्रसंग आला असता नवे भूदल नि सिंधुदल उभारून चिनी सैन्याचा नि सत्तेचा ज्याने ५२६ मध्ये धुव्वा उडविला त्या हिंदुराजाचे नाव रुद्रवर्मा होते. अशीच इंद्रवर्मा,

पुरुषोत्तम, श्रीहरिवर्मा प्रभृति राजांची नावेच सांगतात की ते वैदिक धर्माभिमानी क्षत्रिय राजे होते. कंबुज (cambodia) चे हिंदुराज्यही असेच होते. सयामच्या राजवंशात राजा राम पहिला, राम दुसरा असे सहासात राजे राम या नावानेच होऊन गेले. अलिकडेच राज्यत्याग केलेल्या राजाचेही नाव 'राम'च हे वृत्तपत्रांच्या चालचलाऊ वाचकांनाही ठाऊक आहे. बुद्धाप्रमाणेच शंकराची नि विष्णुची प्रचंड मंदिरे या साऱ्या देशांतून उभारलेली होती. रामायण, महाभारत यांची पारायणे नि राममंदिरातून त्यांच्या कथांची लोकनाट्ये होत होती. बुद्ध भिक्षु नि वेदविद् ब्राह्मण यांचा सन्मान सारखाच होई. राज्याभिषेक ब्राह्मणांच्या करवी वैदिक संस्कारांनी होत. हिंदूंच्या त्या बृहत्तर भारतीय राजकीय दिग्विजयात त्यांनी स्थापिलेली राज्ये न्यूनतम नउशे वर्षे तरी भरभराटलेली होती ही बहुतेक राज्ये मलय, पांड्य, चेर, चौल, कलिंग नि आंध्र ह्या हिंदुराजवंशांनी आणि केव्हा केव्हा सर्वसाधारण हिंदु जनतेत निर्माण झालेल्या पराक्रमी पुरुषांनी स्थापिलेली होती. इकडील समुद्रातून भारतीयांची शेवटची उल्लेखनीय स्वारी म्हणजे पांड्य राजाने एक बलाढ्य सिंधुदल घेऊन ब्रह्मदेशावर केलेली स्वारी होय. ब्रह्मदेश जिंकून परत येता येता अंदमान द्वीपपूंजही त्याने हस्तगत केला नि नंतर त्या स्वारीच्या गौरवार्थ भारतात आल्यावर एक जयस्तंभ उभारला. ही घटना अकराव्या शतकांतीलच होय.

पण परकीयांनी केव्हा केव्हा तरी
हिंदूंचा पराभव केलाच ना?

पण इतक्या परकीयांनी हिंदुवर स्वाऱ्या करून तात्कालिक विजय तरी मिळविलेच की नाही म्हणून विचाराल तर आम्ही विचारू की, ग्रीस देशाच्या शौर्याची खरी कसोटी केव्हा लागली असे युरोपियन ग्रंथकार मानतात? त्यांच्यावर जेव्हा पर्शियनांसारखे परकीय प्रबळ लोक चालून आले, ग्रीस जवळजवळ त्यांनी गिळला आणि तरीही हतोत्साह न होता ग्रीकांनी त्यांना शेवटी पिटाळून लावले, तेव्हाच ना? मग त्याच कसोटीने ह्या लेखावर उद्धृत केलेल्या टॉडच्या वाक्याप्रमाणे तशा थर्मापिली नि लिओनिडास ज्या भारतात पावलोपावली आढळून आले त्या भारताच्या पराक्रमाचीही खरी कसोटी तीच का समजू नये? ग्रीस, रोम, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, रशिया, चीन यांच्या जीवनकालांतही परचक्राची दहा दहा आक्रमणे आणि पारतंत्र्यांची शतके आढळत नाहीत का? एका टीचभर ब्रिटनचीच गोष्ट घ्या. रोमन्स, एंजल्स, सॅक्सन्स, डेन्स, नॉर्मन्स किती परकीयांनी कितीदा ते बेट जिंकून तिथे राज्ये चालविली!! मग तेवढ्यासाठी त्या ब्रिटनचे किंवा त्या इतर राष्ट्रांचे जीवनही 'A life of continuous defeat' आहे, अखंड शरणागतीचेच आहे असे म्हणण्याची तुमची छाती आहे काय? त्यांच्याविषयी तसे जे तुम्ही म्हणू शकत नाही

ते एवढ्याचसाठी ना, की जरी परचक्रे त्यांच्यावर आली नि त्यांच्या राजधान्याही शत्रूंनी घेतल्या तरी शेवटी त्या त्या राष्ट्रांनी त्या शत्रूंना जिंकून स्वराष्ट्र राखले' शत्रूच्या आहारी नित्याचे जाऊ दिले नाही; तर मग त्या कसोटीसच ज्या ह्या हिंदुराष्ट्राचा प्राचीन इतिहासकाल शतपट अधिकपणे उतरत आहे त्या हिंदुराष्ट्राविषयी 'The Hindus' life has ever been a life of continuous defeat असे निर्लज्ज विधान करणे हा निव्वळ शिवराळपणाच ठरत नाही का?

त्यातही हे ध्यानात ठेवले पाहिजे की ग्रीक वा शक वा यूची वा हूण हे कोणीही आमच्या सीमा-प्रांताबाहेर फारसे घुसू शकले नाहीत, गंगा उतरू वा विंध्य ओलांडू फारसे शकलेच नाहीत!

हूणांना नामशेष करुन टाकल्यानंतर काश्मीर ते नेपाळ, द्वारका ते कामरूप, हिमालयापासून लंकेपर्यंत हिंदुचे साम्राज्यच पुन्हा भरभराटलेले होते. त्याची साक्ष श्रीहर्ष नि पुलकेशी ह्या उत्तर-दक्षिण हिंदुस्थानातील दोघा दिग्गजांच्या रक्षणाखाली भारतवर्ष नांदत असता आलेला प्रख्यात चिनी प्रवासी जो युवानचंग (ह्युएनत्संग) त्याचे जगत्प्रसिद्ध प्रवासवृत्त देतच आहे! सम्राट श्रीहर्ष इ.स. ६४६ चे संधीस वारला. आमच्या ऐतिहासिक काळाचा प्राचीन खंडही येथेच संपला!

(३) ऐतिहासिक काल: अर्वाचीन खंड

हिंदुराष्ट्रावर पूर्वी झालेल्या कोणत्याही आक्रमणापेक्षा मुस्लिमांचे आक्रमण हेच अत्यंत भयंकर आणि दीर्घकालीन असे झाले.

निष्कारण बाष्कळ आत्मनिंदा ही जशी राष्ट्रघातक तशीच निष्कारण नि बाष्कळ आत्मप्रौढीही राष्ट्रघातकच असते. झालेला पराजय मान्य करण्यास ते कचरतात की ज्यांना त्या पराजयांचा सूड घेण्याची अंगात धमक नसते!

तशी अत्यंत घनघोर संकटातूनही झुंजून त्यांना जिंकून, पुरून उरणारी धमक हिंदुराष्ट्राच्या रोमरोमात भिनलेली असे आणि तिच्या बळावर त्या हिंदुराष्ट्राने पराजयांचा पुरा पुरा सूड पुन्हा पुन्हा उगविला हे आमच्या राष्ट्राच्या युगव्यापी इतिहासाच्या या लेखातील आतापर्यंत केलेल्या समीक्षणावरून निर्विवादपणे सिद्ध झालेलेच आहे म्हणूनच मुस्लिमांच्या भयंकर आक्रमणामुळे पहिल्या तीन-चार शतकांत हिंदुंचे पराभवामागून पराभव होत गेले हे सत्य जसे घडले, तसेच पण ज्या प्रमाणात ते घडले त्याच प्रमाणात काय ते स्पष्ट न सांगण्याचा भेकड यत्न आम्ही मुळीच करीत नाही. ऐतिहासिक वर्णन हा ह्या लेखाचा विषयच नव्हे, तर त्या इतिहासाचे धावते समीक्षण हाच एवढा या लेखाचा जो विषय आहे, त्यास अनुसरून आम्ही एका वाक्यातच स्पष्टपणे सांगून टाकतो की,

साधारण इ.स. १००० च्यावर्षापासून मुस्लिमांशी हिंदूंचे जे महायुद्ध घडले गेले त्यात साधारणतः सन १५०० पर्यंत हिंदुसैन्यांच्या मुस्लिम सैन्यांशी जिथे जिथे मोठमोठ्या लढाया झाल्या तिथे तिथे शेकडा नव्वद लढायात हिंदुपक्षाचा धुव्वा उडाला. हिंदु-मुस्लिम महायुद्धाच्या पूर्वार्धातील हिंदुराष्ट्राच्या या सतत पराभवाने कोणाला आनंदाची उकळी फुटत असेल तर त्यांच्या त्या आनंदात तेवढ्या प्रकरणी विरजण घालण्याचा मोह आम्हास मुळीच होणार नाही; पण ज्याप्रमाणे मुसलमानांनी पूर्वार्धात अफगणिस्थानापासून ते कन्याकुमारीपर्यंत हिंदूंचा शेकडा नव्वद लढायांमागून लढायांत धुव्वा उडवीत आणि हिंदुंची राज्यामागून राज्ये घेत सर्व भरतखंडभर 'हिरवा चांद' फडकविला, त्याचप्रमाणे त्यांना प्रत्येक पावली टकरा देत देत, प्रतिकार करीत करीत त्या शतकव्यापी शस्त्रसंघर्षात शेवटी जेव्हा हवी ती ठिणगी पडून सह्याद्री पेटला, तेव्हा हिंदुविक्रमापुढे मुसलमानांसही पळता भुई थोडी झाली! तोडीस तोड उडाली! साधारणतः सन १६०० पासून तो १७९३ पर्यंत जेथे जेथे हिंदुसैन्याची मुसलमानी सैन्याशी लढाई जुंपली तेथे तेथे शेकडा नव्वद लढायांत हिंदूंनी मुसलमानांचा धुव्वा उडविला. मुसलमानांच्या बादशह्यांमागून बादशह्या नि नवाबामागून नवाब बुडवीत हिंदूंच्या सेना मराठ्यांच्या सेनापत्याखाली प्रत्यक्ष अटकेवरील 'हिरव्या चांदाला' धुळीत लोळवून तिथे भगवा ध्वजच उभारत्या झाल्या!

भाऊसाहेब पेशव्यांनी अकबर-औरंगजेबांचे बादशाही तक्त हिंदु घणाचा घाव घालून अक्षरशः फोडून टाकले! भाट-चारणांच्या जयघोषांनी आकाश दुमदुमू लागले.

**आज सात शतकाने पायी मिरवित सोनेरी तोडा।**

**पुनरपि आजी हिंदुजयाचा पिई सिंधुचे जल घोडा।।**

**हिंदु वीरांचा की श्रीशे असे यशस्वी हट केला।**

**आज हिदवी जरिपटका की पुन्हा पोचला अटकेला।।**

त्यातही हे ध्यानात ठेवले पाहिजे की, मुसलमानांशी हे सप्तशतकव्यापी महायुद्ध लढवीत असतानाच 'फिरंगाण' (युरोप) मधील इंग्लिश, डच, पोर्तुगीज, फ्रेंच प्रभृति राष्ट्रांशीही हिंदूंना टक्कर द्यावी लागत होती. ह्यात सर्व परकीयांशी हिंदुचे पुढारीपण घेऊन विशेषतः महाराष्ट्र हा भूमीवर नि समुद्रावर समकालीन नि सतत युद्ध झुंजवीत राहिला. भाट गातातः-

**पठाण, मोगल, तुर्क,इराणी, हबशी,शिद्दी परोपरी।**

**पोर्तुगीज वलंदाज फिरंगी अंग्रेजादिक गौर खली।।**

**इराणपासुनी फिरंगाणपर्यंत शत्रूंची उठे फळी**

**सिंधुपासुनी सेतुबंधपर्यंत रणांगण भू झाली।।**

**तीन खंडिच्या पुंडांची ती परंतु सेना तुडवीली।**

**सिंधुपासुनी सेतुबंधपर्यंत समर भू लढविली।।**

ह्या कालखंडाचे शेवटी मुसलमानांच्या राजसत्तेचा चक्काचूर उडवून हिंदुस्थानामध्ये पुनरपि हिंदुराज्य जिकडे तिकडे कसे प्रस्थापित केले गेले ते उल्लेखिलेल्या ओळीतच निर्विवादपणे दिसून येईल. जवळजवळ काबूलनदीपासून काश्मीर, पंजाब, पतियाळापर्यंत शीख-रजपूत-जाटांची हिंदुराज्ये, नेपाळात गुरख्यांचे हिंदुराज्य, दिल्लीपासून तंजावरपर्यंत आणि काठेवाडपासून ओरिसापर्यंत मराठ्यांचे हिंदुसाम्राज्य आणि खाली म्हैसूर, त्रावणकोरची हिंदु राज्ये!! सात शतके लढत लढत सतराव्या शतकाच्या आरंभी आरंभी हिंदूंनी हिंदुस्थानातून मुसलमानी राजसत्तेचा असा पुरा पुरा नायनाट केला होता! पण आज? आज हिंदुस्थान इंग्रजांचे हातात आहे ते? त्यास उत्तर इतकेच की, तो प्रश्न अजून अनिर्णित आहे. त्या 'आज'चे उत्तर उद्या किंवा परवा देता येईल!

हिंदूंच्या एकंदर जीवनाविषयीचा प्रश्न इथे प्रस्तुत होता. त्यासाठी हिंदु इतिहासांचे गेल्या पाच सहस्त्र वर्षांचे धावते समालोचन वर केलेले आहे. हिंदुराष्ट्रावर अनेक आपत्ती अशा आल्या की, त्यांच्या फटकाऱ्यासरशी मोठमोठी राष्ट्रे नामशेष होऊन गेली; परंतु क्वचित चीनचा अपवाद सोडता जगाच्या इतिहासात अशा अनेक आपत्तीशी झुंजून, अनेक बलाढ्य शत्रूंना पादाक्रांत करून शतकव्यापी महायुद्धे लढवून जर कोणते राष्ट्र आज पाच सहस्त्र वर्षे आपले अस्तित्व आपल्या पराक्रमाने टिकवून राहिले असेल, आपले स्वातंत्र्य पुन्हा पुन्हा प्रस्थापित करीत आलेले असेल, आपल्या धर्माचा, आपल्या संस्कृतीचा, आपल्या अंतिम अजिंक्यतेचा प्रभाव गाजवीत आलेले असेल तर ते हिंदुराष्ट्रच काय ते होय! भयंकर जीवनकलहात ते झुंजत राहिले, जिंकीत राहिले, म्हणून हे हिंदुराष्ट्र जगले आहे. राष्ट्राराष्ट्रांच्या साऱ्या प्रतिपक्ष्यांमध्ये ते आपल्या चिवटपणाने नि प्रबळतेने या जीवनकलहाच्या स्पर्धेत निसर्गनियमाप्रमाणे जगावयास योग्य ठरले- In the struggle for existence it proved fittest to survive -म्हणून हे हिंदुराष्ट्र आजही जिवंत आहे. हिंदुराष्ट्राचा इतिहास अपजयशील नसून कोणत्याही राष्ट्रापेक्षा तो उत्कटपणाने विजयशीलच आहे!

* * *

www.savarkarsmarak.com